


म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १११०

श्री लेखन.वाचन.भांडार

REFBK-0007543

प्रो. श्री. म. माटे एम्. ए.

२२८८३ निबंध
क्रमांक ~~११०८~~ १११०
सूची ९१५.८

# साहित्यधारा

लेखक

प्रा० श्रीपाद महादेव माटे, एम्. ए.

★

तिसरी आवृत्ति : १९५१

REFBK-0007543

मूल्य २॥ रु.

प्रकाशक
ग. ल. ठोकळ, बी. ए., बी. टी.
लेखन-वाचन-भांडार,
गणपति चौक, पुणें २.

* सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन *

मुद्रक
न. वि. सरदेशपांडे,
आदर्श मुद्रणालय,
३९५।५ सदाशिव, पुणें २.

22663
7970 नोंः दिः

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टि | १ |
| २. | शिक्षकानें केव्हां मरावें ? | १४ |
| ३. | शृंगार : रसांचा राजा | २५ |
| ४. | ते केवळ कलावंत असतात ! | ३८ |
| ५. | मोठ्या लोकांचीं खाजगी चरित्रें | ४७ |
| ६. | लहान लहान वशीकरणें | ६९ |
| ७. | शेक्स्पियरची कुचाळी | ८० |
| ८. | माझी विद्वत्ता | ९६ |
| ९. | नायक आणि नायिका कोणास म्हणावें ? | १०७ |
| १०. | माझ्या राजेश्वरा ! | १२२ |
| ११. | गैरसमजाचा पाठलाग | १३७ |
| १२. | ललित–लेखक जीविताचें अनुकरण करतात काय ? | १५० |
| १३. | पारमार्थिकांनीं केलेला रामदासाचा पराभव ! | १६३ |

# आमचें प्रकाशन

| | | | |
|---|---|---|---|
| मीठभाकर (काव्य) आवृत्ति दुसरी | | ग. ल. ठोकळ | २-८-० |
| सुगी (काव्य) ,, तिसरी | | ,, | ३-०-० |
| गांवगुड (कादंबरी) ,, ,, | | ,, | ३-०-० |
| कडू साखर (कथा) ,, दुसरी | | ,, | ३-०-० |
| सुगंध ,, ,, ,, | | ,, | ३-०-० |
| मोत्यांचा चारा ,, | | ,, | २-४-० |
| अनामिका (कथा) | | श्री. म माटे | ३-०-० |
| आजकालचे विद्यार्थि (प्रबंध) | | ,, | २-८-० |
| साहित्यधारा ( ,, ) | | ,, | २-८-० |
| जगाचे प्रवासी : भाग १ (चरित्रें) | | ,, | १-४-० |
| ,, ,, ,, २ ( ,, ) | | ,, | १-४-० |
| बारा शास्त्रज्ञ (चरित्रें) | | ,, | ३-०-० |
| पाणकळा (कादंबरी) आवृत्ति दुसरी | | र. वा. दिघे | ४-८-० |
| सराई ,, ,, ,, | | ,, | ५-०-० |
| आजच्या गोष्टी : भाग १ (बालवाङ्मय) | | के. नारखेडे | ०-८-० |
| ,, ,, ,, २ ( ,, ) | | ,, | ०-८-० |
| ,, ,, ,, ३ ( ,, ) | | ,, | ०-८-० |
| ,, ,, ,, ४ ( ,, ) | | ,, | ०-८-० |
| कालच्या गोष्टी : भाग १ ( ,, ) | | ,, | ०-१२-० |
| अहल्याबाई होळकर (चरित्र) | | वा. दा. गोखले | ०-१२-० |
| महात्मा फुले (चरित्र) | | आ. अ. मानकर | १-०-० |
| प्रौढांचें शिक्षण व साक्षरताप्रसार (प्रबंध) | | ,, | १-८-० |
| साहित्यदर्शन (आधुनिक वाङमयप्रकार) | | सरोजिनी बाबर व वि. म. कुलकर्णी | ४-०-० |

## श्री लेखन-वाचन-भांडार,

गणपती चौक, लक्ष्मी रोड, पुणें २.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

'**साहित्यधारा**' या पुस्तकांत माझ्या स्फुट लेखांपैकीं तेरा लेखांचा समावेश मीं केला आहे. या सर्व लेखांची जात एकाच प्रकारची नाहीं; परंतु हाच या संग्रहाचा गुणहि होऊं शकेल.

**भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टि** या लेखांतील मुख्य् कल्पना फार वर्षांमागें मीं विद्यार्थ्यांच्या पुढें मांडिली होती. पांचसहा वर्षांपूर्वीं त्याच विषयावर नगर येथें झालेल्या माझ्या व्याख्यानाचा सारांश मीं 'ज्ञानप्रकाश' पत्रांत प्रसिद्ध केला. 'नूतन मराठी विद्यालया'चे माजी मुख्याध्यापक प्रो. नानासाहेब मारळकर यांना या लेखांतील कल्पना इतकी अभिनव आणि आकर्षक वाटली कीं, त्यांनीं त्या लेखाच्या एक सहस्र पुस्तिका छापवून घेतल्या आणि आपल्या शाळेंतील वरच्या विद्यार्थ्यांना त्या लेखांतील कल्पनेची ओळख व्हावी म्हणून त्यांच्या हातीं या पुस्तिकांचा प्रसार केला. शालोपयोगी पुस्तकें तयार करणाऱ्यांनीं या लेखाचा अंतर्भाव आपल्या पुस्तकांत यानंतर लवकरच केला.

**शिक्षकानें केव्हां मरावें ?** हा लेख मीं 'झंकार' पत्रांत लिहिला होता. यांतील उपरोध आणि जालीम पगदस्तीपणा माझ्या अनेक शिक्षकमित्रांना फार पसंत पडल्यावरून तो लेख या पुस्तकांत घालून त्याला थोडा टिकाऊपणा आणण्याची व्यवस्था मीं केली आहे.

**शृंगार : रसांचा राजा** हा लेख मीं 'वाङमयशोभा' मासिकांत बऱ्याच दिवसांपूर्वीं लिहिला होता. त्या वाङमयीन लेखाची सामाजिक पार्श्वभूमि सूचकपणामुळें वाचकवर्गाला विशेष आवडल्याकारणानें आणि शृंगार हा रस आपल्या विविध रूपांनीं मानवी जीविताला कसा आक्रमून राहिला आहे याचें विवेचनहि वाचकांस प्रिय वाटल्यानें त्याचाहि अंतर्भाव **साहित्यधारांत** केला आहे.

**ते केवळ कलावंत असतात !** हा 'झंकार' मधील माझा लेख या पुस्तकांत मीं मुद्दामच घेतला आहे. कलावंतांवर भलती जबाबदारी जनतेनें कशी टाकूं नये व कलावंतांनीं आपणांवर ती कशी ओढून घेऊं नये याचें मीं केलेलें विवेचन कलावंत व रसिक या दोघांनाहि पटेल असा विश्वास वाटतो.

**मोठ्या लोकांचीं खाजगी चरित्रें** हा लेख फार वर्षांपूर्वी 'रत्नाकर' मासिकांत मीं लिहिला होता. त्यांतील मध्यवर्ती कल्पना आणि थोर लोकांच्या चरित्रांचा दिलेला तपशील व त्याकडे आपण कसें पाहावें यासंबंधींचें केलेलें विवेचन वाचकांना आजहि रुचकर वाटेल असा भरंवसा मला वाटतो.

**लहान लहान वशीकरणें** हा थोडासा विनोदी लेख मनांत सांठत आलेल्या बारिक अनुभवांच्या आधारावर मीं लिहिलेला आहे. अशा बारिक बारिक गोष्टींच्या मनोरंजक स्मृति ज्यांच्या मनांत कायम असतील त्यांनीं या स्मृतींना निबंधाचें रूप दिलें तर ते त्यांचे निबंध वाचावयास मला फारच आवडतील. हा निबंधहि मीं 'झंकार' पत्रांतच प्रसिद्ध केला होता.

**शेक्स्पिअरची कुचाळी** हा लेख मागें 'रत्नाकर' मासिकांत प्रसिद्ध झाला होता. "मर्चंट ऑफ् व्हेनिस" हें शेक्स्पियरचें नाटक मुलांना शिकवितांना मला त्या शायलॉकची फार दया येई; आणि सर्व नाटकभर उडविलेला त्याचा फजितवाडा पाहून माझी सामाजिक सहानुभूति निश्चयानें त्याच्या अंगास वळे. या लेखांतील सामाजिक मर्म जर माझ्या आधीं दुसऱ्या कोणीं सांगितलेलें मला माहीत असतें तर हा लेख मीं तेव्हां खचितच लिहिला नसता; आणि आतां पुन्हां प्रसिद्ध केला नसता.

**माझी विद्वत्ता** या लेखांत विद्वान् विद्वान् म्हणून ज्यांचा गौरव होतो त्यांच्या ज्ञानाचा व्याप आणि त्यांच्या ज्ञानाची खोली हीं किती अल्प असतात याचें थोड्याशा गमतीदार उद्वेगानें दिग्दर्शन केलें आहे.

**नायक आणि नायिका कोणास म्हणावें?** या माझ्या लेखांतील कल्पना कांहींशा अस्पष्ट रूपानें कां होईना, पण पूर्वीं केव्हां तरी एकदां वाङ्मयांत येऊन गेली होती असें प्रा. पंगु यांनीं आपल्या टीकालेखांत सांगितलें आहे. या त्यांच्या सूचनेचा मी फार आभारी आहें. तथापि या लेखांतील मुख्य भूमिकेचें प्रतिपादन नवें व विचारप्रक्षोभक वाटेल असा माझा अजमास आहे. वाङ्मयांतील आपल्या ज्या कल्पना अजिबात बदलल्या पाहिजेत असें माझें मत आहे त्यांतील ही एक आहे.

**माझ्या राजेश्वरा!** हा लेख रामदासस्वामींच्या एका ओवींतून उत्पन्न झाला आहे. परमार्थप्रवण प्रवृत्ति ज्यांच्या ठिकाणीं आहे त्यांनाच या लेखाची लज्जत मानवण्यासारखी आहे असें मला वाटतें. ती जर नसेल तर हा लेख विशेषसा आवडेल असें वाटत नाहीं.

**गैरसमजाचा पाठलाग** या लेखांत आपल्याविषयींचे गैरसमज विनाकारण कसे पसरत जातात आणि त्यांचा आपणाला कितीहि जाच झाला तरी या गैरसमजाच्या प्रसाराचा पाठलाग करण्यांत आपणांला यश कसें येत नाहीं याचें विवेचन मला आलेल्या गमतीदार अनुभवांच्या आधारें केलें आहे.

**ललित-लेखक जीविताचें अनुकरण करतात काय?** हा त्यापुढील लेख आहे. ललित-लेखकांना जीविताचें अनुकरण अमुक एका मर्यादेपर्यंतच करितां येतें अथवा करावेंसें वाटतें. जीविताचें खरें खरें अनुकरण करावयाचें तर त्यांचें रसिक आणि कोवळें मन या साहसाला कसें धजत नाहीं याचें विवेचन मीं प्रस्तुत लेखांत केलें आहे. ललितलेखकांचा स्वानुभव माझ्या विवेचनाशीं जमला तर मला फारच आनंद वाटेल.

**पारमार्थिकांनीं केलेला रामदासाचा पराभव!** या शेवटच्या लेखाची मुख्य कल्पना अशी आहे कीं, रामदासस्वामी हे पूर्वींच्या संतकुळांत उत्पन्न झाले असूनहि देशाची अवनत स्थिति पाहून त्यांना

सामाजिक उत्थापनाचें स्फुरण झालें आणि माणसांनीं प्रपंचांतून उठून तर जाऊंच नये, पण उलट प्रपंच शूरपणें करावा, या हेतूनें त्यांनीं प्रपंचविज्ञान रचिलें; परंतु त्यांच्या वाङ्मयीन शिष्यांपैकीं एकाहि शिष्याला हें त्यांचें प्रपंचविज्ञानाचें वैभव मानवलेलें दिसत नाहीं आणि कोणींहि तें विवरून सांगितलेलें नाहीं. मूळ लेखांतील शेवटचा परिच्छेद केवळ प्रासंगिक महत्त्वाचा असल्यानें मीं तो अजिबात वगळला आहे. या लेखावरील टीकाकारांचीं मतें मी वाचलेलीं आहेत, परंतु माझें मूळचें मत जसेंच्या तसें ठाम आहे.

हें तेरा लेखांचें पुस्तक जनार्दन सदाशिव प्रेसचे व्यवस्थापक श्री. ल. स. केळकर यांनीं अवघ्या आठ दिवसांत मला छापून दिलें यासाठीं मीं त्यांचें किती उतराई व्हावें आणि ' मी फार फार आभारी आहें ' हें म्हणण्यापलीकडे काय करावें हेंच माझ्या ध्यानांत येत नाहीं. परंतु हें पुस्तक प्रसिद्ध होत आहे याचें सर्व श्रेय साहित्यक्षेत्रांतील माझे नवे मित्र श्री. अरविंद मंगरूळकर यांच्याकडे आहे. त्यांच्यासारख्या अत्यंत रसिक आणि मर्मज्ञ सहकाऱ्याचा मला या कामीं लाभ झाला हें मी स्वतःचें भाग्यच समजतों; पण मी इतक्यांत त्यांचे आभार मानीत नाहीं, कारण मला अजून त्यांना पुष्कळ कामें सांगावयाचीं आहेत; व ते तीं आजच्याच आपुलकीनें करीत राहाणार आहेत. तें सुखप्रद पर्व ज्या दिवशीं संपेल त्या दिवशीं मी त्यांचे एकदांच आभार मानीन.

१९४३. **—श्री. म. माटे**

× × ×

१९४९ सालीं निघालेली दुसरी आवृत्ति मी मॉडर्न बुक डेपो, पुणें यांस दिली होती.

१९५१ सालीं ही तिसरी आवृत्ति निघत आहे. ती मीं श्री. गजाननराव ठोकळ, ले. वा. भांडार यांस प्रकाशनासाठीं दिलेली आहे.

२-६-५१

**—श्रीपाद महादेव माटे**

22443
9970

# १. भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टि

'निरनिराळ्या दृष्टींनीं एकाद्या विषयाकडे पाहणें' असा कांहींएक प्रकार असतो. आर्थिक दृष्टीनें पाहणें, ऐतिहासिक दृष्टीनें पाहणें, हें जसें, तसें **सामाजिक दृष्टीनें पाहणें** हेंहि एकाद्या विषयाचा खराखुरा बोध होण्यास फार उपयोगी पडतें.

भाषा वाढते म्हणजे तिच्यांतील शब्द वाढतात. शब्द हीं मनांत उद्भवलेल्या कल्पनांचीं व गोचर पदार्थांचीं नांवें असतात हें उघडच आहे. हे शब्द जों जों जास्त होत जातात तों तों भाषेची समृद्धि होत जाते. शब्दांची वाढ अधिक होण्याचीं जीं अनेक साधनें आहेत त्यांत रूपकांची योजना हें एक फार मोठें साधन आहे. प्रथम प्रथम हौशी बोलणारा किंवा लिहिणारा आपल्या लिहिण्यांत किंवा बोलण्यांत सरसपणा आणण्यासाठीं सुंदर रूपकांची योजना करतो; हीं रूपकें परिचित असलीं किंवा थोड्या कल्पनेनें ओळखतां येण्यासारखीं

असलीं तर वाचकांना किंवा श्रोत्यांना अतिशय आनंद होतो; व त्यांच्या या गुणामुळें तीं लोकांमध्यें चांगलेंच चलन पावतात. लोक त्यांचा सरसकट उपयोग करूं लागतात; इतका कीं, शेवटीं त्यांतील काव्यगुण लोपून साध्या व्यावहारिक शब्दांचें रूप त्यांना प्राप्त होतें व अशा रीतीनें शब्दसंख्या वाढते.

एकाद्यानें पंधरा मिनिटांच्या बोलीनें जर एकादा हेलकरी केला, पण मुक्कामाचें घर लवकर सांपडलें नाहीं म्हणून त्यानें त्याला पाऊण तास तेवढ्याच मजुरीवर रखडविलें तर आपल्या या पराक्रमाचें फुशारकीनें वर्णन करतांना तो म्हणतो, "मीं त्या हेलकऱ्याला तसेंच पुढें **ताणीत नेलें.**" आतां अगदीं प्रथम ज्यानें 'ताणीत नेणें' हा शब्दप्रयोग केला असेल त्यानें काव्यमय रचना केली होती, हें स्पष्ट आहे. रबराचा तुकडा एक बोटभर लांब असतो, व एरव्हीं मोजून पाहिलें तर त्याची लांबी तितकीच भरते. पण कांहीं कारणासाठीं हेंच रबर ताणलें तर हातभर लांब होतें. अर्थात् ही लांबी अंगिकारितांना रबराला क्लेश होतात हें सहज दिसतें. हा 'ताणणें' याचा अर्थ आहे. हेलकऱ्याचीं जीं पंधरा मिनिटें होतीं त्याचीं '**ताणून**' पंचेचाळीस केलीं व त्याच्या शरीर-क्लेशाकडे लक्ष दिलें नाहीं. हा सगळा अर्थ पहिल्या माणसानें रूपकानें सांगितला; पण पुढें तो शब्द अनेकवार उपयोगांत आल्यामुळें लोक त्याचा काव्यगुण. विसरले व तो शब्द साध्या व्यावहारिक अर्थाचा होऊन बसला. म्हणजे रूपकाचा साधा शब्द झाला. ज्यानें प्रथम '**कवळणें**' म्हणजे 'दोन बाहूंच्या पाशांत कवटाळिणें' असा शब्दप्रयोग केला त्यानें रूपक केलेलें होतें. 'कवळ' म्हणजे घांस; वरचा जबडा व

खालचा जबडा यांच्यामध्यें सांपडणारा तो 'कवळ', म्हणजे घांस; त्याप्रमाणेंच दोन भुजांत जी वस्तु सांपडली तिचाहि घांस झाला म्हणजे ती आपण कवळिली. कालांतरानें हें काव्य नाहींसें होऊन तो शब्द कवटाळणें या अर्थाचा केवळ गद्यरूप होऊन बसला. शब्दकोश उघडून पाहिला तर, अशा तऱ्हेनें आपलें काव्यरूप गमावून बसलेले शब्द अगदीं मुळापर्यंत व्युत्पत्तिदृष्ट्या नेऊन पोहोंचविलेले तेथें सांपडतीलच असें नाहीं. कारण असें केल्यानें कोशकर्त्याचें काम फारच वाढेल. म्हणून रूपकपणा टाकल्यावर शब्दाला जो व्यावहारिक अर्थ उत्पन्न झालेला असतो तेवढा देऊनच कोशकर्त्याला भागवावें लागतें. पण एवढें मात्र खरें असतें कीं, हा शब्द आरंभीं रूपकरूपानें आला व पुढें साधा शब्द होऊन बसला.

आपण पुष्कळदां '**हडकणें**' हा शब्द 'वाळणें' या अर्थानें वापरतों. पण मूळचें तें रूपक आहे. वाळून वाळून फक्त हाडें उरणें म्हणजे 'हाडकणें'. पण आतां हें त्यांतलें काव्य नाहींसें होऊन त्याला अगदीं साध्या शब्दाच्या अर्थाचें रूप आलें आहे. यानेंच भाषा वाढत जाते. अमुक कारणासाठीं '**हरताळ**' पडला असें आपण हजारदां वाचतों व त्याचा लौकिक अर्थ आतां कायम झाला असल्यामुळें या शब्दांत पूर्वीं रूपकाचा काव्यगुण होता ही माणसांची ओळखहि बुजत चालली आहे. माणसें पूर्वीं पोथ्या लिहीत असत. लिहितांना लिहून झालेलें एकादें अक्षर नको असलें तर त्याच्यावर **हरताळीचें चूर्ण** फासण्याची चाल असे तें फासलें म्हणजे जरी तें अक्षर थोडेंबहुत दिसत असलें तरी, तें खोडलेलें आहे असें समजावयाचें असा रूढ संकेत होता. त्याप्रमाणेंच अमुक

एका आपत्तीमुळें जर व्यवहार बंद ठेवावयाचा असला तर दुकानें बंद ठेवून किंवा थोडीं किलकिलीं ठेवून आपण तीं बंद ठेवीत आहों व अशा रीतीनें आपला उद्वेग व्यक्त करीत आहों या अर्थीं, प्रथम कोणीं हौशी रसिकानें तो शब्द योजिला. पण पुढें पुढें त्यांतील काव्यगुण लोप पावून 'हरताळ पाडणें' म्हणजे 'व्यवहार बंद पाडणें' असा रूढार्थ झाला व एक नवा शब्दच बनून राहिला. हा शब्द 'हाट' व 'टाळा' म्हणजे बाजाराला कुलूप लावणें असाहि व्युत्पादितां येतो; व ती व्युत्पत्ति जास्त चांगली आहे असें वाटतें.

नगराकडे **धाब्याचीं घरें** असतात. वीज पडणें किंवा दुसरा कसला तरी उत्पात होणें यानें जर वस्ती हादरली तर हें घरावरचें धाबें अर्थातच दणकणार. हा प्रकार लक्षांत ठेवणाऱ्या कोणीं रसिकानें आपत्तीमुळें किंवा भयामुळें नखशिखांत घाबरून गेलेल्या माणसाचें वर्णन करितांना काव्यगुणानें म्हटलें कीं, त्याचें धाबें दणाणून गेलें. त्याची ती कविता पाहून तेव्हांचे श्रोते खरोखरच संतुष्ट झाले असतील. त्या काव्यगुणामुळेंच तो शब्द लोकप्रिय बनला व लोकप्रियतेमुळें त्याचा वारंवार उपयोग झाला. तो तसा झाल्यामुळें शब्दांतील काव्यगुण मावळला आणि त्याला "फार भिणें, घाबरगुंडी उडणें" असलें प्राकृत रूप प्राप्त झालें. पण भाषेमध्यें एक शब्द मात्र नवीन आला. अशा प्रकारें रूपकत्व गमावून बसून साध्या अर्थानेंच भाषेंत कायम होऊन बसलेल्या शब्दांची संख्या भाषेंत अफाट आहे; म्हणूनच भाषेला fossil poetry असें म्हटलेलें आहे.

आतां अशा प्रकारें स्वभाषेंत रूपकें प्रविष्ट करणें व शेवटीं

त्यांना साधे शब्द होऊन बसण्याची संधि देणें हें काम' ती भाषा बनवीत जाणारे जे कोणी, त्यांच्या हातीं असतें. त्यांच्या स्वत:च्या जीवनांत जीं सुंदर रूपकें त्यांना अर्थव्यक्तीसाठीं योजावींशीं वाटतात तीं ते योजितात. त्यांना तरी याहून जास्त काय करतां येणार? जीविताचीं जीं अंगें त्यांना परिचित, त्यांतील रूपकेंच ते उचलणार व योजणार. मराठी भाषेंतील बहुतेक नागर व प्रौढ रचना ब्राह्मणांनींच केलेली आहे. अर्थात् त्यांना परिचित अशीं जीं रूपकें तींच त्यांनीं योजिलीं व त्यांना पुढें साध्या शब्दांची रूपें आलीं व भाषा समृद्ध झाली. एकादी गोष्ट शिकविणें व मागून थोड्या उरस्फोडीनें ती विद्यार्थ्याला पटविणें या अर्थानें 'संथा देणें' हा शब्दप्रयोग पूर्वींची शास्त्रीवैदिक मंडळी करीत. आधुनिक सुशिक्षितांनीं हाच शब्द उचलला व 'मॅकडोनल्ड यांनीं अमुक गृहस्थापाशीं सामाजिक ज्ञानाची संथा घेतली पण त्यांना खरें मर्म उमगलें नाहीं' असा शब्दप्रयोग केला. सध्यां जे मध्यम-वयीन ब्राह्मण आहेत त्यांना हा शब्द अडणार नाहीं. पण आणखी पिढी दीड पिढीनंतर या शब्दाचा अर्थ कोशांतच पाहावा लागेल. अशी स्थिति खुद्द ब्राह्मण मुलांचीच होईल. इतरांची तर ती आतांच आहे.

टिळकांनीं प्रतिपक्षावर हल्ला करितांना, लहानशी कबुली देऊन दोषमुक्त व्हानात या अर्थानें म्हटलें कीं, '**स्नान करून मोकळे व्हानात!**' ज्या काळीं व ज्या समाजांत सुतकाची कल्पना लुप्त असेल किंवा होईल त्याला या ब्राह्मणी रूपकाचें मर्म समजणार नाहीं. निबंधमाला संपविण्याचे वेळेस विष्णुशास्त्र्यांनीं म्हटलें आहे, "आम्ही

आतां **अवभृथस्नानास मोकळे** होत आहों." शास्त्रीबोवांच्या वेळच्या वाचकांस—कारण कीं ते बहुतेक सुगळे ब्राह्मणच होते—या रूपकाचा अर्थ समजत असेल. पण "यज्ञ संपवून यजमान हा कृतकृत्य होत्साता नदीवर स्नानाकरितां जाई; त्या जाण्याला अवभृथस्नानास मोकळें होणें असें नांव होतें." असा अर्थ नवीनांस स्पष्ट करून सांगावयास हवा. "विनाकारण हें **सव्यापसव्य** कोण करीत बसतो?" यांतील रूपक श्राद्धपक्षाची चाल जों जों कमी होत जाईल तों तों दुर्बोध होत जाईल हें स्पष्ट आहे, पण वरील सर्व शब्दप्रयोगांचे व्यावहारिक अर्थ मात्र भाषेंत कायम राहिलेले आहेत. हे नवे शब्द मुळांत रूपकरूप होते व लेखक हे ज्या पेशांत वागणारे होते त्या पेशांतून त्यांनीं तीं रूपकें उचललीं होतीं.

आतां जर मराठी भाषेंत शब्दांचा भरणा व्हावयास हवा असेल तर **निरनिराळ्या पेशांतील, धंद्यांतील** रूपकें भाषेंत प्रविष्ट व्हावयास हवीं; व तीं प्रविष्ट करून देण्यास त्या त्या पेशांतील, धंद्यांतील **माणसें वाङ्मयलेखनाच्या प्रांगणांत उतरावयास हवीं.** असें झालें म्हणजे शब्दांची भर भराभर होत जाईल. याचा अर्थ असा कीं, ज्यांना विद्येचा संस्कार झालेला नाहीं अशा ज्या शेंकडों धंदेवाल्या जाती आहेत त्यांच्यांतील माणसें शिक्षित होऊन, आपलें मनोगत व्यक्त करण्यासाठीं, स्वतःला परिचित असलेल्या रूपकांचा उपयोग करण्याची बुद्धि त्यांना उत्पन्न व्हावयास हवी. तेली लेखक आपलीं रूपकें घेऊन भाषेंत यावा; तसाच न्हावी, तसाच कोळी, तसाच साळी. हे सगळे लोक

आपल्या रूपकांच्या भांडवलानिशीं एकदां लेखनव्यवसायांत उतरले म्हणजे मराठी भाषेचें वैभव गडगंज भरत जाईल.

सध्यांसुद्धां प्रत्यक्ष त्या त्या समाजांतील नसूनहि थोड्या ओळखदेखीमुळें व व्यवहारामुळें आपण कांहीं कांहीं रूपकें योजून त्यांना सामान्य शब्दांचा गौरवहि प्राप्त करून दिला आहे. आपण '**इंगा फिरणें**' असा शब्दप्रयोग करतों. पण हा प्रयोग चांभारवाड्यांतील आहे. आपल्या लेखणींतून उतरत असल्यामुळें तो पावन झाला आहे असें वाटतें, इतकेंच काय तें. कातडें मूळचें खडबडीत व अगदीं आडमुठें असें असतें. तें एका बाजूनें पायांत धरून व दुसऱ्या बाजूनें हातांत धरून आपल्या हातांतील लोखंडाचा इंगा चांभार त्याच्यावरून जोरानें फिरवितो. असें त्यानें एकदोनदां केलें म्हणजे तें अडमुठें कातडें अंगावरून वारें गेल्याप्रमाणें, अगदीं ढिलें पडतें. हा अर्थ ध्यानांत आला म्हणजे "मोठे खाडखाड बोलत आहेत पण एकदां साहेबापुढल्या नोकरीचा इंगा फिरला म्हणजे नरम येतील" या टीकावाक्यांतील रूपकाची खरी खुमारी ध्यानांत येईल. "पण काकासाहेब **ठिय्या देऊन** बसले होते ते हलेच-नात" या वाक्यांतील 'ठिय्या' शब्द आपण सुतारखान्यांतून उचललेला आहे. पायाखालीं धरून जर एकादी फळी रंधा-वयाची असली तर ती पुढें निसटूं नये म्हणून पृष्ठिपत्ररूपी जें मोठें लांकूड खालीं असतें त्याला एक आडवी पट्टी सुतार लोक ठोकतात, व तिच्या अटणीला ही रंधावयाची फळी लावतात. ही जी लहानशी आडवी ठोकलेली पट्टी असते तिला '**ठिय्या**' असें म्हणतात. ती जशी हालत नाहीं, तसे काका-साहेबहि हालत नाहींत, असें हें मूळचें रूपक होतें. अशा

प्रकारचे अनेक शब्द आपण धंदेवाइकांकडून उचलले आहेत हें खरें; पण खुद्द धंदेवालेच जेव्हां वाङ्मयांत उतरतील तेव्हां ही रूपकांची भरती झपाट्यानें होईल.

याच विचाराची खुलावट आजहि कल्पनेनें करतां येण्यासारखी आहे. एकादा **गवंडी** जर लेखन–व्यवसायांत पडला व त्याला "विचाराची level पुरेशी वर गेलेली नाहीं" असें म्हणावयाचें असेल तर कदाचित् तो म्हणेल कीं, "विचाराची **कमान** जितकी उंच व्हावयास हवी तितकी झालेली नाहीं." त्यानें एकावर एक तर्कसिद्ध अनुमानें करून जर मोठेंच पक्षपात–राहित्य दाखविलें असलें तर कदाचित् तो म्हणेल कीं, "ही एवढी परंपरा मीं उभी केली आहे, सज्जनांनीं खुशाल **ओळंबा लावून पाहावा** व कोठें पक्षपात दिसतो का सांगावें." गांवांत कांहीं शिष्ट माणसें पुढारी म्हणून मिरवितात. पण चळवळीची सगळी दगदग मागें राहून काम करणाऱ्या कांहीं व्यक्तींनाच पडते व वास्तविक तेच पुढारी असतात. हा विचार आपल्या पेशाला अनुसरून व रूपकानें बोलतांना तो गवंडी असा वर्णील कीं, अमुक अमुक गृहस्थ हे **दर्शनी** पुढारी आहेत; पण तमुक गृहस्थ हे बापडे **दुबाव** पुढारी म्हणजे भिंतींत लपलेल्या खांबासारखे आहेत. **परीट** वाङ्मयांत आला व कितीहि बोललें तरी आपल्या तोंडाला हा सुरकुतीहि पडूं देत नाहीं, असें वर्णन त्याला करावयाचें असलें तर तो लिहील कीं, लोक इतके अद्वातद्वा बोलले पण त्यानें तोंडावरची **इस्त्री** बिलकूल बिघडूं दिली नाहीं. **तेली** सार्वजनिक कामांत पडला व प्रयत्नपरंपरेपैकीं एकादा प्रयत्न जर नीट साधला नाहीं तर तो म्हणेल कीं,

—' हा **घाणा** नीट निघाला नाहीं.' वक्त्याचें वक्तृत्व श्रोत्यांच्या भावनेसह वाढत वाढत जाऊन त्याचा कळस झाला व श्रोत्यांनीं 'वाहवा' म्हणून टाळी दिली व या प्रसंगाचें वर्णन करण्याचें काम एकाद्या **गवयाकडे** असलें तर तो लिहील कीं, 'वक्ता व श्रोते हे **समेवर आले**.'

एकादा **न्हावी** जर कौन्सिलचा मेंबर झाला व 'आपण आपलें मांडावयाचें बिल तपशिलासह उत्तम तयार करून ठेविलें आहे व आपण आपली पाळी येण्याची वाट पहात आहों' असें त्यास म्हणावयाचें असलें तर तो म्हणेल कीं, 'मी अगदीं **पाणी लावून बसलों** आहें, वेळ आली कीं चटपाटणें चालू करतों!' एकाद्या वक्त्याच्या बोलण्यांतील तत्त्व जर समारच असलें पण त्यानें कडक भाषा, वाह्यातपणा यांचा अंगीकार करून भाषण मोठें कडक झालें असल्याचा देखावा केला असला तर त्याचा **कोष्टी** टीकाकार म्हणेल कीं, 'वक्त्यानें भाषणाला **खळ** फार लावलेली आहे, वास्तविक पाहतां त्यांतलें **सूत** अगदींच नरम आहे.' हाच कोष्टी आपलें बिलावरचें भाषण संपवितांना म्हणेल कीं, 'सभ्य गृहस्थहो, माझें हें **सणंग** आपल्याला पसंत पडतें का पाहा.' परदेशांतून नाना प्रकारचीं तत्त्वें इकडे आणावीत पण आपल्याला कोणतें मानवतें तें पत्करावें व बाकीचें टाकावें, हा विचार व्यक्त करितांना प्रस्तुत **कोष्टी** लेखक म्हणेल कीं, '**जांगड माल** वाटेल तितका आणावा; पसंत पडेल तो ठेवून घेऊं, बाकीचा परत पाठवूं.' ज्याच्यावर हल्ला करावयाचा त्याच्यावर नेम धरून झांप घेतली पाहिजे, हा विचार प्रकट

करतांना एकादा **शिकारी** वावदूक म्हणेल, '**किरण साधून** उडी टाकली पाहिजे.'

'आपण आपले साधे गडी आहों' असें शेतकरी वक्त्यास सांगावयाचें असलें तर तो म्हणेल, 'माझें बोलणें अगदीं **रासवळ** आहे, यांत **गांवरानपणा** म्हणजे तिखटपणा कसलाहि नाहीं.' तसेंच, 'चळवळ अगदीं यशस्वी होण्याची वेळ आली पण सरकार कोपल्यामुळें तिची पिछेहाट झाली' हा विचार शेतकरी वक्ता असा सांगेल कीं, 'चळवळ अगदीं **पोटऱ्याला आली** होती; पण सरकारी अवकृपेचा **कडाका** पडला व ती **करपून गेली.**' आपल्या विद्यार्थ्यांना एकाद्या विषयाची एकदां समजूत देऊन पाहिली, ती अपुरी म्हणून पुन्हां एकदां देऊन पाहिली, पण तीहि अपुरी पडते असें दिसतांच, शिक्षक स्वतः मूळचा जर **रंगारी** असला तर आपल्याशीं उद्गार काढील कीं, 'तिसरा हात द्यावयास पाहिजे!'

वरील उदाहरणेंसुद्धां मीं केवळ अनुमानानें बसविलीं आहेत. मला त्या त्या धंद्याची तपशीलवार माहिती नाहीं. अर्थात् त्या त्या धंद्यांतील लोक जेव्हां लेखनाचें व वक्तृत्वाचें कसब हस्तगत करतील तेव्हां त्यांनीं खंत न मानतां आपापलीं परिचित रूपकें लेखनांत प्रविष्ट करावीं. त्यांचा पुष्कळदां उपयोग झाला म्हणजे तीं सर्वांच्या परिचयाचीं होतील व भाषेंत साधे शब्द म्हणून नव्या अर्थानें वावरूं लागतील. अशा तऱ्हेनें मराठी-

तील शब्दांचा भरणा झपाट्यानें वाढेल. याचा अर्थ असा कीं, आपल्या समाजांत शिक्षण फैलावलें पाहिजे व **लिहिणें, बोलणें हे व्यवसाय जे एकाच वर्गाकडे आहेत ते सर्व वर्गांत फैलावले पाहिजेत.** तसें झालें म्हणजे सर्व समाजांच्या निरनिराळ्या वासना, त्यांचे रागलोभ, त्यांच्या आकांक्षा, चित्र-विचित्र रूपकांचीं रूपें धारण करून पुढें येतील. एकीकडे सर्व समाजांचें मनोगत व्यक्त होण्याचें कार्य होईल व दुसरीकडे शब्दकोश पुष्ट होत जाईल. वर दिलेल्या विवेचनावरून ' भाषा समृद्धीकडे सामाजिक दृष्टीनें पाहणें ' म्हणजे काय याचा पुरेसा बोध होईल अशी नम्र आशा आहे.

आतांच सांगितलेला विचार योग्य आहे हें सिद्ध करण्यास एक गमतीचा पुरावा आहे. व्यावहारिक जीवनांत सर्व धंदेवाले उतरले म्हणजे ते आपापलीं रूपकें घेऊन येतील हें, याच धंदेवाल्यांनीं परमार्थ-जीवनांत उतरल्यावरोबर तसें केलें होतें कीं नाहीं हें पाहिल्यानें, सिद्ध होण्यासारखें आहे. ज्ञानेश्वर-महाराजांनीं भक्तिमार्गाचीं कवाडें सर्वांस मोकळीं करितांच अनेक जातींत संत उत्पन्न झाले. या संतांनीं आपापले पारमार्थिक आनंद व अनुभव वर्णिले आहेत. या वर्णनांत त्यांनीं आपले परमार्थ-विचार आपल्याला परिचित अशा उपमांनीं व रूपकांनीं फार सुंदर तऱ्हेनें व्यक्त केले आहेत. हे परमार्थ-विचार व्यक्त करितांना त्यांनीं जें केलें तेंच व्यावहारिक विचार व्यक्त करितां-नाहि त्यांच्या हातून खास होईल, हें स्पष्ट आहे. परमार्थ-विचार सांगतांना त्यांनीं काय केलें आहे तें पाहा:—

22113

**नरहरि सोनार** म्हणतो:—

देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार ।। १ ।।
देह **बागेसरी** जाण । अन्तरात्मा नाम **सोनें** ।। २ ।।
त्रिगुणाची करुनी **मूस** । आंत ओतिला ब्रह्मरस ।। ३ ।।
जीव–शिव करुनी **फुंकी** । रात्रंदिवस **ठोकाठोकी** ।।४।।
विवेक **हातवडा** घेऊन । कामक्रोध केले चूर्ण ।। ५ ।।
मनबुद्धीची **कातरी** । रामनाम **सोनें चोरी** ।। ६ ।।
ज्ञान–**ताजवा** घेउनि हातीं । दोन्ही अक्षरें जोखिती ।।७।।
खांदा वाहोनी **पोतडी** । उतरला पैलथडी ।। ८ ।।
नरहरि सोनार हरिचा दास । भजन करी रात्रंदिवस ।।९।।

**सावतामाळी** म्हणतो:—

कांदा मुळा भाजी । आवघी विठाबाई माझी ।। १ ।।
लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।। २ ।।
मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।। ३ ।।
सावता म्हणे केला मळा । विठ्ठलपायीं गोविला गळा ।।४ ।
आमुची माळीयाची जात । शेत लावूं बागाईत ।। १ ।।
आम्हां हातीं मोटनाडा । पाणी जात फुलझाडा ।। २ ।।
**शांती–शेवंती** फुलली । **प्रेम–जाईजुई** व्याली ।। ३ ।।
सावतानें केला मळा । विठ्ठल देखियेला डोळां ।। ४ ।।

सेना न्हावी म्हणतो:—

आम्ही वारीक वारीक । करूं हजामत बारीक ॥१॥
विवेक-दर्पण आयना दाऊं । वैराग्य-चिमटा
हलवूं ॥२॥
उदक-शांती डोई घोळूं । अहंकाराची शेंडी
पिळूं ॥३॥
भावार्थाच्या बगला झाडूं । कामक्रोध-नखें
काढूं ॥४॥
चौवर्णा देउनि हात । सेना राहिला निवांत ॥५॥

# २. शिक्षकानें केव्हां मरावें ?

शिक्षकानें केव्हां मरावें हा प्रश्न खरोखरीच विचार करण्यासारखा आहे. इतर धंद्यांतल्या लोकांनीं केव्हां मरावें हें त्यांचें त्यांनींच ठरवावयास हवें. मला त्यांच्या धंद्याची इतकीशी माहिती नाहीं. पण शिक्षकानें केव्हां मरावें याचा विचार, त्या धंद्यांतच मी आज तेहतीस वर्षें असल्यामुळें माझ्या मनांत अनेकदां येऊन गेला आहे. विचार करतां असें दिसतें कीं, नोकरीचीं पंचवीस वर्षें भरलीं किंवा वयाचीं पंचावन्न वर्षें भरलीं म्हणजे शिक्षकानें मरावें. अर्थात् या दोहोंपैकीं कोणतीहि एक मुदत भरली कीं शिक्षकानें ती संधि साधिली पाहिजे. एकादे वेळीं असें होईल कीं वय पंचेचाळीस वर्षांचेंच असावें; पण नोकरीचीं पूर्ण पंचवीस वर्षें मात्र भरलेलीं असावींत; तरी तीच संधि शिक्षकानें साधिली पाहिजे. दुसऱ्या एकादे वेळीं असें घडेल कीं वय पंचावन्न झालें आहे पण नोकरीचीं पंचवीस वर्षें पुरीं भरलेलीं नाहींत; तरी तीच संधि शिक्षकानें साधिली पाहिजे.

अर्थात् दयाळू वरिष्ठांनीं रूढ नियम थोडा बाजूला सारून आणखी कांहीं वर्षें नोकरी करूं द्यावयाचें ठरविलें तर मात्र शिक्षकानें मरण्याची गडबड करूं नये. त्या वेळीं न मरण्यांतच त्याचें हित आहे. एक तर त्याला जास्त जगतां येईल व दुसरें, मुलांमाणसांची व्यवस्था करावयास त्याला आणखी वेळ सांपडेल. पण दयाळू अधिकारी दर ठिकाणीं आढळांत येतीलच असें म्हणवत नाहीं. बहुतेक अधिकारी शिस्तीचे व कराराचे करडे भक्त असतात. या उदात्त वस्तूंच्या पलीकडे तारतम्य आणि मायाळूपणा यांचा एक परगणा आहे याची त्यांना ओळख झालेली नसते. ज्या थोड्यांना ही ओळख झालेली असते, ते शिक्षकाला ठेवून घेतात. असें झालें तर त्या शिक्षकानें गडबड करूं नये. एरवीं मात्र पंचवीस वर्षें नोकरी किंवा पंचावन्न वर्षें वय यांपैकीं जें कोणचें आधीं भरेल तेंव्हांच शिक्षकानें इह-लोकाला प्रीतिपुरस्सर नमस्कार ठोकावा हें चांगलें.

जर एकाद्या शिक्षकानें आरंभापासून सावध राहून कांहीं माया केलेली असली तरहि त्यानें थोडें दमानेंच घ्यावें. पण ही माया करण्याचा योग एकाद्याच शिक्षकाला येतो. इतरांना हा योग आणतां येत नाहीं याचें कारण असें आहे कीं, मिळणारा पगार हा अत्यंत माफक असल्यामुळें तो जी कांहीं खटपट करतो तिची कमाई सगळीच्या सगळी भरीस घालावी तेंव्हांच प्रपंचाची तोंडमिळवणी होते; पण ही खटपटीची संधीहि अने-कांना मिळत नाहीं. खटपट म्हणजे काय, तर शिकवण्या करणें. त्या मिळतातच असें नाहीं व बऱ्याच ठिकाणीं शिस्तीचे इतके बारीक बारीक पर्याय प्रचलित केलेले असतात कीं, त्या मिळ-ण्यासारख्या असल्या तरी पत्करितां येत नाहींत. अधिकाऱ्यांची

इच्छा अशी असते कीं, शिक्षकांनीं आपली सर्व सामर्थ्यें आपल्या शाळेच्या कामाकडे एकाग्रतेनें लावावीं. भावी पिढीच्या पायाचे दगड घडण्याचें महामहत्त्वाचें काम त्यांच्याकडे पूर्वपुण्याईनें जर आलेलें आहे, तर त्या कामाकडे त्यांनीं आपलें तनमनधन लावलेंच पाहिजे. हें पवित्र काम त्यांच्या हातून व्हावें म्हणून शिस्तीची कैची तयार केलेली असते. शिक्षकलोक अज्ञानामुळें या कैचीविरुद्ध तक्रार करीत असतात. पण त्यांना आपलें स्वतःचें हित कळत नाहीं ! भावी पिढीची तयारी त्यांनीं करावयास नको काय? तें करतांना सर्वस्वाचें अर्पण करणें आवश्यक आहे. पण कांहीं शिक्षक मधेंच आपल्या प्रापंचिक ओढाताणीची भाषा बोलूं लागतात. वास्तविक पाहतां हें त्याचें करणें अगदीं अप्रस्तुत असतें; आणि कैचीचा प्रयोग त्यांच्यावर सुरू करणें, भावी—फारच भावी—पिढ्यांच्या हितासाठीं अधिकाऱ्यांना भाग पडतें. स्वाभाविकच शिक्षकांना चालू प्रपंचाचीच भ्रांत, तेथें वार्धक्यासाठीं माया कोठली होणार? म्हणून वर म्हटलें आहे कीं, अशी माया जर करतां आलेली नसली तर ठराविक मर्यादेवर येऊन पोहोंचतांच शिक्षकानें मरावें हें त्याच्या हिताचें आहे.

* * * *

आपल्या संसारांतील ओढगस्तपणानें शिक्षकानें चिडून जाऊं नये म्हणून कांहीं तत्त्वज्ञानाचें समाधान त्याला प्राप्त करून देणें अगत्याचें बनतें. हें तत्त्वज्ञान म्हणजे स्वार्थत्यागाचें होय. शिक्षकानें स्वार्थत्याग केला पाहिजे, असा घोष पूर्वीं कधींकाळीं सुरू झालेला आहे तो जशाचा तसा चिंतू—सोन्याप्रमाणें अखंड टिकून आहे. अर्थात् अनेक धूर्तांनीं हा मंत्र चालू

ठेवलेला असल्यामुळें भोळ्या शिक्षकालाहि असें वाटूं लागतें कीं, आपण स्वार्थत्यागपूर्वक काम करीत आहों; आपण स्वार्थत्याग करीत आहों. ते जे टिळक–आगरकर होऊन गेले त्यांच्याच पीठिकेंतील स्वार्थत्यागाचे अवतार आपण आहों. पण मला पुष्कळदां असें वाटत आलें आहे कीं, ही स्वार्थत्यागाची जबाबदारी शिक्षकांवरच कां कोसळते? देशांत काय इतर धंदेवाले लोक नाहींत? स्वार्थत्यागाची निशा एकट्या शिक्षकालाच कां उत्पन्न करून द्यावी? मामलेदार, फौजदार, डाक्तर, विशेषत: रजिस्ट्रार या लोकांनासुद्धां स्वार्थत्यागाचें तत्त्व कां शिकवीत नाहींत? त्यांचीं कामें हीं शिक्षणदानासारखींच परम उदात्त आहेत. न्याय देणें हें काम काय ज्ञानदानापेक्षां कमी उदात्त आहे? गरीब प्रजांना नागविणाऱ्यांना पकडून आणून कोर्टांत उभें करणें हें केवढें तरी उदात्त काम आहे बरें! लोक वेळीं-अवेळीं वाटेल तेव्हां मरण्याचें मनांत आणितात; आणि रजिस्ट्रार लोकांना आपली झोंप मोडून त्यांचें मृत्युपत्र दाखल करून घेण्यासाठीं त्यांच्या घरीं जावें लागतें. मुमूर्षूची इच्छा तृप्त करणें यासारखें उदात्त काम दुसरें कांहीं असेल असें वाटत नाहीं. अशा या उदात्त कामांत गुंतलेल्या लोकांना स्वार्थत्यागाचें तत्त्व कां शिकवीत नाहींत? स्वार्थत्यागाचा ससेमिरा केवळ शिक्षकाच्या मागें कां? पण स्वार्थत्यागाला अशी दुष्ट खोड लागली आहे कीं, तो आपला शिक्षकाच्या आश्रयाला येतो!

वास्तविक पाहतां अलीकडे जो एक नवा शोध लागला आहे तो लक्षांत घ्यावयास हवा. सध्यां जें शिक्षण मिळतें तें कुचकामाचें आहे असें महात्मा गांधींनीं पूर्वीच, म्हणजे अवतारकृत्याच्या आरंभींच सांगून टाकिलें आहे. मला त्यांचें म्हणणें

अगदीं खरें वाटतें. आम्ही शिक्षण देतों तें कुचकामाचें असलेंच पाहिजे; कारण गांधीजीच खुद्द म्हणतात कीं, तें तसें आहे. अर्थात् तें तसें असलेंच पाहिजे. क्षणभर मतभेद असला तरी शिस्तीसाठीं आपण तें त्यांचें म्हणणें मान्य केलेंच पाहिजे. पण अशा या शिक्षणासाठीं—म्हणजे कुचकामी शिक्षणासाठीं—शिक्षकांनीं स्वार्थत्याग करावा हें मात्र मला कसेंसेंच वाटतें. शिक्षण खरोखरीच उदात्त असतें तर स्वार्थत्यागांत कांहीं तात्पर्य होतें; पण असल्या कुचकामी शिक्षणासाठीं अगाऊच गरीब असलेल्या शिक्षकांना आपण स्वार्थत्याग करावयास लावणें अप्रशस्त आहे. कुचकामी नसलेल्या शिक्षणाच्या ज्या शाळा निघालेल्या असतील त्यांतील शिक्षकांना स्वार्थत्याग—अगदीं निपटून स्वार्थत्याग—शिकविणें बरोबर आहे. त्या शाळांना फंड, वर्गण्या वगैरे कांहीं लागत असेल, असें मला वाटत नाहीं. कारण स्वार्थत्यागाच्या थोर तत्त्वावर त्या चाललेल्या असणार; आणि हा स्वार्थत्याग तेथील शिक्षकांना करावयासच हवा. कारण ते जें शिक्षण देतात तें कुचकामाचें नसतें. पण आपल्या या ज्या एरवींच्या शाळा आहेत त्या जर असलें गचाळ शिक्षण देतात तर त्यासाठीं त्यांतील शिक्षकांना स्वार्थत्याग करावयास सांगणें युक्त नाहीं. इतर कित्येक खात्यांतील कांहीं कांहीं लोक लोकसेवेंत आपलें देहभान इतकें विसरतात कीं, आपल्या प्रपंचाचा भार जनतेवर लोटून ते खुशाल कार्यमग्न होऊन जातात. शिक्षकाला तेंहि करितां येत नाहीं. त्याला आपला प्रपंच आपल्यालाच संभाळावा लागतो. अशा आपत्तींत त्याला पुन्हां स्वार्थत्याग करावयास सांगणें क्रूरपणाचें आहेसें वाटतें.

पण स्वार्थत्यागाचा फैलाव अद्यापि पुरेसा झालेला नाहीं असें दिसतें! जितकीं कुळें दारिद्र्याच्या गर्तेंत जावयास हवींत तितकीं अजून गेलेलीं दिसत नाहींत! अजूनहि स्वार्थत्यागाच्या प्रादुर्भावाला अनुकूल भूमि बरीच शिल्लक आहे असें दिसतें. अजूनहि कित्येकांच्या प्रपंचाची पुरेशी आबाळ झालेली दिसत नाहीं! इतका स्वार्थत्याग झाला तरी अजून कांहीं पदवीधरांना किंवा सुशिक्षितांना वरा घांस मिळण्याचा संभव शिल्लकच उरला आहे! हा काय प्रकार आहे? अजून कित्येकांच्या मुली खात्यापित्यांच्या घरीं पडण्याची अल्प तरी खात्री आहेच! अजून स्वार्थत्याग पुरता भिनलेला दिसत नाहीं! म्हातारपण आल्यावर सुखासमाधानानें गोळाभर अन्न मिळविण्याची लायकी अजूनहि कांहीं कुटुंबांत शिल्लक राहिली असावी असा वळकट वहीम येतो! इतका स्वार्थत्याग प्रतिपादूनसुद्धां, आपण मरून जातांच घरच्या माणसाची पांगापांग व्हावी अशी स्थिति अजूनहि कित्येकांना लाभलेली नाहीं, हें आश्चर्य नव्हे काय? मुलगा नादारी मागावयास जावा व बायको सैंपाकास राहावी असा मंगलदिन उगवण्याची शाश्वती अजूनहि कित्येक घराण्यांत उत्पन्न झालेली नाहीं हें पाहून दुरून स्वार्थत्यागाचें सुख अनुभविणारांना परम विस्मय वाटत आहे! इतक्या प्रतिपादनाचें झालें तरी काय? पालथ्या घागरीवर पाणी असा प्रकार झाला कीं काय? प्रपंचाच्या जपणुकीचें किल्मिष अजूनहि कित्येकांच्या मनाला चिकटून राहिलेलें दिसतें! इतकें झालें तरी, थोडा नाहीं थोडका नाहीं, हजार हजार रुपयांचा विमा हे लोक भरतिच आहेत! ते सावकाराकडे खेटे घालावयास लागलेले कधीं बरें दृष्टीस पडतील? चौकांतील वाणी त्यांचा पदर धरून

ओढीत आहे, असें उत्तेजक दृश्य कधींकाळीं दिसेल काय ? कित्येक लोक अजून असे आहेत कीं, त्यांच्या शिक्षणावर खर्च झालेल्या रकमेवरच्या मासिक व्याजाइतका पैसा त्यांना अजूनहि दरसाल मिळत आहे ! हें काय आहे ? स्वार्थत्यागाच्या प्रतिपादनाला अजून पुष्कळच जागा शिल्लक आहे ! हे कांहीं कांहीं लोक अद्यापि मान वर काढून सडकेनें कसे जात आहेत ? हे अजून हंसतच आहेत ! रया पुरती गेल्याची भेसूररम्य छाया यांच्या मुखावर अजून पसरलेली नाहीं, हें काय स्वार्थत्याग पटल्याचें चिन्ह समजावयाचें ? अजून पाहणी पुरती झालेली नाहीं. कित्येक टावकीं अशीं आहेत कीं, जेथें शांति व समाधान अद्यापि रेंगाळत आहेतच ! मोठी नवलाची गोष्ट आहे ! स्वार्थत्यागाची लागण या टावक्यांत केव्हां बरें होईल ? हे पाहा कांहीं सुशिक्षित लोक; यांना अजून प्रतिष्ठा प्राप्त होत आहे. करकरणारें दारिद्र्य भेटीला जोंपर्यंत आलें नाहीं तोंपर्यंत असेंच चालणार ! यांना समाजांत प्रतिष्ठा मिळतच राहणार ! यांच्या घरादाराचा उन्हाळा जेव्हां होईल आणि यांचीं बायकापोरें देशोधडीला लागतील तेव्हांच स्वार्थत्यागाचें बीं येथें पुरें रुजलें असें म्हणतां येईल !

वरील विचारप्रणाली लक्षांत घेऊन सरकारनें आपलें शिक्षणविषयक धोरण गेल्या दोन तीन वर्षांत आंखलेलें दिसत आहे. सरकारी हायस्कूलें बंद करण्याचें धोरण त्यानें चालू केलेलें आहे. शिक्षणाचें काम त्यानें लोकांच्या अंगावरच सोंपविण्याचें ठरविलेलें दिसतें. अर्थात् ठिकठिकाणीं स्वार्थत्यागाला जोराचें आवाहन आतां होऊं लागेल आणि देशभक्तीचा महिमा व समाजसेवेचें रहस्य यांचेंहि संकीर्तन

चालूं होईल. या वेळीं तरुण लोकांनीं सावध राहिलें पाहिजे. समाजाचें कल्याण करण्याची सरकारची इच्छा आहे; आणि लोकधुरीणांचीहि तीच इच्छा आहे. सुशिक्षित पदवीधरांनीं आतां सावध राहिलें पाहिजे. कारण सरकार व पुढारी लोकांच्या कल्याणास प्रवृत्त झाले आहेत! आतां काय काय होईल तें सांगवत नाहीं! कोणाकोणाचें कसकसें कल्याण होईल याचा नियम नाहीं! या कल्याणकारी मंडळांत पदवीधरांनाचसे काय अर्धशिक्षितांनाहि ओढण्याचा त्यांचा बेत दिसतो. शिक्षण सार्व-त्रिक व्हावयाचें आहे! मनुष्यमात्राला शिक्षणाचा लाभ व्हाव-याचा आहे! हें शिक्षण फैलावण्याच्या कामीं पदवीधरांची व अल्पशिक्षितांची जरूरी आहे; आणि देशांत म्हणजे सरकारजवळ तर पैसा नाहीं. या बाबतींत सरकार व पुढारी यांचें एकमत आहे! धोक्याची जागा हीच आहे. कारण पदवीधरांच्या व अल्पशिक्षितांच्याहि स्वार्थत्यागबुद्धीस आवाहन सुरू होण्याचा योग आतां दिसतो. देशभक्तीनें प्रेरित होऊन चिपळूणकर, टिळक, आगरकर यांनीं स्वार्थत्यागानें कामास सुरुवात केली तेव्हांच सरकारनें ओळखिलें कीं, या सुशिक्षितांना स्वार्थत्यागाची चटक लागली आहे. तें त्यागाचें लोण अगदीं सामान्य शिक्षितांपर्यंत गेलें आणि सरकारला हायसें झालें! त्याच्या खांद्यावरचा भार कमी झाला! त्यानें या लोकांच्या स्वार्थत्यागाची खूप स्तुति चाल-विली. त्यांच्या जिवंत देशभक्तीचा पुरेपूर फायदा त्यानें घेतला. सध्यां याच सरकारी प्रवृत्तीला महापूर येण्याचा संभव दिसतो. पुढारीहि तेंच बोलूं लागले आहेत. अशा वेळीं सुशिक्षितांनीं सावध राहिलें पाहिजे. आणि व्यवहारबुद्धीनें शिक्षण देण्याच्या धंद्यांत पाऊल टाकिलें पाहिजे. शिक्षकाचा धंदा हा धंदा आहे हें त्यांनीं

ओळखिलें पाहिजे. तो पत्करिल्यावर प्रामाणिकपणें व इमानानें करावा हें निराळें. पण तो धंदा आहे; स्वार्थत्यागाचा, देश-प्रेमाचा भाग नाहीं हें त्यांच्या ध्यानांत हवें. आणि म्हणून नव्या संस्थांत शिरतांना आमच्या प्रपंचाची व म्हातारपणाची काय: व्यवस्था करतां, असें त्यांनीं संस्था काढणाऱ्यांस व मुख्यत: सरकारास विचारावें.

शेतकरी, कामकरी, हस्तव्यवसायी यांच्यासंबंधानें मोठाच गलबला चालू आहे. त्यांत आपणहि सहानुभूतीनें सामील होतों. ही सामाजिक सहानुभूति अवश्य हवी; पण त्या गडबडींत आपणहि कामकऱ्यांपैकींच आहों हें आपण विसरतों. व्यवसायी माणसाला, थोडाबहुत व्यापारटापार करणाऱ्याला धंदा असतो. मुलगा काय करील याची त्याला काळजी नसते. शेतकऱ्याचें असेंच असतें. तो नाहींसा झाला तरी शेत शिल्लक-च असतें. पुढच्या मुलाबाळांना निर्वाहाचें साधन शिल्लक उरतें. शेतकरी थकला तरी शेतकाम बाकीचीं घरचीं माणसें कसें ना कसें करीत असतात. आपल्या धंद्याचें असें नाहीं; तो आपल्यालाच करतां येतो. आपण थकतांच तो धंदा बसतो. मुलाबाळांसाठींच तें निर्वाहाचें साधन सातत्यानें घरांत ठेवितां येत नाहीं. आपली स्थिति कामकऱ्यासारखी मात्र खास असते. त्याचें जसें हातावर पोट चालतें व हात थकला कीं सगळेंच गाडें थांबतें, तसेंच आपलें आहे इकडे लक्ष हवें. म्हणून नव्या संस्थांत शिरतांना व जुन्यांशीं करार करतांना सावध असा-वयास हवें. या कामीं सरकारास जाब विचारावयास हवा. त्यानेंच या आपत्काळाची व्यवस्था करावयास हवी. नोकरी करितांना कसेंबसें पोट भरण्याची व्यवस्था आणि वार्धक्यांत

अगदींच उन्हाळा अशा दोनहि तऱ्हांनीं आपल्या जीविताचा ग्रास होत आहे इकडे लक्ष असावयास हवें. अशा परिस्थितींतून एक आपत्ति आणखी निघण्याचा संभव आहे. आपल्यापैकीं पुष्कळांचें घरचें पहिल्यापासूनच कांहीं फारसें बरें असत असें नाहीं. पण तसें असलें तरी परंपरेनें प्राप्त झालेल्या कांहीं सांस्कृतिक कल्पनांनीं आपण शाबूत राहातों. कांहीं सद्गुणाच्या कल्पना, विशेष प्रकारची पापभीरुता व कांहीं पापपुण्याच्या भावना यांच्या आश्रयानें कसल्याहि कऱ्या दारिद्र्यांत नेकीनें राहण्याची चाल शेंकडोंच्या शेंकडों घराण्यांत पूर्वीपासून होती. आपलें जीवित या चालीनें पूर्णपणें अंकित झालेलें असे. पण आतां सर्वच सांस्कृतिक कल्पना ढांसळत चालल्या आहेत; नवा बनाव केव्हां होईल तो होवो. तो होईपर्यंत या संक्रमणाच्या अवस्थेंत मोठी चमत्कारिक स्थिति झालेली आहे. जुन्या कल्पना नव्या युगमानानें बदलून जातात व बदलाव्याहि लागतात हें मलाहि माहीत आहे; पण माझें बोलणें संक्रमणकालाचें आहे. वरील सत्कल्पना आणि भावना नाहींतशा झालेल्या व त्यांतच दारिद्र्य, अशी युति झाली म्हणजे गुन्हेगारीकडे प्रवृत्ति जलदीनें होईल. त्या सद्भावना घालविण्याचे अनेक यत्न अनेकांकडून चालू आहेत; दारिद्र्यहि झपाट्यानें येत आहे. या दोहोंचा संगम पातकांकडे निलाजरेपणानें वळण्याची प्रवृत्ति उत्पन्न करील हा धाक वाटतो. म्हणून स्वार्थत्यागाची कमालमर्यादा आपण गांठली आहे हें ओळखून जास्त स्वार्थत्याग करूं नका. सद्गुणालाहि मर्यादा आहे, आणि आपण प्रापंचिक आहों हें ध्यानांत हवें. जे गोसावी राहाणार असतील त्यांच्याविषयीं मला येथें कांहींच

सांगावयाचें नाहीं. प्रापंचिकांविषयींच सांगावयाचें आहे. त्यांनीं जास्त स्वार्थत्याग करूं नये. संस्था काढतांना व त्यांत शिरतांना निपटून स्वार्थत्यागाची भूमिका मुळींच पतकरूं नये. सगळ्या लोकांनीं आपापल्या पोटांवर थापट्या मारीत हक्कांचों बोलणीं करीत राहावें आणि तुम्ही मात्र स्वार्थत्यागाच्या भ्रांत कल्पनांनीं भ्रांतिष्ट बनून आपलें व आपल्या माणसांचें निर्दालन करावयास गप्प बसून प्रवृत्त व्हावें, हें बरें नव्हे. त्यांतहि नाइलाजानें पोटाचा दरा भरण्यासाठीं हा उद्योग करीत राहणें भागच पडलें तर मरावें केव्हां हें मीं आरंभीं सांगितलें आहे. संस्थाचालक जर सहानुभूति, तारतम्य, माणुसकी यांनीं प्रेरित असले तर कराराला ओलांडून तुम्हांला चार दिवस आणखी ठेवून घेतील. तें त्यांचें भलेपण आहे. पण तेवढ्यानें भागत नाहीं. ते चार दिवस गेल्यावर 'पुढें काय?'—हा प्रश्न आपल्याला सोडवावयास हवा. तो सोडवितां न येईल तर किंवा अधिकारी लोक करारनाम्याचे अतीव भोक्ते असले तर पंचवीस वर्षें नोकरी भरतांच किंवा पंचावन्न वर्षें वय होतांच शिक्षकानें मरावें हें युक्त आहे.

# ३. शृंगार : रसांचा राजा

शृंगारानें मनाला सुख उत्पन्न होतें. त्याची घनदाट छाया जरी थोडी किसळ आणणारी व कुबट वाटली तरी तिचें शीतलत्व मात्र अत्यंत आल्हादकारक वाटतें, आणि आपल्या जीवितांतील सुखदु:खें तपासून पाहिलीं तर तीं या रसाच्या छायोपछायांनींच उत्पन्न झालेलीं आहेत असें दिसेल. आपल्या सर्व जीविताचें एकाच ढांगेंत आक्रमण करणारा जर कोणता रस असेल तर तो शृंगार हा होय. त्याप्रमाणेंच आपल्या जीविताशीं सदैव निबद्ध राहणारा रसहि हाच होय. आम्हांला वगळा म्हणजे काय होईल हें केशवसुतांनीं सांगितलें आहे; पण प्रत्यक्ष शृंगारच जर कविता करूं लागला आणि 'आम्हांला वगळा' म्हणजे काय होईल हें तो सांगूं लागला, तर त्याच्या त्या विवेचनानें मन खरोखरच खिन्न होईल. जीवितांत कसलीहि गोडी शिल्लक राहणार नाहीं. फार काय सांगावें—खुद्द जीवितच आटोपण्याची पाळी येईल, असा हा सर्व जीवित-

व्यापी रस आहे. अर्थात् प्रपंचाच्या बाकीच्या व्यवसायांत आपण कितीहि मग्न असलों, दु:खानें गांजलेलों असलों किंवा पोटापाठीमागें परागंदा झालेले असलों, तरी प्रपंचांतील आपल्या वांटेकरिणीची आठवण तसल्या प्रखर आपत्तींतूनसुद्धां जीवात्म्याला आंतून शीतल छायेचा प्रसाद देतच असते.

ज्याला प्रेम प्रेम म्हणून म्हणतात तीं कामाचीच पण झुळझुळीत छाया आहे; आणि दोघांच्याहि मनोगताचें नांव शृंगाररस हें आहे. कामुकतेचा भर फार झाला म्हणजे ज्याप्रमाणें जीवितांत, त्याप्रमाणें वाङ्मयांतसुद्धां किळस उत्पन्न होते आणि जीविताची कळा रुग्ण होत चाललेली आहे असें वाटतें. पण शृंगाराचें हें कामुकतेचें रूप सोडलें आणि त्याची पारदर्शी अशी प्रेम नांवाची वृत्ति लक्षांत घेतली म्हणजे जीवितांत जिकडे तिकडे आल्हादच दिसूं लागतो, जें जीवनांत तेंच वाङ्मयांतहि दिसतें. अजून भाकरी मिळविण्याचा प्रश्न इतका दगदगीचा, मनाच्या सर्व शक्ति खाणारा आणि दिवसाचा सगळा वेळ आटवून टाकणारा असाच उरलेला आहे; त्यामुळें मधून मधून प्रेमाचा एखादा झुरका घेण्यापलीकडे माणसाला कांहींच करितां येत नाहीं. त्याच्या छायेंत बसून मनसोक्त आनंद पावण्याइतकी उसंत त्याला मिळतच नाहीं. आणि हें न झाल्यामुळें त्या प्रेमाच्या बारीक व पातळ छाया, सूक्ष्म शलाका, आणि मिश्र भावना उत्पन्न करणारी परिवर्तनें आपल्या व्यवहारांत चालू असूनसुद्धां तीं माणसाच्या ध्यानांत येत नाहींत. त्यानें पाहावें केव्हां? पृथक्करण करावें केव्हां? आणि चिंतावें केव्हां? त्याला वेळच नाहीं! इंग्रजींत Leisure नांवाची एक कविता आहे. कवीनें या कवितेंत एक

मोठी मंजूळ तक्रार केलेली आहे. तो म्हणतो, "काय करावें, सवडच नाहीं! कुरणांत कपिला गाय डोळे टवकारून माझ्याकडे पाहात आहे, पण तिच्याकडे पाहात बसण्याला मला उसंतच होत नाहीं! आपल्या झुबकेदार शेपट्या पाठीवर घेऊन या खारोट्या झाडांच्या सालींवरून भराभर खालीं-वर जात आहेत. या किती सुंदर आहेत! पण त्यांच्याकडे पाहात बसावयास वेळ कसा तो होत नाहीं. या तरुण मुली पाहा! काय सुंदर नाच करीत आहेत! आणि ही पाहा--एक माझ्याकडे कटाक्ष फेकीत आहे! पण तिच्याकडे परत पाहावयास वेळच नाहीं. काय करावें!" कारण प्रत्येकाला भाकरीच्या मागें सारखें पळावें लागतें. आणि बहुतेकांना इतकें पळूनसुद्धां ती पुरती मिळतहि नाहीं. अर्थात् जीविताचा कांहीं भाग ती मिळविण्यांत खर्चीं पडणार, आणि उरलेला ती पुरती मिळाली नाहीं म्हणून दुःख करण्यांत किंवा सांगण्यांत निघून जाणार. असें झाल्यामुळें जीवितांतील 'प्रेम' नांवाच्या या सर्वगामी रसाचा आस्वाद घेण्याचा आणि त्याचे जे शेंकडों बारिक बारिक झरे प्रपंचांत झुळझुळ वाहात असतात त्यांच्या कांठीं बसण्यास माणसाला वेळच सांपडत नाहीं; आणि म्हणून या प्रपंचाचीं कवींनीं वाङ्मयांत काढलेलीं किंवा रंगभूमीवर वठवून दाखविलेलीं चित्रें पाहण्यांतच त्याचा जीव गर्क होऊन जातो. आपण पुष्कळदां असें म्हणतों कीं वाङ्मय आणि रंगभूमि येथें शृंगाराचेंच थैमान जास्त असतें; ही आपली तक्रार थोडीशी खरी आहे. जीवितांतील इतर रस आणि संसारांतील इतर नातीं हीं स्पष्ट दूर सारून केवळ याच रसाचें थारोळें लेखकांनीं केलेलें कोठें कोठें आढळतें आणि तेवढ्या पुरती आपली तक्रार बरोबर आहे. पण आपला सगळा प्रपंचच

जर याच रसबीजांतून उत्पन्न झालेला आहे आणि तो जर याच भूमिकेवर थाटलेला स्पष्ट दिसत आहे तर जेथें कोठें प्रपंचाचें चित्र काढण्याचा प्रसंग येईल तेथें हा रस येणें हें स्वाभाविक आहे; इतकेंच नव्हे, तर केवळ अटळ आहे. अशीं चित्रें वाङ्मयांत व रंगभूमीवर दाखविलेलीं असतात व तीं पाहण्यास आपण सर्वजण जातों याचें प्रमुख कारण आतांच सूचित केल्याप्रमाणें आपल्याला तीं तीं चित्रें प्रत्यक्ष प्रपंचांत दिसत असतांनासुद्धां पाहण्याला सवड नसतें हें होय. ज्यांनीं कोणीं तीं पाहत बसण्याचेंच काम पत्करिलेलें असतें त्यांना तीं उत्तम दिसतात व तीं वाङ्मयांत किंवा रंगभूमीवर ते प्रविष्ट करितात. मग आपण म्हणतों कीं, "हे फार मोठे लेखक आहेत!" पण त्याचें मूळ कारण हें आहे कीं, या किंवा इतर विकारांच्या ज्या अनुकूल किंवा प्रतिकूल वांकुल्या प्रपंचांत दिसत असतात त्या पाहावयास आपल्याला वेळच नसतो. अर्थात् वेळ असलेल्या प्रत्येक माणसाला त्या दिसतील असें सांगवत नाहीं. पण बहुतेकांच्या अंगांत इतकी रसिकता खास असते कीं त्या आकृती त्यांना दिसाव्या. लेखक, कवि इत्यादिकांत व आपल्यांत इतकाच फरक आहे कीं, दिसलेलें आपल्याला सांगतां येत नाहीं आणि त्यांना मात्र अत्यंत सुबकपणानें सांगतां येतें.

रंगभूमीवर किंवा वाङ्मयांत या रसाला शुद्ध कामुकता उत्पन्न झाली आणि तितक्याच सामान्य शब्दांनीं ती तेथें व्यक्त झाली तर तें आपल्या वृत्तीला पटत नाहीं. आणि आपल्या उच्च संस्कृतिविषयक कल्पनेला दंश झाल्यासारखा वाटतो. याचें कारण तरी असें आहे कीं, हे रस उत्पन्न

होण्याचीं जीं अगदीं प्राथमिक, जड व केवळ देहनिष्ठ अशीं कारणें आहेत तेथपर्यंत जाऊन पोहोंचावयास शास्त्रज्ञानविचारांत जरी हरकत वाटली नाहीं तरी रसविचारांत जाऊन पोहोंचावयास आपणांस लाज वाटते; कारण, आपल्या पशुत्वाची तेथें आपणांस ओळख होऊं लागते आणि मनुष्यत्व हें जों जों पशुत्वापासून दूर चाललें आहे तों तों आपली किंमत वाढत चालली आहे हें तर आपणांस स्पष्ट दिसून येतें. अर्थात् हें उच्च वातावरण सोडून अगदीं खोलांत जाऊन सृष्टीनें प्रस्थापित केलेली देहनिष्ठ अशी जी वासना तिच्या असंस्कृत विलासांत मनाला लाज वाटणें हें स्वाभाविक आहे. प्रेम या वस्तूचा आरंभ कोठून झाला आहे हें सर्वांस कळतें. निदान तें सर्वांना कळावें अशी अपेक्षा तरी आहे. पण पुष्कळ लोकांना प्रेमाचें मूळ हें नदीच्या मुळाइतकेंच किंवा ऋषींच्या कुळाइतकेंच ओंगळ असतें हें ध्यानांत येत नाहीं. आपल्या दैनंदिन जीविताला असलेली गोडी प्रत्यक्ष कामुकतेमुळें नव्हे, तर तिच्यांतून उत्पन्न झालेल्या अत्यंत मनोज्ञ अशा प्रेम नांवाच्या विकारामुळें आहे. मनोज्ञ म्हणजे मनानें ओळखावयाचा. पण ही मनाला भासमान होणारी मधुर आवड अबुज कवींनीं अत्यंत स्थूल अशा प्रास्ताविक कारणापर्यंत नेऊन पोहोंचविली तर रुचीला दारिद्र्य आल्याच्या वेदना होतात. आपल्या जीविताचें सगळें आक्रमण ज्या रसानें केलेलें आहे तो रस कामकुता नव्हे; तर शृंगार म्हणजे प्रेम हा होय. याच्या जन्मस्थानीं अथवा जनकस्थानीं कामुकता असते हें सर्वांना माहीत आहे. पण आपण प्रमुख रस कोणता याचा विचार करीत आहोंत हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. तो रस

कामुकता नव्हे, तर प्रेम हा होय; आणि या रसानें मात्र आपलें सगळें जीवित भारून टाकिलेलें आहे, हें खरें आहे. लहानपणीं दुरून लोभनीय वाटणारें माधुर्य, यौवनांत आणि वयाच्या प्रगल्भ अवस्थेंतहि येणारा प्रत्यक्ष अनुभव, आणि वार्धक्यांत उरणारें केवळ स्मरण यांच्या द्वारा या रसाची ओळख मनुष्यमात्राला होत असते. स्त्रीपुरुषांना परस्परांचें आकर्षण फार लवकर होऊं लागतें. म्हणजे आपल्याला वाटतें त्यापेक्षां लवकर होऊं लागतें, आणि तें मरेपर्यंत निखालस नाहींसें होत नाहीं. उलट भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें 'तृष्णैका तरुणायते.' अशा प्रकारें आपल्या जीविताचा सगळाच कबजा हा रस घेत असल्यामुळें त्याला 'राजा' हें नांव मिळालेलें आहे आणि रसमालिकेंत अग्रपूजेचा मान त्याला मिळाला आहे. अर्थातच अशा रसाचा वाङ्मयांत नेहमीं आविष्कार व्हावा यांत असाहजिक असें कांहींच नाहीं.

या एका रसाच्या पोटांतून अन्य रसनिर्झर उत्पन्न होतात. वात्सल्य हें तर याच्याच पोटीं जन्मास येतें आणि बंधुप्रीति इत्यादि ज्या इतर प्रेमकला जीवितांत विकसित होत असतात त्याहि याच्याच बारीक बारीक शलाका होत. ज्या लोकांना या रसांचा अनुभव प्रत्यक्ष घेतां येतो त्यांना जन्मभर सुख लाभतें. पत्नी, मुलें, नातवंडें आणि मागें वळून आपलीं भावंडें व आईबाप या सगळ्यांच्या संबंधानें ममत्व उत्पन्न होतें; आणि अशा रीतीनें या सर्व नात्यांच्या अनुभवांचा ज्याला लाभ होतो तो मनुष्य सुखी होतो. यांपैकीं ज्या शाखांचा अथवा उपशाखांचा अनुभव आपणांला येत नाहीं तेवढ्या-पुरते आपण दुःखी असतों. ज्याला मुलेंच होतात तो

आपल्याला मुलगी नाहीं म्हणून खिन्न असतो आणि ज्याच्या पोटीं अनुक्रमानें मुलीच होत आहेत त्याची पुत्रवात्सल्याची भूक अगदीं अतृप्त राहते. आपल्या मुलांना आपण आपलें छत्र उभें करून देतों ही जाणीव त्याला एकीकडे असल्यामुळें स्वत:चे आईबाप वारले म्हणजे डोक्यावरचें छत्र गेलें असें वाटून पोरकेपणाचें दु:ख होतें. परगांवाहून आल्यानंतर नाकाडोळ्यानें आपल्यासारखा दिसणारा व कदाचित् आपल्या वडिलांची छवी ज्याच्या चेहऱ्यावर हुबेहुब उतरली आहे असा आपला भाऊ पाहून चित्ताला भरतें न येईल असा माणूस माणुसकीला थोडा कमीच असला पाहिजे, असें आपल्याला वाटूं लागतें. आपण कितीहि गरीब असलों तरी आपल्या धाकट्या बहिणीला भाऊ-बिजेच्या दिवशीं घरीं बोलावून आणून तिच्या सौभाग्याचें कौतुक करण्याची इच्छा प्रेमळ भावाच्या पोटांत नेहमींच नांदते. प्रत्यक्ष मुलाचें लहानपणीं जें कौतुक केलें नाहीं तें नातवंडाचें करतांना पोक्त माणूस आपला सारासार विचारसुद्धां थोडासा गमावतो असें दिसून येतें. हे सर्व वात्सल्य इत्यादि रसांचे वाहत असलेले प्रपंचांतील बारीक बारीक पाट मूळ स्त्री-पुरुषांच्या प्रेमतडागांतून बाहेर निघालेले असतात. अशा प्रकारें किंवा मूळ प्रेमरसानें वा त्याच्या शाखोपशाखांनीं आपलें सगळें जीवित अंकित करून टाकिलेलें आहे. स्वाभाविकपणेंच आतांच सांगितलेल्या तऱ्हांनीं सूक्ष्म वनत चाललेल्या प्रेमशलाका ज्यांना दिसतात ते त्यांचेंहि चित्रण करितात. पण या न दिसण्याइतपत ज्यांची दृष्टि स्थूल असते ते केवळ स्त्री-पुरुषप्रेमाचा आविष्कार करितात; आणि ज्यांना या प्रेमरसाचें केवळ मानसिक चलन-वलन ध्यानांत येत नाहीं त्यांना निव्वळ देहनिष्ठ कामुकते-

पर्यंतच पोहोंचावें लागतें. हा ज्याच्या त्याच्या अधिकाराचा प्रश्न आहे.

यावरून ध्यानांत येईल कीं, शृंगारानें म्हणजे प्रेमरसानें वाङ्मयांत सगळीकडे आपलाच अधिकार चालविलेला असला तरी त्यांत अयोग्य असें कांहींच नाहीं. किंबहुना, तें सर्वथा योग्य व स्वाभाविक असेंच आहे. मात्र त्या रसाचे वर दिलेले अर्थ व पर्याय हे ध्यानांत असावयास हवेत.

या रसानें उत्पन्न होणारें समाधान ज्यांना लाभलें नाहीं त्यांचीं जीवितें अत्यंत नीरस आणि रुक्ष होऊन बसतात. जगताशीं अशा लोकांचा बंधुभाव उत्पन्न होणें दुर्घट बनतें. त्यांच्या चित्तांत थोडासा बेजबाबदारीच्या कल्पनेचाहि रिघाव होतो आणि म्हणून आचारविचारांतील ताळमेळ नाहींसा होऊन त्यांच्या वृत्तीला फटिंगपणा प्राप्त होतो. आम्ही जगाचें काय लागतों आणि जग आमचें कोण अशी तिऱ्हाईतपणाची, इतकेंच काय, क्वचित् तिरस्काराचीसुद्धां भावना त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होते. ही भावना जिंकून प्रेमाची सामान्य भूमिका नसतांना-सुद्धां जे आपल्या समाजावर आणि एकंदर मनुष्ययोनीवर ममत्व व कृपादृष्टि ठेवितात ते मनानें खरोखरच थोर असतात असें म्हटलें पाहिजे. अशीं कांहीं माणसें सोडून दिलीं तर सरसकटपणें पाहतां प्रेमविकाराच्या व त्याच्या उपशमाच्या अभावीं माणूस थोडा क्रुद्ध, लहरी, कुढा, चिरचिरा आणि इतरांस तापदायक असाच बनतो. हा जो व्यक्तीच्या वृत्तींत फरक पडतो तो वाढत वाढत जाऊन त्यानें समाजच्या समाज ग्रस्त होतो.

माहेरीं परत आलेल्या 'बालवैधव्यग्रस्त वन्सं' किती उपद्रव देतात याचा अनुभव नवीन लग्न झालेल्या सासुरवाशिणींना

क्रमांक 22263 दि. 1999
ग्रंथांक 9.7.70 नों. दि. 22.1.7

अजूनहि येत असेल. त्यांचा लहरीपणा, त्यांची धुसफूस, वहिनींच्या बारीकसारीक दोषांची त्यांच्या हातून होणारी अतिशयोक्ति, सूक्ष्म मत्सराचा दाहक जळफळाट—हें सगळें कशानें उत्पन्न झालेलें असतें हें पाहूं जातां पुष्कळ ठिकाणीं असें दिसून येईल कीं, वर सांगितलेल्या प्रेमाच्या उपशमाचा लाभ त्यांना न झाल्यामुळें होत आहे. मग शेजारीपाजारी लोक अशा स्त्रियांच्या कडकपणाचा व अन्याय किंवा दोष खपत नसल्याचा गौरव करितात; आणि 'ही घरांत आहे म्हणून थोडी तरी शिस्त राहिली आहे' असा बडेजाव हिच्या पदरांत टाकतात. पण हें सगळें खोटें असतें. त्या वन्सं कडक, कडकडीत अथवा अन्यायानें चिडणाऱ्या अशा खास नसतात. प्रेमोपशमाच्या अभावीं त्या लहरी आणि सूक्ष्म मत्सरी बनलेल्या असतात, इतकेंच काय तें. लग्न करणें हातीं असूनसुद्धां ज्यांनीं कांहीं लौकिककार्यार्थ हे प्रेमपाश स्वत:भोंवतीं उत्पन्न केलेले नसतात, पण ज्यांची प्रेमपिपासा मात्र अतृप्तच राहिलेली असते ते पुरुषसुद्धां असेच दोषग्रस्त होतात आणि ते दोष त्यांच्या मतप्रदर्शनांत, संशोधनकार्यांत आणि नित्याच्या चालचलणुकींतहि दिसून येतात.

या वाटेनें आपणांस आणखी पुढें जातां येतें. आपण पुष्कळदां असें ऐकतों कीं, अमुकतमुक लोक मोठे कडवे आणि शूर आहेत; पण या कडव्या आणि शूर लोकांपैकीं बहुतेकांच्या मनाची जर सूक्ष्म परीक्षा केली तर आतांच सांगितलेला प्रेमविकार आणि त्याचा उपशम हीं न लाभल्यामुळें ते लोक असे बनले आहेत असें निदर्शनास येईल. कडवेपणा आणि शौर्य या गुणांना स्वतंत्र अस्तित्व आहे; पण

आतांच सांगितलेले जे लोक, त्यांच्या ठिकाणचे हे गुण कृत्रिमामुळें उत्पन्न झालेले असतात. हें कृत्रिम, म्हणजे हा प्रेम-विकार आणि उपशम यांचें भातुकें, त्यांना प्राप्त झालेलें नसतें किंवा होऊं दिलेलें नसतें. ज्या समाजांत लग्नव्यवस्था नीट नाहीं आणि एकेक पुरुष अनेक स्त्रिया बळकावून बसतात त्या समाजांत हा सामुदायिक लहरीपणा अधिकच बळावत जातो. त्यांच्यापैकीं शेंकडों लोकांचीं जीवितें, लोकांवर पडलेली प्रेमाची सांवली पाहण्यांत पण स्वत: मात्र उन्हाच्या रखरखीमध्यें कंठीत चाललेलीं असतात आणि यामुळें उत्पन्न होणारा जीवितांतील उदासीनपणा आणि त्यांतून निघणारा बेफिकीरपणा यांनींच शेवटीं ते लोक झिंगून जातात; आणि मग त्यांच्या हातून लोकांच्या अल्प दोषास्तवसुद्धां भारीच भयानक कृत्यें होतात. भोळे लोक या त्यांच्या लीलांना कडवेपणा किंवा शौर्य अशीं नांवें देतात. वास्तविक पाहतां तो कडवेपणाहि नव्हे आणि शौर्यहि नव्हे; तो बेफिकीरपणाचा झालेला परिस्फोट असतो इतकेंच. समाजांत जों जों अशा प्रकारच्या माणसांची संख्या जास्त होते तों तों समाजाचें ठळक लक्षण त्या त्यांच्या वर्तनानेंच ठरतें; आणि मग ते अफगाण लोक, ते पठाण किंवा बलुची लोक फार कडवे किंवा साहसी असतात, त्यांना जिवाची पर्वा नसते असा त्यांचा गौरव लोक करूं लागतात. पण पाहूं जातां या पठाण वगैरे लोकांचा कडवेपणा व त्यांचें शौर्य यांचें उगमस्थान विवाहविषयक चालीरीतींत व त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या असमाधान-वृत्तींत आहे, असें दिसून येईल. म्हणून हे किंवा यांसारखे जे दुसरे समाज असतील त्यांनीं आपली लग्नसंस्था सुधारिली म्हणजे त्यांना प्रपंचांतील निरनिराळे रस

चाखतां येतील व मग त्यांच्यांतील खरी माणुसकी जलदीनें वाढीस लागेल.

अशा प्रकारच्या आपत्ति कृत्रिमपणानें उत्पन्न करूनसुद्धां माणसांना बेफिकीर बनवितां येतें. याचें आणखी एक उदाहरण म्हणजे आपल्या देशोदेशींच्या खड्या फौजा हें होय. त्या शिपायांना आपल्या घरादारांतून आणि बायकापोरांतून मुद्दामच दूर ठेविलेलें असतें. त्यांनीं शारीरिक दृष्ट्या बलिष्ठ राहावें हा एक हेतु असतो हें खरें आहे. पण अशा रीतीनें त्यांची ताटा-तूट करून ठेविल्यानें कावरेबावरेपणाचा जो एक गुण त्यांच्यांत उत्पन्न होतो त्याचाहि उपयोग असतो. ते लवकर चवताळतात, लवकर भावनावश होतात आणि जिवाची तमा धरीत नाहींत. या गुणांचा रणांगणावर अर्थातच मोठा उपयोग होतो.

कडवेपणा आणि शौर्य यांना स्वतंत्र अस्तित्व आहे, पण त्याला हें बेफिकीरपणाचें मिसळण नको असतें हेंहि ध्यानांत ध्यावयास हवें. आपापल्या प्रपंचासाठीं आणि शेवटीं स्वदेशाच्या रक्षणासाठीं आपण झगडलें पाहिजे हा उदात्त विचार लोकांच्या मनांत वर सांगितलेल्या कृत्रिमानें उत्पन्न होत नाहीं. स्त्री-विषयक प्रेम आणि त्यांतून उत्पन्न झालेल्या संबंधींच्या अनेक लता आणि त्यांचीं प्रतानें यांच्या सुखानुभावामुळें खरे शूर लोक त्यांच्या रक्षणासाठीं त्वेषानें उभे राहतात आणि वर सांगितलेले जे कडवे लोक ते हे सुखानुभव त्यांना मिळत नाहींत यामुळें भ्रान्त होऊन आपण कशासाठीं मारामारी करीत आहोंत हें ध्यानांत न येतांच मारीत सुटतात. पण ज्यांना हा सुखानुभव लाभलेला असेल ते मात्र तीं सुखें शाश्वत राहावीं या अपेक्षेनें त्याच कामाला प्रवृत्त होतात.

अशा प्रकारें या दोघांच्या शौर्यांतील कारणभेद दाखवितां येतो. हीं सुखें जपून धरण्याची वासना प्रकृतिनिष्ठ असा जो कडवेपणाचा किंवा शौर्याचा गुण त्याला जागृति आणून देते; आणि त्या जागृतीनें चेतावलेले लोक रणांगणावर आपली शर्थ करितात. तेथें त्यांचा तो गुण वरच्यापेक्षां जास्त शुद्ध स्वरूपांत दिसून येतो. लहरीनें पराक्रमी बनलेल्या माणसांत क्रूरपणा असतो, शौर्य नसतें. पण ज्याला आतांच सांगितलेल्या सुखाची किंमत कळली आहे तो वेडा होऊन क्रौर्य करीत नाहीं, तर आत्मसंरक्षणासाठीं दुसऱ्याला मारतो किंवा त्याच्या आगळिकीबद्दल त्याला शासन करतो. They are fighting for their homes and hearths असें एक वाक्य इंग्रजींत लिहिलेलें असतें त्याचें मर्म हेंच आहे. Homes and hearths म्हणजेच घरें-दारें व बायका-मुलें होत. जीवितांतील आपलीं खरीं धनें हींच होत. यांच्या रक्षणासाठीं प्रकृतिगत शौर्याचा उपयोग खरे शूर लोक करितात; पण वर सांगितलेले जे कडवे असामी त्यांचीं कृत्यें शौर्याचीं नसून भ्रांत झालेल्या वृत्तीनें आचरिलेल्या क्रौर्याचीं असतात. असा फरक या दोहोंमध्यें करावयास हवा; परंतु लोकांचे एतद्विषयक मनोव्यापार शोधणें हें आपलें प्रस्तुतचें काम नसल्यामुळें तेथून परत फिरण्यास हवें. आपला मुख्य मुद्दा असा आहे कीं, प्रापंचिक सुखें हीं मनुष्यमात्राला हवीं-हवींतशीं वाटतात; व तीं कोणी हिसकून घेऊं लागला तर त्याला शासन करण्यास तो उभा राहतो. तसेंच, ज्या कोणाला हीं प्राप्तच झालेलीं नसतात किंवा होऊन पचनीं पडूं दिलेलीं नसतात ते भ्रमिष्टासारखे वागूं लागतात. अशा प्रकारें दोनहि अंगांनीं आपल्या मना-

वरची या सुखांची छाप किती मोठी आहे हें स्वच्छ दिसून येतें. हीं सर्व सुखें प्रत्यक्ष स्त्री-पुरुषप्रेमानें किंवा त्यांतून उत्पन्न झालेल्या प्रेमळपणानें प्राप्त होतात. म्हणून प्रेम अथवा शृंगार ही वस्तु अत्यंत स्पृहणीय अशी ठरत असून तिच्या व्यापारानें ज्या अर्थी आपलें सगळे जीवित इतकें व्यापलेलें दिसतें त्या अर्थीं रंगभूमीवर किंवा वाङ्मयांत तिचा व्यापार सर्वत्र दिसावा हें युक्तच आहे, असें आढळून येईल.

## ४. ते केवळ कलावन्त असतात !

चार पांच महिने झाले, एका दिवंगत साहित्यिकाचा गौरव करण्यासाठीं आम्ही कांहीं मंडळी एका प्रसिद्ध ठिकाणीं जमलों होतों. ठरल्याप्रमाणें गौरव झाला, स्मृति-सुमनांजलि झाल्या व आम्ही घरोघर जाण्यासाठीं बाहेर पडलों. येतांना पांचसात जणांची आमची टोळी त्याच विषयासंबंधानें बोलत चालली होती. तें बोलणें इतरांनीं कोणीं ऐकिलें असतें तर ते म्हणाले असते, 'मघाशीं गौरवाचीं गंभीर आणि गहिवरलेलीं वचनें बोलणारे लोक ते हेच का ?' आणि त्यांच्या या विचारण्यांत कांहीं चूक झाली नसती; कारण ज्याचा गौरव थोड्या वेळापूर्वीं झालेला होता त्याला अपकर्षक अशी किती तरी माहिती आमच्यांतील कांहीं कांहीं जण सांगत होते; व जणूं कांहीं अप्रत्यक्षरीत्या म्हणत होते, 'हा गृहस्थ मोठा साहित्यिक असेल; पण एरवीं पाहूं जातां अगदीं कमकुवत मनाचा, संशयी आणि चालचलणुकींत थोडा नरम

पट्टीचाच होता. नुकतेंच ज्या माणसाचें स्तवन केलें त्याच्याविषयीं ही कुरबूर लगोलग नंतर करण्याची बुद्धि या साहित्यिक मित्रांस कां व्हावी हें पाहाण्यासारखें आहे. परवां माझे एक कथालेखक मित्र अमक्या तमक्या प्रतिथयश लेखकाविषयीं बरोबर असलीच कुरबूर करीत होते. त्याच्या कवितेंत किंवा इतर लेखनांत पाहिलें तर औदार्य, मनमोकळेपणा, ऋजुता इत्यादि गुण खेळत असतांना दिसतात; पण त्याचें इतरांशीं वागणें, अल्पहि मतभेद झाला असतांना त्याचें जरा चढेलपणानें फिसकारणें आणि त्याच्या स्वभावांत कदाचित् दिसणारी थोडी मत्सराची छाया हीं पाहिलीं म्हणजे कसेंसेंच वाटून, तें उदात्त वाङ्मय लिहिणारा गृहस्थ असा कसा, हा विचार त्या माझ्या कथालेखक मित्राला आपल्या मनाशीं घोळावासा वाटे. ज्याचे वाङ्मयगुण एवढे थोर त्याचीं प्रकृतिवैगुण्यें जरी अशीं असलीं तरी **वाङ्मयगुणांची आठवण झाल्याबरोबर हीं प्रकृतिवैगुण्येंहि या मित्राला कां आठवावीं** व त्याला खिन्नता कां यावी हें बारकाईनें पाहावयास हवें.

वाङ्मयीन गुणांबरोबर इतर अवगुणांची आठवण या लोकांना होते याचें कारण इतकेंच कीं, हे इतके चांगले वाङ्मयगुण ज्यांच्या अंगीं आहेत त्यांच्या अंगचे खाजगी गुणहि तसेच चांगले असले पाहिजेत अशी त्यांची अटकळ असावी व निदान ते तसे असावेत अशी त्यांची अपेक्षा असावी. अपेक्षा असते याचें कारणहि एवढेंच कीं, वस्तूंच्या साहचर्यांत संगति असावी अशी एक भूक सर्व माणसांना असते. सर्व काळीं व सर्व देशांत अशा तऱ्हेची संगति अपेक्षित

असतें असें इतिहासावरून दिसून येतें. पण हें सगळें चूक आहे. जो वर्तनानें नरम आहे त्याला सद्विचार मान्यच असतो; इतकेंच नव्हे तर लोभनीय वाटतो व जर त्याच्या अंगांत कांहीं प्रतिभेचा अंश असेल तर तो त्या सद्विचाराचा महिमा कवितेनें, कादंबरीनें व्यक्त करून दाखवितो. आपल्याला असें वाटतें कीं, हें करावयाचा या माणसाला काय हक्क आहे! हा जर वर्तनानें अगदींच ढिला तर लोकांपुढें लंब्या-चवड्या गोष्टी लिहून मांडण्याचा याला काय अधिकार! पण आपण अशा ठिकाणीं अधिकाराचा प्रश्न आहे असें मानितों ही आपली चूक आहे. यांत अधिकार तो कसला असावयाचा! त्याला एक उदात्त तत्त्व ठाऊक आहे व तें मनोरंजक पद्धतीनें सांगावयाचें कसब त्याला साधलेलें आहे आणि म्हणून त्याला ललितवाङ्मयाचें रूप देऊन तो सांगत आहे. यांत अधिकाराचा प्रश्न त्याच्या मतानेंहि येऊं नये. त्या लेखकांची भूमिका अशी नाहीं कीं, आपण मोठे धर्मप्रवर्तक किंवा नीतिविशारद आहों. इतर चार-चौघांप्रमाणें त्यांना आपापलीं वैगुण्यें कळतच असतात; पण त्यांना वाङ्मय लिहावयाचें असतें; कांहीं कलाविकास करावयास हवा असतो; कांहीं कल्पनेची चतुराई दाखवावयाची असते; कांहीं कवित्वाची गोडी चाखावयास द्यावयाची असते. हें त्यांचें मुख्य काम असतें; हें त्यांना करावयाचें असतें. अर्थात् हें करतांना समाजांत मान्य झालेले जे आचारविषयक सिद्धान्त असतात तेच त्यांना सांगावे लागतात. जें सर्व समाजाला पसंत ठरलेलें असतें तेंच सांगणें त्यांना ओघानेंच प्राप्त होतें. त्यांनीं दुसरें काय सांगावयाचें! सद्गुण, दुर्गुण,

सदभिमान, करुणा, सहानुभूति, थोर आकांक्षा—हेच प्रकार घेऊन त्यांनीं आपली कलाकुसर शोभिवंतपणें दाखविलेली असते. त्यांना कला दाखवावयाची असते. **अधिकारवाणीनें नीतिविचाराचा प्रचार करावयाचा नसतो.** आपलें खाजगी उणेपण लक्षांत घेऊन त्यांनीं वर सांगितलेले गुण, आकांक्षा, इच्छा इत्यादींचा आश्रय करावयाचा नाहीं असें म्हटलें तर त्यांनीं आपलें कलेचें कौतुक कशाच्या आश्रयानें व्यक्त करावयाचें? सामाजिक जीवनाच्या आश्रयानेंच तें व्यक्त करावयास हवें; म्हणून आपण वाचकांनीं त्यांच्या वाङ्मयावरून त्यांच्या अधिकाराविषयीं भलतीच समजूत करून घेऊं नये असें वाटतें.

आपला हा संगतिविषयक समज पूर्वींच्या एका यथार्थ-ज्ञानांतून निघालेला आहे. ज्याला वाङ्मय म्हणून म्हणण्याची चाल आहे तें प्राचीन काळीं फारसें नव्हतेंच; आणि जें काय होतें त्याचा प्रधान हेतु कलाविलास नसून तत्त्वार्थबोध, धर्मोपदेश हाच असे. हें लिहितांना कळत न कळत जें वाङ्मय बनेल तें निराळें; पण प्रतिपादकांचा हेतु मात्र कलाविलासाचा नव्हता. आतां प्रतिपादक हा धर्मबुद्धीनें, एखाद्या थोर तत्त्वानें प्रेरित झालेला असल्यामुळें व लोकांना सुधारण्याची व उपदेश करण्याची त्याची उमेद असल्यामुळें त्याच्या प्रतिपादनांत व वर्तनांत स्वाभाविकपणेंच व बुद्धिपुरस्सरपणें संगति असे. त्याचें प्रवचन ऐकतांना लोकांना वाटे कीं, या माणसाची आपल्या तत्त्वावरची श्रद्धा खरीच आहे; कारण, याचें वर्तनहि तंतोतंत त्या प्रतिपादनासारखेंच आहे. त्याला स्वतःलाहि प्रतिपादन व वर्तन यांतील संगति अवश्य वाटे व श्रोत्यांचीहि तीच अपेक्षा

असे; आणि त्याच्या बाबतींत ती संगति व वाचकांच्या बाबतींत अपेक्षापूर्ति झाल्यामुळें या दोहोंचें म्हणजे प्रतिपादन व वर्तन यांचें साहचर्य जनमनांत कायमचें घर करून राहिलें आहे. जो जसें बोलतो तसें त्याचें वर्तन असावयास हवें हें ठरून गेलें. तें तसें नसलें तर त्याचें बोलणें म्हणजे वायफळ बडबड आहे, असें लोक मानूं लागले आणि यांत कांहीं चूक नाहीं. 'बोले तैसा चाले' तरच त्याचें ऐकावयास कोणी तयार होणार. एकपत्नीव्रताचा प्रतिपादक आणि स्वतः मात्र बदफैली; अपेयपानाचा आग्रही निषेधक आणि स्वतः मात्र सदा झिंगलेला; स्वार्थत्यागाच्या उपदेशाचा टाहो फोडणारा आणि स्वतः मात्र हातांतून कवडी न सोडणारा; यांचा उपदेश कोण ऐकतो! या उदाहरणांत प्रतिपादन व वर्तन यांतील मेळ अपेक्षित असावा हें बरोबर आहे, कारण त्या त्या तत्त्वाचा पुरस्कार करणारे लोक हेच असतात. त्यांचा जीवितहेतूच तो असतो. प्रतिपादनाला उदाहरणानें खरेपणा व तेज प्राप्त होतें. आपल्या तत्वावरची त्याची स्वतःची श्रद्धा खरी आहे हें त्यांत दिसून येतें. पण ललित-वाङ्मय लिहिणाऱ्यांची गोष्ट निराळी आहे.

वाङ्मयलेखकाची गोष्ट निराळी असूनहि आपली त्यांच्या संबंधींची अपेक्षा मात्र जुनीच राहिली आहे. छापखान्याची कला निघाली, आणि त्यामुळें वाङ्मयलेखनाची कला उत्पन्न झाली नसली तरी ती बळावली, ही गोष्ट खरी आहे. एकादी हकीगत, एकादें प्रमेय, एकादी चूष मोठ्या मनोरंजकपणानें आपल्याला सांगतां येते याची जाणीव ज्यांना होती ते ती ती वस्तु सांगूं लागले. त्यांचा कटाक्ष आपण **कसें सांगतों** यावर

होता. आपलें कसब ओळखून लोक आपल्याला 'शाबास' म्हणतात ना, एवढेंच त्यांना हवें होतें. काय सांगावयाचें याचा विचार करावयाची त्यांना आवश्यकता नव्हती. कारण सांगण्यासारखें बरेंचसें तयार होऊनच राहिलें होतें. सद्गुण, दुर्गुण, सहानुभूति, सदिच्छा, आकांक्षा इत्यादींविषयीं जनमनानें आपली आवडनिवड, पसंती-नापसंती कायम करून टाकि-लेली होती. यांपैकींच त्यांतल्या त्यांत आपल्याला आवडेलसें कांहीं उचलावें व कलायुक्त पद्धतीनें सांगावें एवढेंच त्यांचें काम होतें. आपण कोणी तत्वप्रतिपादक आहों अशी भूमिका त्यांनीं घेतलीच नाहीं; आणि सामान्यपणें पाहतां लोकांनींहि याच दृष्टीनें त्यांच्याकडे पाहिलें. जर प्रतिपादन व वर्तन यांतील संग-तीच्या दृष्टीचा कस लावून पाहिलें असतें तर त्यांनीं कित्येक लेखकांचीं वाङ्मयें दूर भिरकावून दिलीं असतीं. शेक्सपियर आपल्या हातीं लागला नसता; वर्ड्स्वर्थचा बोजवारा उडाला असता; शेली, कीट्स, बायरन् इत्यादि रंगेल मंडळी बदफैली लोकांच्या यादींतच जमा होऊन राहिली असती; कदाचित् कालिदासहि मरणाबरोबरच मेला असता; जगन्नाथराय गंगेंत बुडाले असते; आणि रामजोशी यांच्या काखेला डफ-तुणतुणेंच शिल्लक राहिलें असतें. पण यांतलें कांहींच झालेलें नाहीं. कारण **या लेखकांची भूमिका कलावंताची आहे हें लोकांनीं ओळखिलेलें होतें.** या लोकांकडून उदात्ततर वस्तूंची अपेक्षा करावयाची नसते हें त्यांना कळून चुकलें होतें. म्हणून ही मंडळी मानानें जिवंत राहिली आहेत. **आपली कला दाखविण्यासाठीं यांनीं प्रस्थापित तत्त्वांचा आश्रय केला होता इतकेंच.** ह्याहून जास्त हक्क त्यांनीं

सांगितला नाहीं. असा आश्रय न करतां त्यांना आपलेंच कलेचें कसब कधींच दाखवितां आलें नसतें. अर्थात् तत्त्वप्रतिपादकाची किंवा नीतीविचार सांगणाऱ्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकितां यावयाची नाहीं. आधुनिक काळांत वाङ्मय-लेखनाचा जो कलारूप विकास झालेला आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करून आपण वाचकलोक, त्यांच्यासंबंधीं प्रतिपादन व वर्तन यांच्या संगतीची जुनी अपेक्षा बाळगीत असल्याचें केव्हां केव्हां दाखवितों हें बरोबर नाहीं.

थंडींत संध्याकाळच्या वेळीं शेकोटींत ओल्या शेंगा भाजत घालून कांहीं मंडळी शेकत बसलेली असतात. त्यांच्यांतील एक पुराणांतील सुरस कथा मोठ्या गमतीनें सांगत असतो. इतरांना माहीत असतें कीं, हा शुद्ध लफंग्या आहे. पण त्याचें गोष्ट सांगणें इतकें मनोरंजक असतें कीं सगळी मंडळी त्याच्यावर अगदीं खूष होऊन गेलेली असतात. त्याच्या वर्तनाची कोणी चिकित्सा करीत नाहीं. हा तर केवळ लौकिक व्यवहारांतील प्रकार झाला. पण आपण कलेचे इतके भोक्ते असतों कीं, ज्या ठिकाणीं वर्तनाला मान अवश्यच हवा असतो तेथेंहि केवळ कलेकडे लक्ष देऊन आपण वर्तनाकडे दुर्लक्ष करितों. एकादा हरदास वर्तनानें ढिला असल्याचें गांवांत ठाऊक असतें; पण तो एकदां कीर्तनाला उभा राहिला म्हणजे सगळा गांव रंगून जातो; लोक एवढेंच पाहतात कीं, जें कसब दाखवावयास हा उभा आहे तें तो कसें दाखवितो. आपल्या कवींची व ललितलेखकांची परीक्षा आपण याहून जास्त कडक घेऊं नये. इतर चार माणसांप्रमाणेंच तेहि असतात; कदाचित् अतीव रसिकपणामुळें, कलेचे ढंग नीट कळावे म्हणून, वृत्ति रंगेलपणांत

मुरत राहिल्यानें त्यांच्या हातून प्रमाद घडतहि असतील. तथापि वर सांगितलेल्या गोष्टी सांगणाऱ्याहून त्यांची जास्त चिकित्सा करणें रास्त नाहीं. आपण असे असे आहों याची त्यांनाहि जाणीव असतेच; मग त्यांना लाज कां आणावी ! आपली कला दाखवावयास व प्रस्थापित नीतिविचाराचा आश्रय घ्यावयास आपण त्यांना प्रतिबंध करणें म्हणजे पातक्यानें पुण्यवस्तूला केलेला नम्र नमस्कार न पत्करण्यासारखेंच आहे. सरसकट जनता हाच विचार ध्यानांत ठेवून वागते. आरंभीं ज्या माझ्या मित्रांनीं कुरबूर केल्याचें मी सांगितलें आहे, तेसुद्धां हा विचार ध्यानांत ठेवूनच वागले होते, हें स्पष्ट आहे. त्या दिवंगत साहित्यिकाची आपण तारीफ केली होती ती त्याच्या कलेची होती हें सूक्ष्म अवलोकनानें पाहिलें असतें तर त्यांना दिसलें असतें. त्याच्या प्रतिपादनांतील गुणांचा तो स्वतः पुतळा आहे असें समजून त्यांनीं ती तारीफ केलेली नव्हती.

पण कांहीं वेळां असें होतें कीं, जाणून किंवा न जाणून, उर्मटपणें किंवा ढोंगीपणानें, हे कलावंत आपला कलावंताचा पेशा सोडून देतात व आपण कोणी प्रेषित आहों, लोकांच्या नैतिक व्यवहाराचें बरेंवाईटपण ठरवावयास अधिकार असलेले टीकाकार आहों, पुढारी आहों, समाजकारण, राजकारण इत्यादींत व्यापृत असलेल्या थोर लोकांवरहि लांब बसून प्रहार करण्याचीही अखत्यारी आपल्या पेशांत आपोआपच मिळते, अशा कांहीं कल्पनेनें ते अवास्तव बोलूं लागतात. ते तत्त्ववेत्ते-पणाचें व द्रष्टेपणाचें अवसान आणितात. असें झालें म्हणजे मात्र समाज थोडा टवकारून पाहूं लागतो. जोंपर्यंत त्यांची भूमिका केवळ कलावंतांची होती तोंपर्यंत त्यांच्या वैगुण्यांची

समाजानें गय केली. पण नसता अधिकार ते उपटीत आहेत हें पाहतांच मात्र समाज असें दाखवून देतो कीं, आपण भलतेंच सहन करणार नाहीं. ही यांची प्रकृति नव्हे, निशा आहे, हें लोक ओळखतात. लेखक आपल्या पायरीनें वागत नाहीं असें त्यांस वाटूं लागतें आणि मग लोक त्यांचीं बिंगें दरादर ओढून बाहेर काढतात व त्यांची फटफजीती होते. अशा प्रकारें आपल्या अधिकाराचा अतिक्रम करून फजीत पावलेले ललित-वाङ्मय-लेखक पुष्कळ आहेत. कवितेला मान म्हणून पहिल्या-पहिल्यानें कवींच जास्त झाल्यानें त्यांत कवींची संख्या जास्त आहे. वाङ्मयांतील काव्यसंस्थेच्या प्रांगणांत वावरणाऱ्यांना कांहीं विशेष प्रकारचा अधिकार संकेतानें प्राप्त झाला आहे, असें हे भोळे कवि समजतात व मग टीकाकारांचे चपेटे खाऊन त्यांना चुळबुळत बसावें लागतें. असले वाट चुकलेले लेखक जर सोडले व त्यांना झालेलें सामाजिक शासन यथायोग्यच असतें असें मानिलें तर उरलेले शेंकडों ललित-लेखक **आपलें लिखाण 'कलावंत' म्हणून लिहितात व त्याच दृष्टीनें त्यांच्याकडे पाहावयास हवें.** त्यांनीं प्रेषितपणाचा, उपदेशकाचा, अधिकारी टीकाकाराचा, पुढारीपणाचा थोडाहि आव आणिला तर त्या मानानें लोक त्यांच्याविरुद्ध बोलणार; त्यांत त्यांचा कांहींहि दोष नाहीं. ही रसिकांची वृत्तीहि लेखकांनीं ध्यानांत ठेवावयास हवी. उभयपक्षीं इतकी समजूतदारी असली, म्हणजे गैरसमजाला व त्यामुळें उत्पन्न होणाऱ्या कुत्सित टीकावाङ्मयाला जागाच राहणार नाहीं

# ५. मोठ्या लोकांचीं खाजगी चरित्रें

मोठ्या लोकांचीं खासगी चरित्रें आपल्याला माहीत व्हावींत असें सर्वांस वाटतें. त्यांच्या सार्वजनिक चारित्र्याची हकीगत वाचून त्यांच्याविषयीं आपला अभिप्राय फार चांगला होतो; व त्यानंतर त्या माणसांची खाजगी चालचलणूक कशी होती, त्यांच्या प्रपंचांतील चढउतार कसकसे झाले होते, मित्र, सगेसोयरे यांच्यांशीं त्यांचें वर्तन कशा प्रकारचें होतें, पैशा-अडक्याच्या व्यवहारांत ते कसे वागत, त्यांच्या धर्मकल्पना कोणत्या होत्या, आंतबाहेर एकच वर्तन असे कीं खायचे दांत निराळे व दाखवायचे दांत निराळे असा प्रकार असे, अशा प्रकारचे अनेक प्रश्न आपल्या मनांत येतात व म्हणून त्यांच्या खाजगी चरित्राकडे आपण पाहूं लागतों. पाहूं लागल्यावर कित्येकदां फार आनंद होतो; पण कित्येक वेळां फार वाईट वाटतें व आपण त्यांच्या या बारीक प्रकारांत उगाच शिरलों असें आपल्याला होऊन जातें. मात्र ही जिज्ञासा केव्हां चाल-

वावी व केव्हां चालवूं नये, चालविल्यावरहि कोणास दोषी म्हणावें अगर म्हणूं नये, माणसाची या बाबतींतील प्रवृत्ति काय असते, ती रोगट असते कीं निकोप असते, इत्यादि प्रश्न फार मनोरंजक आहेत.

कित्येक मोठे लोक असे होऊन गेले आहेत व सध्यांहि आहेत कीं, ज्यांच्या खाजगी चरित्राकडे आपली दृष्टि वळली असतां ते आपलें अंग चोरतील आणि त्यांना संकोच वाटेल! 'आमच्या चरित्राचा अमुक एक भाग हा वाटेल त्यांनीं निरखावा अशासाठीं झालेला नाहीं; मग हे फाजील चवकस लोक इकडे कां पाहत आहेत कोणास ठाऊक!' असें कांहींशा तिरसटपणानें हे मोठे लोक आपापल्याशीं पुटपुटत असतील, असें वाटतें. जें तुमच्यासाठीं आचारिलेंच नाहीं तें कां पाहतां? जें लौकिक म्हणून केलें तें लोकांनीं पाहावें; पण जें आमचें स्वतःचें स्वतःपुरतें आहे तिकडे तुम्हीं कां पाहावें बरें? माणसाला लोकांसंबंधीं म्हणजे लौकिक व केवळ स्वतःचें म्हणजे खाजगी असें निरनिराळें कांहीं असूं शकत नाहीं असें तुम्हांला कां वाटावें? आमच्यासंबंधानें तुम्हांस आपुलकीची भावना उत्पन्न झाली असेल हें खरें व म्हणून तिला वश होऊन तुम्हीं आमच्याकडे बारकाईनें पाहात असाल हेंहि खरें; पण त्यामुळें आमच्या चारित्र्यांतील कांहीं गोपनीय रहस्यें तुम्हांस दिसूं लागतात; व तें तर आम्हांस अगदीं नको; अशा प्रकारची तक्रार पुष्कळ मोठे लोक करीत असतील यांत शंका नाहीं. आपल्यावरून दुसऱ्याची परीक्षा करावी, या न्यायानें पाहतां असें खास असेल असें वाटतें. आपण साधीं माणसेंसुद्धां आपला लोकांस कळावा असा वर्तनक्रम असेल

तो लोकांस दिसूं देतों व तदितर झांकून ठेवितों. 'मान सांगावा जगांत अन् अपमान सांगावा मनांत' या व्यवहारांतील सूत्राला धरूनच आपलें वर्तन आपण ठेवितों. 'मान जर जनांत सांगावा' तर जनदृष्ट्या मान्य असें आपलें चरित्र लोकांनीं पाहावें, पण 'अपमान जर मनांतच सांगावा' तर जनदृष्ट्या अवमानास्पद असें जें आपलें चारित्र्य असेल तें मनांतच म्हणजे गुप्तांतच राहावें, असें सामान्य माणसांस जसें, तसें मोठ्या माणसांसहि वाटणें हें त्यांच्या अंगांतील माणूसपणाला धरूनच आहे; आणि या त्यांच्या सहजप्रवृत्तीला मान देऊन माणसांनीं वागावें व फाजील चवकस असूं नये हें खरें आहे.

पण माणसाची जात फार जिज्ञासु. आपल्याला माहीत नाहीं असें कांहीं राहतां कामा नये असा तिचा हट्ट असल्यासारखा आहे. शिक्षा पत्करूनसुद्धां सृष्टीच्या गुलदस्तांतील गुह्यें उघडकीस आणण्याची ईर्ष्या दाखविणारीं माणसें, मोठ्या लोकांच्या या वरील अपेक्षेची काय खातरजमा ठेवितील हें दिसतच आहे. नाईल नदीचा केसासारखा पहिला ओघळ कोठें झिरपत आहे हें पाहून पाहाणाऱ्याला काय मिळालें? गौरीशंकर शिखराची टक्कल पडलेली टाळू जरी शोधकांस दिसली असें मानलें तरी पुढें काय? ब्रह्मपुत्रेच्या पात्राचे अजून नकाशांत न सांधलेले कवें नच सांधलेले राहिले तरी काय बिघडणार आहे? सहारा मैदान म्हणजे एक रेताड आहे असें एकदां ठरल्यानंतर तें या टोकापासून त्या टोकापर्यंत तुडवून पाहण्यांतच काय वैभव आहे? ज्वालामुखीच्या तोंडांत ज्वाला व पोटांत कडकडत असलेला

शिलारस असतो हें अनुमानिल्यावर तो पाहण्यासाठीं अपेष्टा सोसण्यांत काय मतलब आहे ?

सृष्ट पदार्थांचे गुणधर्म शोधून काढण्यासाठीं अगर सृष्टीच्या व्यापारांतील नियमनें कोणचीं हें ठरविण्यासाठीं केलेलें साहस हें स्वतंत्र आहे; पण अशीं कित्येक साहसें आहेत कीं, जीं फलाच्या दृष्टीनें केवळ वांझोटीं आहेत, किंबहुना जीं त्यासाठीं अंगिकारिलेलींहि नसतात; पण तीं होतात मात्र. त्यांच्या बुडाशीं माणसांची सदैव अतृप्त अशी जिज्ञासा असते, हेंच खरें. हीच जाणण्याची इच्छा सहस्रनेत्र आणि सहस्रपाद बनून आपला व्यापार सगळीकडे चालवीत असते. तिच्या सपाट्यांत वरील मोठ्या माणसांचीं चरित्रें सांपडतात. डोंगराचे पठार व वाळूचे चढउतार प्रत्यक्ष पाहिले हेंच जिज्ञासेचें पर्यवसान होय. याहून जास्त म्हणजे त्यावरून काढावयाच्या अनुमानाची वगैरे कांहीं एक अपेक्षा नसते. अर्धवट काम राहूं द्यावयाचें नाहीं अशी प्रवृत्ति समुच्चयरूपानें तरी मानव्यानें दाखविली आहे असें जें आपणांस दिसतें त्यांच्या बुडाशीं तरी ही जिज्ञासाबुद्धीच आहे. म्हणजे असें कीं, एकानें आरंभिलेलें पण अपुरें राहिलेलें काम दुसरा कोणी तरी अंगिकारितो आणि तडीस नेतो. वास्तविक या पहिल्यानें त्या दुसऱ्यास तें पत्कर म्हणून सांगितलेलें असतें असें मुळींच नाहीं. किंबहुना तो त्याला माहीतहि नसतो; पण दुसऱ्याची रुचि पहिल्याच्यासारखी असते म्हणून तो पहिल्याचें काम पुढें चालू ठेवितो व पुरें करतो. भूपृष्ठशोधकांचे इतिहास वाचणाऱ्यांच्या हें सहज ध्यानांत येण्यासारखें आहे कीं, यांतील बहुकांच्या मनांत त्यांच्यावर पुढें लादण्यांत आलेली

शास्त्रज्ञानाची लालसा मुळांत नव्हती. चिनी प्रवाशांच्या मुशाफरीच्या वृत्तान्तावरून जसें दिसून येतें कीं, नानाप्रकारचे लोकसमाज कसकसे वर्ततात हें पाहत पाहत जगभर फिरावें एवढीच त्यांची इच्छा होती, त्याप्रमाणें सृष्टीच्या विशाल शरीराचे अवयव कसकसे पसरले आहेत हें गमतीनें पाहावें हीच इच्छा पुढें 'शोधक' म्हणून गाजलेल्या लोकांच्या पोटांत होती; आणि या वैराण मुलुखांतील मुशाफरांच्या अर्ध-वट कामाची पूर्ति त्यांच्याच प्रवृत्तीच्या इतरांनीं पुढील काळांत केलेली असते.

याप्रमाणें अज्ञाताचें ज्ञान करून घेण्याची व पूर्वीच्यांनीं आरंभिलेला उद्योग अर्धवट राहूं न देण्याची प्रवृत्ति समुच्चय-रूपानें तरी मानव्यानें दाखविली आहे हें खास आहे. पण सांगण्याचा मुद्दा इतकाच आहे कीं, माहीत नसलेलें माहीत करून घ्यावें व पूर्ण करावें, मग तन्मूलक शोधांची अपेक्षा असो वा नसो; इतकी इच्छा ठेवणें हें माणसाच्या प्रवृत्तींतच दिसतें. एकानें प्रसिद्ध कवीचें प्रतिष्ठित काव्य शोधून प्रसिद्ध केलें कीं दुसरा त्याच्यापुढें जाऊन कमी प्रतिष्ठित असें दुसरें प्रसिद्ध करतो. मग तिसऱ्यास वाटतें, हें ठीक नाहीं. मग कवीनें काय लिहिलें असेल नसेल तें चटसारें म्हणजे पूर्ण कवितां-प्रमाणेंच अपूर्ण तुकडेताकडे, चार-दोन ओळींचीं लोंबटें, कीं जीं कवीला प्रसिद्धहि करावयाचीं नसतील तीं सारीं जमवून 'Complete Edition' म्हणून तो तीं प्रसिद्ध करून टाकितो. वास्तविक त्यांतील किती तरी मजकूर असा असतो कीं, ज्याला प्रसिद्धि देण्याची कांहीं जरूरी नसते, मग त्याचीं पत्रेंबित्रें, त्याचें चरित्र यांच्यामागें प्रसिद्धक लोक लागतात

७५८३

आणि त्याच्या सार्वजनिक वस्तूंप्रमाणें त्याच्या खाजगी बाबींचें भांडवलहि गांवच्या लोकांच्या समाईक मालकीचेंच आहे अशा भावनेनें तें चार लोकांपुढें आणून मांडितात. याप्रमाणें कवि जिवंत असता तर ज्या गोष्टींची प्रसिद्धि केल्याबद्दल प्रसिद्ध-कास त्यानें फटकेच मारिले असते त्या गोष्टी त्याच्या पश्चात् निर्भयपणें टीकाकार लोक चिवडावयास हातीं घेतात. हें सर्व काय आहे? ग्रे कवीच्या 'समग्र कवितासंग्रहां'त दोन ओळींचें एक लोंबट छापलें आहे! तें कशाला! त्यांत काय आहे कीं, जेणेंकरून कवीविषयींची कांहीं निराळी कल्पना व्हावी! खुद्द कवीलाहि तें प्रसिद्ध केलेलें कदाचित् आवडलें नसतें. पण वर म्हटलेंच आहे कीं, 'आणखी खोलांत काय आहे,' 'आणखी खोलांत काय आहे' असें न्याहळीत बस-ण्याची संवय माणसाला जन्मतःच आहे व म्हणून अर्धवट असें तो कांहीं एक सोडीत नाहीं. बायरन् कवीचीं चावट काव्यें हे प्रसिद्धक लोक छापीत नसावे याचें कारण इतकेंच असावें कीं, सरकारांतून शिक्षा होईल; नाहीं तर यांनीं तींहि जमवून 'बायरन्च्या लावण्या' म्हणून प्रसिद्ध केलीं असतीं! कारण बायन्रनची 'Complete Edition' निघावयास हवी ना! अपूर्ण असें कांहीं राहतां कामा नये! अशा प्रकारें अगदीं निर्हेतुक जिज्ञासा माणसानें हातीं घेतलेला विषय त्यास पुरा करावयास भाग पाडते.

माहीत नाहीं तें माहीत करून घ्यावें हा आपल्या मनाचा धर्म असला तरी एकाद्याच्या खाजगी बाबींविषयीं बोलणें किंवा लिहिणें हें अशिष्टपणाचें समजलें जातें आणि तें बरोबरच आहे. आपण अशी इच्छा कां धरावी कीं, त्या अमुक

एकाचें खाजगी चारित्र्य आपणांस कळावें ? किंबहुना, कोणी सांगू लागला व त्यांत कांहीं गैर अगर गुप्तच ठेवण्यासारखें आहे असें जर आपणांला दिसूं लागलें तर आपल्या स्वाभिमान-बुद्धीला असें वाटावें कीं, हें मी कां ऐकावें ? म्हणूनच चार मंडळी गोष्टी करीत बसली असतांना जर एकाद्यानें कांहीं ठेवणीची हकीगत सर्वांना मिळून चघळावयास दिली तर एकादा मध्येंच म्हणतो, ' हें आपल्याला बोलून काय करावयाचें आहे ! लोकांच्या खाजगी गोष्टींत आपण मन कां घालावें ? ' पण माणसें इतक्या उंचीवरून नेहमींच चालत नाहींत. तीं इतकेंच पाहातात कीं, ज्याच्याविषयीं आपण बोलत आहों तो गप्पा ठोकावयास बसलेल्यांपैकीं कोणी अगर त्याचा कोणी सगासोयरा असा नाहीं ना ! म्हणजे असें कीं, जों जों संबंध दूरचा तों तों त्याचें खाजगी ऐकावयास हरकत नाहीं असें माणसास वाटतें.

वर्तमानपत्रांत रोज प्रसिद्ध होणाऱ्या नवराबायकोच्या खटल्यांच्या हकीकती, तेथें झालेल्या कुत्सित साक्षी, बाहेर आलेलीं बिंगें, ही जणूं काय एक सार्वजनिक बाब आहे या ऐटीनें छापणारे तीं छापतात व वाचणारे आपण वाचतों. पण जर का आपल्यापैकींच कोणाची किंवा आपलीच एकादी खाजगी बाब कोर्टांत निघाली आणि तिच्या घरगुती बारीकसारीक हकीकती वर्तमानपत्रांत येऊं लागल्या तर वर्तमानपत्रकर्त्यांच्या कर्तव्याविषयीं व वाचकांच्या अभिरुचीविषयीं आपणांस केवढालीं तरी प्रवचनें सुचतील ! उलट उद्यां जर एकानें दुसऱ्याचें खाजगी पत्र फोडलें व वाचून पाहिलें तर त्यास आपण अत्यंत अशिष्ट म्हणून लेखूं; पण जर आपण इतिहास-

संशोधक असलों व जर एकादें तानाजीचें नाहीं तर हरिपंतांचें खाजगी पत्र आपणांस सांपडलें तर आपल्याला पुत्रजन्माचा आनंद होऊन आपण संशोधकांच्या मेळांत साखरा वाटूं. वास्तविक एकाद्याचीं खाजगी पत्रें फोडून पाहण्याचा आपणांस काय अखत्यार आहे ? समजा, हरिपंतानें गोपाळरावास पत्र लिहिलें आहे आणि त्याच्यावर मुद्दाम असेंहि लिहिलें आहे कीं, ' पत्र वाचून फाडून टाकावें ', पण गोपाळरावाच्या चुकीमुळें मात्र तें तसेंच राहून गेलें आहे, तर तें वाचावयाचा आपल्याला काय अधिकार आहे ? हरिपंतानें मुद्दाम लिहिलें आहे ना कीं, ' हें गोपाळरावा, पत्र वाचतांच फाडून टाक ! ' मग तें फाडलें गेलें नाहीं एवढ्याच मुद्द्यावर आपण तें वाचणार कीं काय ? वास्तविक हें गैर आहे. पण आपण तीं सर्व पत्रें मुद्दाम हुडकून काढतों, छापतों व चर्चितों. त्यांतील रहस्य हेंच कीं, जों जों मजकूर निरनिराळ्या दृष्टींनीं दूरचा तों तों तो वाचावयास हरकत नाहीं, असें आपणांस वाटूं लागतें. हरिपंत काय आणि गोपाळराव काय, दोघेहि मेले गेले; सार्वजनिक बाब कांहीं सांपडेल म्हणून पत्रें पाहिलीं, त्यांत खाजगी मजकूर निघाला तोहि वाचला, यांत कोठें बिघडलें, समजा, त्यांचें कांहीं खाजगी आम्हांस कळलें तर त्या मेलेल्यांना त्याचें काय होय ? —असें वाचकांच्या मनांत येतें. पण तेंच भूतकाळांत प्रत्यहीं दूर दूर जात असलेल्या एकाद्या व्यक्तीचा वर्तमानाशीं निकट संबंध असेल तर तें खाजगी प्रकरण तसें निद्रितच राहूं देण्याची बुद्धि शोधकांस होईल. कारण येथें दूरपणा नाहींसा झाला. शेंकडों मोठ्या माणसांच्या चरित्राला असा दूरपणा असतो आणि म्हणून त्या चरित्राकडे

बारकाईनें पाहावयास हरकत नाहीं असें आपणांस वाटूं लागतें.

पण केवळ जिज्ञासेचा हा मुद्दा खरा असला तरी कोणचीहि चवकशी करितांना आपण ती कशासाठीं करीत आहों याचा विवेक आपण करतोंच. 'नसती चवकशी हवी कशाला ?' असें आपण एकमेकांस म्हणतों. बिनमुद्दयाच्या चवकशीला चांभारचवकशी असें अधिक्षेपक नांव आपण देतोंच. ज्या गांवाला आपल्याला जायचें नाहीं त्याची वाट पुसा कशास, असेंहि म्हणावयाची चाल आहे; म्हणजे काय कीं, एकादी चवकशी करितांना, ही आपण कोणच्या कारणासाठीं करीत आहों हें आपण प्रथम मनाशीं ठरवितों; त्या चवकशीचें पर्यवसान केवळ करमणूक हेंहि असूं शकेल; पण तें तरी कारणच झालें. तेव्हां थोर लोकांच्या खाजगी चरित्राकडे पाहावयाची इच्छा या सर्वसामान्य कारणामुळें जरी झाली तरी त्यांत गैर असें कांहींच नाहीं. पण या सर्वसामान्य कारणापेक्षां अधिक महत्त्वाचीं व गंभीर स्वरूपाचीं दुसरीं कारणेंहि आहेतच आहेत. त्यांच्याविषयींच्या आपल्या ज्ञानाला सुपूर्णपणा यावा असें माणसास वाटतेंच. जें एक अंग आपणांस माहीत झालें आहे तें अपुरें ज्ञान आहे व त्यानें जर आपणांस इतका आनंद होतो तर त्या विषयभूत पुरुषाच्या चारित्र्याचीं इतर म्हणजे घरगुती अंगेंहि काय आहेत तीं पाहावीं असें वाटणें ओघानेंच येतें. म्हणून त्यांच्या खाजगी चरित्राकडेहि आपली दृष्टि जाते. आतां आपल्याला बोध प्राप्त व्हावा यासाठीं त्यांचीं चरित्रें पाहावींशीं वाटतात असें कोणाकोणाचें मत आहे. हें मत उगाच आहे. आजपर्यंतच्या एतत्पर प्रयत्नांनीं

22223 दि. [illegible]

बोधामृत इतकें सांठून राहिलें आहे कीं, माणसांनीं आतां त्याच्या नव्या शोधांत न पडतां त्याच्या अंमलबजावणीस मात्र सुरुवात करावी असें म्हणण्याची जरूरी आहे ! पण माणसें शोधींतच राहतील, बोधाप्रमाणें व्यवहार करतील हें खरें वाटत नाहीं. तेव्हां हें बोधामृताचें कारण उगाच कांहीं तरी आहे. दुसराहि एक विचार भरींत भर म्हणून येतो. मोठ्या माणसांना खाजगी असें कांहीं उरतच नाहीं असें कित्येकांना वाटतें. पण हा त्यांचा भोळा भाव आहे. आपण होऊन त्यांनीं आपलें खाजगी चरित्र जर सार्वजनिक मानलें तर मग त्यांना कांहीं खाजगी असें उरलेंच नाहीं असें म्हणतां येईल; पण तसें जर नसेल, किंबहुना आपलें खाजगी चरित्र उघडकीस येऊं नये अशी जर त्याची अपेक्षा असेल तर तें दरदरां ओढून बाहेर काढण्यांत कितीसा सुयुक्तपणा आहे हें त्यांच्यावर प्रेम करणाऱ्यांनींसुद्धां नीट ठरवावयासच हवें. पण इतकें खरें आहे कीं, असें म्हणणारे लोक तर्कांत चुकतात, हेतूंत चुकत नाहींत; त्यांना आपल्या पूज्य वस्तूला खाजगी असें कांहींच नव्हतें असें भोळेपणानें वाटतें.

केवळ जिज्ञासेपेक्षां व वर दिलेल्या कारणांपेक्षां अधिक खोल भावना शोधकांच्या मनांत खास असतात. जो मनुष्य आपल्या सार्वजनिक चारित्र्यांत इतका थोर तो खाजगी चारित्र्यांतहि तितकाच थोर असावा असा माणसांचा अंदाज असतो; कां कीं, त्यानें **तसें असावें** अशी त्याच्या **चित्ताची भूक** असते. माणसाला अपूर्णता भोवतालीं दिसतच असते; आणि जर उघड चारित्र्यांत इतकी अपूर्णता तर खाजगी चारित्र्यांत इतकासा निकोपपणा कोठून येणार असें

त्यास वाटतें. पण लौकिक चारित्र्य जर मोठें भव्य आणि लोकोत्तर असेल तर खाजगीहि तसेंच असेल, म्हणजे असावें असा त्याचा अंदाज व त्याची इच्छा असते. म्हणून तें पाहण्याची त्याला इच्छा होते. सामान्य लोकांत जें सांपडत नाहीं तें असामान्यांत तरी सांपडावें असें त्यास वाटतें. आपल्याला पूज्य बनलेली वस्तु अन्तर्बाह्य सोज्ज्वल आणि स्फाटिकासारखी निर्मळ असावी अशी त्याची अपेक्षा असते. ती तशी आहेसें आढळलें तर आपली पूजा विभूतींचीच झाली असें समाधान त्याला प्राप्त होतें. हें समाधान प्राप्त व्हावें म्हणून तो आपल्या विभूतींचीं खाजगी चरित्रें तपासून पाहतो.

पण येथें एक गमतीचा विचार सुचतो. आपल्याला पूज्य असलेली विभूति ही सर्वांगांनीं पूर्ण असावी, तिच्यात तिळाइतकाहि दोष असतां कामा नये अशी माणसाची अपेक्षा असते आणि म्हणून अशा कल्पनेनेंच तो तिचें खाजगी चरित्र पाहूं लागतो आणि तें जर कल्पनेप्रमाणेंच ठरलें तर त्याला मोठा हर्ष होतो; पण उलटपक्षीं नाटककारांनीं किंवा कवींनीं उत्पन्न करावयाच्या हीरोविषयीं रसिकांचें काय मत असतें तें पाहा. त्यांनीं आपला हीरो जर सर्वगुणसंपन्न आणि सर्वस्वीं परिपूर्ण असा बनविला तर रसिक लोक म्हणतात कीं, या हीरोंत माणसाच्या खुणा नाहींत, मानुषतासुलभ असें जें प्रमादशीलत्व म्हणजे सामान्यपणा तो याच्या ठायीं कोठेंच दिसत नाहीं. हा अति तेजस्वी बनलेला हीरो मानव्याच्या पलीकडचा दिसतो ! प्रिन्स आर्थरची राणी 'त्याच्या गुणैश्वर्याच्या तेजाला दिपून दुरूनच म्हणाली कीं, ' हा राजा माझ्याजोगता नाहीं, हा कडकडीत आणि तीव्र अशा

गुणांनीं असा जोरानें तळपत आहे कीं, माझ्या प्रेमळ व सामान्य मनाला त्याची प्रीति भावत नाहीं '. त्याचप्रमाणें रसिक लोक नाटककाराच्या अशा नायकापासून परत वळतात, आणि कवीच्या मनुष्यस्वभावाच्या पारखीविषयीं जरा हीन मत बनवितात! पूर्णत्व जेथें नाहीं तेथें तें कल्पावयाचें; पण तेंच कल्पनेचें पूर्णत्व एकाद्या ठिकाणीं मानिलें तर तेथें 'मानुषता' नाहीं म्हणून हळहळावयाचें हा न्याय फार चमत्कारिक खरा! पण वर लिहिल्याप्रमाणें भक्तांना, श्रद्धाळूंना व जिज्ञासूंनासुद्धां अपूर्णत्व चोहोंकडे दिसत असल्यामुळे त्यांना पूर्णत्वाची भूक लागते आणि ते आपल्या हीरोच्या ठिकाणीं वांछित पूर्णत्व सांपडेल या कल्पनेनें त्यांचीं चरित्रें शोधितात.

हें चरित्रशोधन झाल्यावर त्यांना पुष्कळदां खेद होतो. हें आपण कशाला पाहिलें असें त्यांस वाटतें. संशोधक लोक हीं सर्व चरित्रें बारकाईनें हुडकून काढून छापतात. कोणी शूरांचीं, कोणी राजांचीं, कोणी संतांचीं, कोणी कवींचीं अशीं निरनिराळ्या मोठ्या माणसांचीं, खाजगी तपशीलसुद्धां भरपूर देणारीं, चरित्रें प्रसिद्ध करतात. तीं वाचलीं म्हणजे वाचकांच्या मनांत अनेक संमिश्र भावना उत्पन्न होतात, तीं तीं चरित्रें वाचावयाच्या आधीं त्या माणसाविषयीं असलेला आदर कदाचित् डळमळूं लागतो आणि आपण ज्याला थोर म्हणून समजत होतों तो एकंदरीनें असलाच होता असली हीन भावना वाचकांच्या मनांत उत्पन्न होते. पण त्यानें याच ठिकाणीं फार जपलें पाहिजे. आपण ज्याला मोठें समजत आहों त्याचें मोठेंपण कोणच्या बाबतींत आहे हा विचार मनापुढें त्यानें सदैव ठेविला पाहिजे; म्हणजे भलत्या ठिकाणीं भलतीच अपेक्षा

केल्याचा प्रमाद त्याच्या हातून होणार नाहीं. म्हणजे असें कीं, एकाद्या कवीचें खाजगी आचरण कसें होतें हें जर त्याला कळलें तर त्याच्या कवित्वविषयक मोठेपणाबद्दल त्यानें आपलें मत हीन होऊं देतां उपयोगाचें नाहीं. कवीनें जें लिहून ठेविलें आहे तें चांगलें आहे ना ? मग तेवढ्यापुरतेंच त्याचें मोठेपण मानावयास आपल्याला हरकत नाहीं. नसत्या उठाठेवी करणाऱ्यानें, पांचशें वर्षांमागें होऊन गेलेल्या एकाद्या प्रतिभासंपन्नाविषयीं कांहीं प्रकरण शोधून काढून छापिलें तरी त्याचें आज काय होय ? आणि त्यामुळें त्याच्या कवित्वाची किंमत कमी कशी होणार ? त्याला जें आपण मानिलें तें त्याच्या कवित्वामुळें होय ! आणि जर हा उद्योग लेखकांनीं केला नसता तर आपलें मत त्याविषयीं जसें राहिलें असतें तसेंच या अभिनव ज्ञानानंतरसुद्धां राहावयास कांहीं हरकत नसावी. व्यक्ति आणि तिची कृति या दोन गोष्टी एकमेकीं-पासून दूर ठेवणें हें अगदीं जरूर आहे. पण हें केव्हां ?— तर प्रतिपादन आणि प्रतिपादकाचें वर्तन यांचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नसेल तेव्हां !

पण जरकरतां कवीनें सद्गुणांवरच प्रवचनें लिहिलीं असलीं व आपण स्वत: सद्गुणांस पारखा असला तर मात्र त्याच्यासंबंधानें कमी मत व्हावें हें साहजिकच आहे. येथेंसुद्धां खुद्द त्या व्यक्तीविषयीं मत वाईट होईल, त्याच्या लिहिण्या-विषयीं हटकून वाईट मत झालेंच पाहिजे असें म्हणतां येत नाहीं. इतकें मात्र म्हणतां येईल कीं स्वत:च्या प्रतिपादनावर कवीचा विश्वास नसावा. ही त्याची निंदा कवीलासुद्धां पत्क-रावी लागेल, तरी पण त्याच्या अंगानेंहि अजूनसुद्धां कांहीं तरी

म्हणतां येण्यासारखें आहे. तो म्हणेल, "मला माझ्या प्रतिपाद्याबद्दल आदर आहे पण मला माझ्या मनोवृत्ति कह्यांत ठेवितां येईनात, हें खरें आहे. पण तेवढ्यामुळें माझ्या प्रतिवादनांतील उदात्त रस नाहींसा कसा होणार !" दुसराहि एक बारीक विचार मनांत येतो. वाईट आचाराच्या माणसाकडून चांगले विचार ऐकण्याला माणसें कबुली देतात. पण तीं केव्हां ?—लेखकानें पश्चात्तापपूर्वक सद्‌गुणांचें गायन केलें असेल तेव्हां हें गायन लोकांना फार चांगलें वाटतें. वाईट चालीच्या स्त्रियांनीं पश्चात्तापानें जेव्हां पातिव्रत्यधर्म गाइले तेव्हां त्यांनाहि सर्वांनीं चांगलेंच म्हटलें.

परंतु वाचकांच्या या वरील अपेक्षेंतसुद्धां मोठें सौरस्य आहे. त्यांचें काय म्हणणें असतें तें पाहा. ते म्हणतात, "कविता आणि खुद्द कवि, प्रतिपाद्य आणि प्रतिपादक यांच्यामध्यें ताळमेळ असावा." तो पुष्कळदां नसतो तरी त्यांचें लिहिणें विनाकारण वायां जाऊं नये म्हणून आपण लेखक आणि लिखित यांचा संबंध तोडून टाकून लिखितास वांचवावयास पाहतों. पण वाचकांची ही जी अपेक्षा कीं दोहोंत ताळमेळ असावा, ती अत्यंत सुसंबद्ध आहे असें वाटतें. चांगलें चांगल्यांतून निघावें किंवा निघतें आणि वाइटापासून वाईट निघतें हें माहीत असल्यामुळें उत्पादक आणि उत्पादित यांच्यांत सरूपता असावी अशी त्याची अपेक्षा असणें साहजिकच आहे.

फौजेंत भरती करण्यासाठीं माणसें गोळा करावयास जर एखाद्या ठेंगण्या व काटकुळ्या माणसास धाडिलें तर श्रोते त्यास हंसूं लागतील व याउपर जर तो असें म्हणूं लागला कीं, "माझ्या काटकुळेपणाशीं तुम्हांला काय करावयाचें आहे ? मी

काडीसारखा हडकुळा आणि भुईसरपट ठेंगणा जरी असलों तरी माझें म्हणणें काय आहे इकडे तुम्ही लक्ष द्या." तरी लोक त्याला जास्तच हंसूं लागतील. क्षयी माणसानें केलेलें तालीमबाजीचें प्रतिपादन आणि हजार स्त्रियांच्या झनान्याच्या मालकानें केलेला एकपत्नीव्रताचा उपदेश हे सारखेच निरुपयोगी होत. "आमच्या म्हणण्याकडे तुम्ही लक्ष द्या. आम्ही कसें वागूं तें पाहूं नका." हें त्यांचें आग्रहाचें प्रतिपादनसुद्धां उपहास्य बनेल. म्हणून उत्पादिलेली वस्तु आणि उत्पादक यांच्यामध्यें सुसंगति असावी अशी लोकांची जर उपजतच अपेक्षा असली तर त्यांत कांहींच गैर नाहीं. शिवाय लोक असें म्हणतात कीं, "सद्गुणांचें प्रतिपादन करावयास सद्गुणीच प्रतिपादक मिळतनासे झाले आहेत कीं काय, कीं लफंग्यांकडून सद्गुणांचें कौतुक ऐकावें? आम्हांला सद्गुणी माणसें मिळण्यासारखीं आहेत त्यांजकडून आम्ही ऐकूं. एवढी गय करून तुमचें ऐकून घेण्याची कांहीं एक जरूरी नाहीं. नीति ही नीतिमानांकडून ऐकूं येईनाशी झाली काय, कीं ती अनीतिमानांकडून ऐकावी? तुम्ही कवि लोक 'बोले तैसा चाले' ही तुकारामबुवांची उक्ति हजारों वेळां घोळतां आणि ढोंगी लोकांच्या बाह्य सदाचारावर खडाखड कोरडे ओढून त्यांची फजिती करितां! किती तरी कवींनीं ढोंग्यांचे बुरखे फाडून टाकिले आहेत. मग लोकहितासाठीं हें जें शस्त्र तुम्ही गाजवितां तें तुमच्यावरच उलटविलें तर 'आमचें काव्य, आमचें लिहिणें कसें आहे तें पाहा; आमच्या खाजगी आचाराकडे कशास लक्ष देतां?' अशी विनंती तुम्हीं कवींनीं व लेखकांनीं कां करावी? 'बोले तैसा चाले' या वचनाला तुम्ही मान

देईनासे झाला काय " तेंव्हां कवींनीं व लेखकांनीं " तुम्हांस 'बोले तैसा चाले' इत्यादि तत्त्व सांगतों, तें तुम्हीं पत्करावच पण आम्हांस मात्र त्यांतून वगळा. " असें गूढ आर्जव कां करावें ?

हें सर्व लिहिणें प्रतिपादक आणि प्रतिपाद्य, कर्ता आणि कृति यांच्यांत मेळ असावा अशी जेंव्हां हटकून अपेक्षा असते तेंव्हांचें झालें; पण जेथें अशी अपेक्षा नसेल तेथें लोकहि गय करूनच चालतात. फार कुशल चितारी आणि लोकांस भारून टाकणारा नट यांच्या खाजगी चारित्र्यांत जर कांहीं बैदा असला तर त्याकडे जग फारसें लक्ष देत नाहीं. तें म्हणतें, 'आम्हांस काय करावयाचें आहे, मारीना झक !' अर्थात् जगाचें आणि त्यांचें नातें जेवढ्या सार्वजनिक बाबीपुरतें येतें तेवढा विचार जग त्यांच्यासंबंधानें करितें व बाकीच्याविषयीं उदासीन राहतें. अलेक्झॅन्डरनें दारू पिऊन मित्राचा खून केला असला तर एक तिळमात्र दोष कळला म्हणून तेवढ्यापुरतें आपल्याला कसेसें वाटतें. पण त्याच्या एकंदर गुणैश्वर्याची किंमत सामान्यपणें आपण कमी करीत नाहीं. कारण कर्ता आणि कृति यांमध्यें सुसंगतीची अपेक्षाच आपण या ठिकाणीं ठेविली नव्हती.

दुसरा एक विचार असा आहे कीं, ज्यांच्यासंबंधानें ही अपेक्षा असते ते लोक वर एके ठिकाणीं सुचविल्याप्रमाणें जों जों जास्त जास्त दूर जातील तों तों ही अपेक्षासुद्धां लोक उत्तरोत्तर कमी ठेवीत जातात व शेवटीं जरी शोधकांनीं कांहीं वेडेंवांकडें सांगितलें तरी त्याच्यासंबंधानें उदासीन राहून प्रतिपादकांच्या लोकोत्तर गुणांवरचा आपला लोभ मात्र चिरंतन ठेवितात. अर्थात् लोक असें करितात म्हणून विद्यमान

कवि, लेखक, प्रतिपादक, किंवा पुढारी जर अशी अपेक्षा करूं लागले कीं, आम्ही कसेहि असूं, आम्हांला लोकांनीं भलेंच लेखिलें पाहिजे; तर ती त्यांची अपेक्षा साफ चूक आहे. लोक तुम्हांला कमी लेखून तुमची अवहेलना करणारच; कां कीं, तुम्ही त्या त्या काळचीं समाजबंधनें उल्लंघिलीं आहेत व शिवाय कर्ता व कृति यांच्यांत मेळ असावा अशी येथें अपेक्षा आहे; लोक तुमच्या या **अनाचाराकडे** पाहतात व त्यांनीं आपल्या **विचाराकडे** पाहावें आणि आपणांस चांगलें म्हणावें अशी तुमची अपेक्षा असते. सामान्य लोकांना हे तार्किक फरक कधींहि कळावयाचे नाहींत. त्यांच्यापुढें रोजचा व्यवहार असतो आणि त्यावरून ते तुमची किंमत ठरवितात. ती एकदां हिणकस ठरल्यानंतर तुमचे विचार हे तर त्यांस केवळ थोतांडासारखे वाटतात. अर्थात् तुमच्या लिखाणाची महती होत नाहीं. तसेंच, ज्या कोणाला हे तर्कांतील फरक प्रतीत होतात व ज्यांना तुमचें प्रतिपादन फार सुंदर आहेसें वाटतें तेसुद्धां तुमच्या ग्रंथांसंबंधानें धूर्तपणानें गप्प राहतात. कारण त्यांना अशी भीति असते कीं, यांची स्तुति आम्ही करूं एका कारणासाठीं आणि तीमुळें यांना सामान्य जनाच्या आदरास आम्हीं विनाकारण पात्र केल्यासारखें होईल; म्हणजे एका वाईट माणसाला चांगल्या ठिकाणीं नेऊन पूज्य बनविल्याचा धंदा आपण केला असें होईल. त्यांना याप्रमाणें वाटतें म्हणून तेहि गप्प बसतात. पण जों जों वर्तमानकालीन आचाराची चिकित्सा कालगतीनें मागें मागें पडत जाईल तों तों तुमचें स्थान तुम्हांला मिळूं देण्याला जाणते लोक केव्हांहि तयारच होत जातात.

सबंध जनतेचें मन या बाबतींत तरी फार निकोपपणानें विचार करितें असें दिसून येतें. ध्यानांत ठेवावयास हवें तोंपावेतोंच तें माणसाचे प्रमाद ध्यानांत ठेवितें; आणि विसरण्याची वेळ झाली म्हणजे प्रमादांची आठवण करून दिली तरीसुद्धां तें विसरून जाऊन किंवा मागें टाकून माणसांच्या गुणांवर मात्र तें कायमचा लोभ ठेवितें. कवीनें म्हटलें आहे,
" The evil that men do lives after them,
the good is oft interred with their bones."
पण याचा अर्थ जर oft शब्द वगळून भोळेपणानें केला तर तो आपल्या सध्यांच्या प्रतिपाद्याच्या विरुद्ध जाईल. त्यांचें म्हणणें असें कीं, **अनेकदां** वाईट जिवंत राहतें आणि चांगलें कर्त्याबरोबरच्च गाडलें जातें. बोलणारें पात्र दुःखानें असें वदत आहे. कारण तेव्हांच्या प्रसंगाला तें योग्य होतें. पण त्याच ॲन्टनीचें मन शोक आणि दुःख यांची बतावणी करण्याची इच्छा हिजपासून मुक्त होऊन निकोपपणानें विचार करूं लागलें असतें तर oft शब्दानें सुचविलेला व राखून ठेविलेला तर्काचा खरेपणा त्यानें पूर्णपणें फुलविला असता आणि म्हटलें असतें, " वाईट माणसाबरोबर मरतें, पण चांगलें मात्र माणसाच्या मागें हजारों वर्षें जगतें." आणि याला कारण मानव्याची विवेकबुद्धि आणि निकोप मनःप्रवृत्ति ही होय.

चरित्रकारानें आपली वस्तु खमंग बनविण्यासाठीं, जिज्ञासातृप्तीसाठीं अगर इतर चरित्रकारांवर चढ करण्यासाठीं जरी कांहीं नवीं गुह्यें आम्हांला सांगितलीं तरी आम्ही त्यांचा कांहीं एक विचार करणार नाहीं. बेकननें न्यायासनावर बसूनच न्याय विकला आणि आपला तळिराम गार केला, हें आम्हांस चरित्र-

कारानें सांगितलें तरी यूरोपांत व विशेषतः इंग्लंडांत आधि-भौतिक शास्त्रांची पराकाष्ठेची आवड उत्पन्न करून तत्रस्थ लोकांच्या निद्रित मनाला त्यानें केवढी चालना दिली हें आम्हांस कसें विसरतां येईल ? लूथरनें फकीर बनूनसुद्धां मठाच्या जोगिणीवरच मन ठेवून संसार सुरू केला हें बारीक कूस जरी आम्हांस कळलें तरी त्याच्या धर्मसुधारणेच्या मनस्वी-पणाबद्दलचा आपला आदर कमी होण्याचें आज कारण नाहीं. रूसो हा खाजगी आचारांत केवळ नादान होता हें खरें असलें तरी समाजक्रान्तीचीं त्याचीं प्रतिपादनें निकामी ठरणार नाहींत. शेक्सूपियरनें लहानपणीं लोकांच्या परड्यांतलें हरिणाचें पिलूं चोरून आणिलें असलें किंवा भावी पत्नीला लग्नाच्या आधींच जरी त्यानें आईपण मिळवून दिलें असलें तरी आपल्यास त्याचें आज काय होय ? त्यांच्या त्यांच्या जीवितांतील मुख्य लोकोपयोगी आणि लोकोत्तर कामगिरी कोणची याकडेच आपलें लक्ष असावयाचें. वेदाभ्यासजड अशा मिल्टनला पाहून त्याची चणचणीत आणि गायनवादन-प्रिय अशी नवपरिणीता वधू त्याच्यापासून ओशाळून निघून गेली, हें वाचल्यानें 'पॅरॅडाइज लॉस्ट' संबंधींच्या आमच्या मतांत काय अंतर पडणार आहे ? कोलंबस एक राख ठेवून राहत असे, नेपोलियननें कबुलीजबाबानें सात व्यभिचार केले आणि तैमूरलंग हा अघाश्याप्रमाणें कोल्डड्रिंक पीत पीत मेला हें कळून आम्हांस काय करावयाचें आहे ? फार तर चारचौघांत बोलतांना आपल्या माहीतगारपणाचा दिमाख दाखविण्यास हें भांडवल उपयोगी पडण्यासारखें आहे. क्रॉम्वेल हा एक मोठा आड-दांड, खुनशी, अघोरी, असा उपटसुंभ होता, ह्या माहिती-

वरून लोकसत्तास्थापनेची त्याची करणी भावी पिढ्यांनीं कधीं अवहेलिली आहे काय? कोठें तरी अवघड ठिकाणीं मनें गुंतवून ठेवून अनाचारास प्रवृत्त झालेले आणि मग मेलेल्यांचीं भुतें पाठीवर घेऊन देशोदेशीं पळत सुटणारे इंग्रज कवी आपल्या कवितागुणाच्या बळावर लोकांस आनंदवीत राहणारच राहणार हें स्पष्ट आहे. आपल्या पत्नीनें मात्र कसलेंहि संशयास्पद वर्तन करितां उपयोगाचें नाहीं असें ठासून बजावणाऱ्या सीझराला त्याच्या स्वतःच्या स्वैर वर्तनाबद्दल त्याच्या मित्रांनीं कसें लाजविलें होतें, याची हकीगत आपण वाचली तरी वाचकाच्या मनांत असें येतें कीं, याच्याशीं मला काय कर्तव्य आहे? सीझरनें अशी अहंता कधीं भोगिली होती कीं, याहि बाबतींत मी सामान्य-लोकातीत आहें! सिसेरो, पॉम्पे इत्यादि लोक, कीं जे भूतकालाच्या अथांग खोल दरींत उभे राहूनसुद्धां आपलीं उंच मस्तकें आपल्या दृष्टीपर्यंत उभवूं शकतात, त्यांनीं केलेल्या समाजांतील गफलती आणि स्त्रिया म्हणजे चैनीच्या वस्तु कल्पून त्यांच्या केलेल्या अदल्याबदल्या यांविषयीं वाचलें म्हणजे आपणांस क्षणभर वाटतें कीं, हे लोक केवढे हैवान होते! परंतु आपण तत्काळ जागे होतों आणि या गोष्टींवर झांकण टाकून त्यांचें वक्तृत्व, राजकारणपटुत्व, पराक्रम व स्वभावाची दिलदारी एवढेंच ध्यानांत ठेवून पुढें चालतों.

याप्रमाणें उदाहरणांची मोजदाद पुष्कळच करतां येण्यासारखी आहे. परंतु सर्वांचें पर्यवसान एकच आहे आणि तें हें कीं, त्या त्या लोकांच्या वाईट गोष्टी विसरून जाऊन चांगल्या गोष्टी मात्र ध्यानांत ठेवण्याचें धोरण लोकसमाज उत्तम

पाळतो. अर्थात् हेहि लोक सर्व गुणांनीं पूर्ण असते तर बहारीची गोष्ट झाली असती व तसे कोणी असले तर ते सर्ववंद्य ठरतील यांत शंकाहि नाहीं. परंतु एका अंगास गुणसंवर्धन करतां आलें तर सर्वहि अंगांस तसेंच करतां आलें पाहिजे, तरच तो मनुष्य चांगला असा आग्रह तत्कालीं खरा असला तरी कालगतींत मात्र खरा नाहीं. आपल्या मानन्याच्या वाढीला आणि महतीला जो कांहीं अल्पस्वल्प पाठपुरावा या लोकांना करतां आला तो जमेस न धरला व त्यांच्या एकाद्या बारीक वैगुण्याचीच आपण चिकित्सा करीत बसलों तर आपल्यांत रसिकता व कृतज्ञता हीं दोनहि नाहींत असें होईल. माणसांचे बसविलेले पुतळे जसे डोकें, तोंड, छाती आणि थोडेसे बाहु एवढ्यापुरतेच पूर्ण बनवून लोकांपुढें मांडलेले असतात, पण ज्याप्रमाणें लोक इतर अवयव नसल्याची खंती बाळगीत नाहींत—कारण घडविणारानें ते घडवलेच नाहींत—त्याप्रमाणेंच या मोठ्या लोकांच्या बाबतींतहि कांहीं गुणांचा जोराचा विकास झाला आणि कांहीं खंदरें आणि खळगटें भरावयाचीं तशींच राहून गेलीं एवढाच याचा अर्थ आहे असें लोक मानतात.

ही लोकांची प्रवृत्ति वर म्हटल्याप्रमाणें सर्वथा निर्कोप आहे. म्हणून या शोधकांपेक्षांसुद्धां मनाच्या मगदुरांत जनता श्रेष्ठ आहे असें म्हणावें लागेल. मात्र लोक पुढें विसरतात म्हणून चालू काळांतसुद्धां लोकांनीं विसरावें ही अपेक्षा अगदीं अनुचित आहे आणि म्हणून लेखकांनीं, कवींनीं, पुढाऱ्यांनीं आणि प्रतिपादकांनीं, कीं ज्यांच्या अंगीं मोठेपणाच्या खुणा स्पष्ट दिसत आहेत, त्यांनीं या बाबतींत पवित्र राहिलें पाहिजे; नाहीं तर मग जगानें आपणांस भलेपण द्यावें अशी अपेक्षा तरी ठेवूं नये. मोठ्या

माणसांचीं खाजगी चरित्रें जर चांदण्याप्रमाणें शुभ्र असलीं तर आपली आवडती विभूति अर्थातच अधिक आवडीची बनेल हें तर सांगावयासच नको. म्हणून तर नसते सद्‌गुणसुद्धां भक्त लोक आपल्या देवतेच्या अंगास चिकटवितात. अशा प्रकारच्या विभूति क्वचित् कोठें तरी उत्पन्न होतात आणि त्या आदरास पात्र आहेत हेंहि सिद्धच आहे. पण अशा विभूतींची गांठ कोठें पडेना म्हणून जें कांहीं मोठेंपण इतर अर्धवट वाढीच्या लोकांतहि आपणांस दिसत असेल त्याची अवहेलना आपण करूं लागलों तर मानव्याची ही भव्य परंपरा केवळ नीरस व उदासवाणी होऊन बसेल.

# ६. लहान लहान वशीकरणें

आपल्या सगळ्या वैगुण्यांत मनुष्यस्वभावाचें अज्ञान हें वैगुण्य फार हानिकारक ठरतें असें मला वाटतें. ज्या लोकांना प्रपंचांत व लौकिक व्यवहारांत यश मिळतें त्यांना इतर सामर्थ्यांच्या जोडीला मनुष्यस्वभावाचें ज्ञान असण्याचा उपयोग फार होतो असें दिसून येईल. जेथें इतरांशीं प्रसंग येतो तेथें त्या इतरांच्या स्वभावाचें ज्ञान असणें किती अवश्य आहे हें व्यवहारांत सहजासहजीं प्रत्ययास येतें. आपलें म्हणणें जर एकाद्याला पटवावयाचें असलें तर, तुम्हीं त्याच्याशीं बुद्धिवाद करावा हें योग्यच आहे; पण त्याच्या जोडीला दुसरीं कांहीं वशीकरणें अवश्य असतात. त्याच्या समजशक्तीला सारखें आवाहन करीत बसलांत तर तो बुद्धिवश असल्यास तुमच्या मताकडे झुकूं लागेल हें खरें; पण दरवेळीं आपल्याला बुद्धिवादाचाच प्रसंग असतो असें नाहीं. आपल्याला कांहीं ना कांहीं सांगावयाचें असतें, गळयांत बांधावयाचें असतें, साधून घ्यावयाचें असतें,

गोड करून घेतात का पाहावयाचें असतें. तेथें बुद्धिवाद कुठला! तेथें निराळीच विद्या हवी. ही विद्या माणसांच्या स्वभावाचें ज्ञान असण्यानें प्राप्त होते. लाघवीपणाला वश न होईल असा माणूस क्वचितच एखादा असतो. ऐकणाऱ्याच्या मनाला भाव व भावना यांचे अत्यंत नाजुक असे कोंवळे कोंवळे अंकुर आलेले असतात; त्यांना स्पर्श झाला म्हणजे त्याला सुख उत्पन्न होतें. यांपैकीं कोणत्या अंकुराला स्पर्श करावयाचा हें कळण्याचें तारतम्य बोलणाऱ्याच्या अंगीं असलें म्हणजे त्याचें काम झालें म्हणून समजावें. शुद्ध बुद्धिनिष्ठ अशीं कांहीं माणसें असतातच. त्यांच्या मनाला आतांच सांगितलेले अंकुर नसतात असें नाहीं; पण यांना स्पर्श करून आपलें बुद्धिवादाचें शस्त्र बोथट करण्याची हिकमत कोणी करीत नाहीं ना, या विचारानें ते नेहमीं जागरूक असतात. अशा लोकांची संख्या फार अल्प असते. एरवीं अगदीं करडे वाटणारे, सावध असलेले, प्रत्येक बाब बुद्धिदृष्ट्या पाहणारे लोकसुद्धां—शेलक्या प्रसंगीं अगदीं साध्या पण सूक्ष्म आवाहनानें वश होतात. फक्त काळ-वेळ पाहून त्यांच्या मनाच्या कोणत्या अंकुराला मृदु स्पर्श करावयास हवा हें ओळखण्याचें काम बोलणाऱ्याला साधलें पाहिजे.

माझा एक स्नेही आहे. त्याला हें बोलण्यांतलें लाघव फार साधलेलें आहे. आपण याला कां वश झालों हें न कळतांच दुसरा त्याच्याशीं सहमत होतो. दुरून चिकित्सेनें त्याचें संभाषण ऐकणाऱ्याला मात्र हा अगदीं साध्या साध्या अशा हिकमती योजीत आहे हें कळून येतें. बोलतां बोलतां तो मधेंच गोड संबोधनें आणतो! त्याच्या बोलण्यांतली सफाई पाहण्यासारखी असते: "कुणाला न विचारतांच मीं या उद्योगाला

सुरुवात केली; घरांतल्या माणसांना मोठं चमत्कारिक वाटलं; त्यांनीं वडिलांना करमाळ्याला लिहून धाडलं; त्यांचंहि पत्र रागारागानं आलं; बरं भाऊकाका ! या सगळ्यांनीं मला अगदीं गांगरवून टाकलं; भाऊकाका, तुम्हीच पाहा ! यांत माझं काय चुकलं बरं ! मीं त्यांना स्वच्छ सांगितलं कीं, भाऊकाका जें सांगतील तें मी ऐकेन; त्यांनीं माझ्या दोन तोंडांत मारल्या तरी चालेल ! भाऊकाका ! यांत माझं काय हो चुकलं ! " 'भाऊकाका, भाऊकाका, या संबोधनांची खैरात तो इतक्या शिताफीनें करीत आहेसें दिसेल कीं, भाऊकाकांना त्याच्याविरुद्ध बोलण्याची बुद्धीची होऊं नये. शिवाय विनयाची त्यांत भर आहेच ! माझा दुसरा एक स्नेही आहे; तो विरोधाचें अग्र बोथट करण्याच्या कामीं मोठा कुशल आहे. आपल्या म्हणण्याचा तडकाफडकीं निकाल लागून डाव विसकटण्याचा संभव आहे असें दिसूं लागलें म्हणजे तो एका निराळ्याच उपायाचा अवलंब करतो. तो म्हणतो, " मी तुम्हांला हें सांगतों आहें; पण तुम्हांला तें एकदमच आवडेल असं मीं तरी कसं समजावं ? मी तरी काय एवढा बोलणारा कुशल आहें ! तुम्हीं माझं बोलणं संथपणानं ध्यानांत घ्या; मला आपलं मत आतांच सांगूं नका, होयहि म्हणूं नका, अन् नाहींहि म्हणूं नका; मला दम आहे. " हें त्याचें बोलणें ऐकिलें म्हणजे ऐकणारा सहजच गप्प बसतो व नकार मिळण्याचा संभव कांहीं वेळ तरी टळतो !

आपल्याकडे येणाऱ्या लोकांत कांहीं कांहीं मोठे धूर्त व कामसाधू असतात. त्यांचें सगळें धोरण त्यांच्या बोलण्याच्या घावडावांत असतें. ते इतरांसारखे अधीर, रोखठोक किंवा

कंटाळलेले नसतात; त्यामुळें आपल्यालाहि त्यांचा कंटाळा येत नाहीं. " एकदां काय तें सांगानात ? एक घाव दोन तुकडे करानात ! " असें ते कधीं म्हणावयाचे नाहींत. " आतां मी तुमच्याकडे कितीदां यावें ? " असेंहि ते म्हणावयाचे नाहींत. त्यांच्या अंगांत धीमेपणा फार; ते म्हणतात, " कांहीं हरकत नाहीं; आतां उन्हाची वेळ आहे; मींच भलत्या वेळीं आलों; तुम्ही घ्या थोडी विश्रांति; उद्यां परवां असा संध्याकाळच्या वेळीं येईन....हो हो, तें बरोबर आहे; पण सहज इकडे तळ्याकडं जायचंच असतं; चौकशी करून जाईन. " त्यांनीं असें म्हटलें म्हणजे आपण ओशाळतों व त्यांनीं नक्की कोणत्या वेळीं यावें हें आपण होऊन सांगतों. आपल्याकडून हा होकार कसा घ्यावा हें त्यांना छान कळलेलें असतें ! वास्तविक पाहतां ते गृहस्थ आपल्याला पुन्हां यावयास नको असतात; पण आपण कोणच्या गुणानें वश होऊं हें त्यांना माहीत झालेलें असतें.

माझ्या ओळखीचे एक पोस्टमास्तर होते. सुमारें पंचेचाळीस वर्षांचे असतील; गोरेपान, घाऱ्या डोळ्यांचे, उंच आणि अंगानें सडपातळ, डोक्याला नेहमीं पांढरा स्वच्छ इस्त्रीचा रुमाल; अंगांत तसलाच अंगरखा; धोतर स्वत: धुऊन धुऊन गुलाबी झाकीचें बनविलेले; आणि खांद्यावरून उपरणें. चालू लागले म्हणजे कपडे सळसळत असत. चेहरा नेहमीं रागीट; त्यामुळें कोणी बोलावयास धजावयाचें नाहीं. ते अंगावरून दूर गेले म्हणजे मग शेजारून गेलेल्या दोन सोबत्यांपैकी एक दुसऱ्याला म्हणे, 'हे आमच्या गांवचे पोस्टमास्तर.' परंतु पोस्टमास्तरसाहेबांची वागणूक जरी अशी करडी असे तरी माझ्या वर्गांतल्या

तारळेकर नांवाच्या मुलाच्या बापाला त्यांची माहिती झालेली होती. मास्तरांचा मुलगा आमच्याच वर्गांत असून मोठा तरतरींत आणि हुशार असे; आणि डेप्युटीहि त्याला नेहमीं शाबासकी देत. मास्तरसाहेब घरांतसुद्धां जरी अगदीं करकर करीत असले तरी आपला मुलगा मोठा हुशार आहे या गोष्टीचें यांना मनांतून फारच समाधान असे. तारळेकराचा बाप वाटेंत त्यांना केव्हांहि भेटो. इतर माणसें जरी त्यांच्या शेजारून समोर बघत निघून गेलीं तरी हा गृहस्थ मात्र हटकून थांबे व त्यांना म्हणे, "काय, चिरंजीव गणितांत पहिले आले, म्हणे!" मास्तरांच्या तोंडावरचा करडेपणा जलदीनें ओसरूं लागून ते थोडेसे हंसत व विचारीत, "आपल्याला काय माहीत?" "आमचा नानू त्याच वर्गांत आहे ना! तो आम्हांला सांगतो; डेप्युटींनीं फार शाबासकी दिली म्हणून म्हणत होता." हें पहिल्यानें झालें तेव्हां मास्तर अगदीं प्रांजळपणानें मनापासून हंसले व म्हणाले, "नशीब आहे त्याचं." तारळेकर म्हणतात, "तें तर खरंच आहे. पण शुद्ध बीजापोटीं फळें रसाळ गोमटीं!" मास्तरांनीं नमस्कार केला आणि हंसतमुखानें म्हटलें, "आमच्याकडे आपण कांहीं येत नाहीं कधीं. उद्यां या ना सकाळीं; चहा घेऊन दोन गोष्टी करा, अन् जा."

अशीच कोणाची कांहीं, कोणाची कांहीं तऱ्हा असते.

आमचा एक परगांवचा स्नेही आहे. तो येथें आलेला होता. तो मोठा वक्ता असे. त्याचा एकदां सूर लागला म्हणजे प्रतिपक्षाविषयीं तो अगदीं अवाच्यपणानें बोलत असे. तो नवीन पंथांतील होता. वक्ता चांगला. अनेक मतांचे लोक सभेला आलेले होते. बोलतां बोलतां त्यानें श्रोत्यांत पाहिलें तो कॉंग्रेस-

वाले दिगंबरपंत देशपांडे यांचा मुलगा आपल्या मित्रांच्या टोळींत ऐकावयास बसलेला. दिगंबरपंत याचे मित्र खरे, पण प्रतिपक्षांतले आणि म्हणून व्याख्यान सुरू झाल्यावर हा त्यांच्या-वर जोरानें तुटून पडला. त्याचें तें बोलणें ऐकून मोरू देशपांडे अगदीं कावराबावरा होऊन गेला. सभा संपली तेव्हां हा गृहस्थ गर्दीच्या पलीकडून गर्जून त्याला म्हणतो, " काय रे मोरू ! काकांना सांग कीं, मी रात्रीं आतां तिकडेच जेवायला येणार आहें. " आपल्या काकांच्यावर हल्ला करणाऱ्या या गृहस्थाचे ते शब्द ऐकतांच मोरू एकदम पालटला ! मित्र त्याच्याकडे पाहूं लागले तेव्हां तो म्हणाला, " लेका ! तो मोठा चांगला माणूस आहे. त्याच्या मनांत कपट नाहीं. काकांना तो इतका बोलला ना, पण घरोबा विसरायचा नाहीं कधीं. " याप्रमाणें वक्ता खूष, मोरू खूष !

कांहीं वर्षांपूर्वी आम्ही येथें एक मोठी परिषद् भरविली होती. शेकडों निमंत्रणें पोहोंचवावयाचीं होतीं व स्वयंसेवकहि पुष्कळ होते. त्यात एक मोठा झक्कपक असे. चिटणिसांच्या ध्यानांत आलें होतें कीं, हा गृहस्थ स्वयंसेवक आहे खरा, पण आपण अमुक लोकांना निमंत्रणें पोहोंचवूं असें तो मुळींच म्हणत नाहीं. त्याच्या चर्येवरून व झाकीवरून चिटणिसांनीं अंदाज बांधला आणि स्त्रियांचीं निमंत्रणें तेवढीं त्यांनीं बाजूला ठेवून दिलीं ! इतर स्वयंसेवकांची निरवानिरव केल्याबरोबर त्यांनीं त्याला हातानें खुणावून जवळ बोलाविलें व स्त्रियांच्या निमं-त्रणाचा तो एवढा मोठा गठ्ठा त्याच्यापुढें ठेवून ते म्हणाले, " हं, हीं निमंत्रणं तुम्हीं पोहोंचवायचीं ! " पत्त्यावरचीं नांवें पाहत पाहत तो एकदम 'होय' म्हणाला; आणि चमत्कार असा

कीं, इतरांच्या मानानें तिप्पट असलेलें काम त्यानें मोठ्या खुशीनें पत्करिलें व करून टाकिलें. चिटणिससाहेबांनीं त्याचें मर्म बरोबर ओळखिलें होतें. हा धोरणाचा भाग आहे. कुणाची नस कोणती हें नेमकें हेरतां आलें पाहिजे.

दुकानावर कोणतीं माणसें नेमावीं हें गुजराथी, पारशी व साहेब ह्यांनीं फार चांगलें ओळखिलेलें असतें. होतां होईतों देखणीं माणसें नेमण्याची त्यांची वहिवाट आहे. त्यांनीं सर-सकट गिऱ्हाइकाचें रुचिमर्म ओळखिलेलें असतें. दुकानांवर एकादा घामट, कुरूप किंवा वेंधळा माणूस बसलेला असला तर त्याच्याकडे कोण जातो! अलीकडे युरोपियन लोक दुकानांवर मुलींना नेमतात यांतलें मर्म हेंच आहे. ' पुरुषां-बरोबरीचे हक्क ', ' समान संधि ' वगैरे शब्दसंहति सोयिस्कर असतात, इतकेंच काय तें. कांहीं कांहीं हजामतखान्यांत साहेब लोक स्त्रियांना नेमतात! माणसाच्या मनाची ही ओळख बरोबर असली तरी तिचा आविष्कार असा करावा हें विपरीत आहे. अलीकडे ' स्मार्ट ' शब्द पुष्कळच उपयोगांत येतो. पण त्याचा अगदीं प्राकृत अर्थ देखणा व चणचणीत असा आहे; दुसरा कोणताहि नाहीं. अशा प्रकारचा ' स्मार्ट ' माणूस हा चारचौघाशीं बोलाचालावयास व देवघेवीचें बोलणें करावयास फार उपयोगी पडतो. त्याचा तसा उपयोग करून घेण्यांत त्यांचा धनी मानवी मनाची ओळख दाखवितो असें म्हटलें पाहिजे.

कोणाचें मर्म कोणतें हें ओळखून आपलें काम कसें साधावें हें सामान्य लोकांच्याहि ध्यानांत येतें. ज्याच्याशीं आपण बोलत आहों त्याचें मन आपल्याला अनुकूल करून घेण्याचे

नानाप्रकारचे इलाज शहाणे लोक करितात. बोलतां बोलत मधेंच त्याच्या कोटावर एखादें फुलपांखरूं, नाहीं तर एकादा ढेकूण दिसला तर, किंवा निदान तो दिसल्याचा बहाणा करून, हे लोक तो झटकन् झाडून टाकितात; आणि जसें कांहीं आपण कांहींच केलें नाहीं अशा शिताफीनें चालूं बोलणें जलदीनें चालू ठेवितात. तो दुसरा माणूस एवढ्या बारक्या उपायानेंसुद्धां थोडा तरी आपलासा झाला आहे हें ते ओळखतात. मला आठवतें कीं, एकदां एका सामान्य ओळखीच्या माणसानें बोलण्याच्या सफाईत, माझ्या कोटाची गळपट्टी दुमडली होती ती सरळ केली ! तेवढ्यापुरतें का होईना, पण या लहान लहान चलनवलनांचा उपयोग होतो हें कांहीं खोटें नाहीं. एकदां जर्मनींतल्या एका मोठ्या युद्धानंतर मोठमोठे अमीरउमराव तहनाम्याचीं बोलणीं करावयास बसले होते. त्यांत एक मोठा आढ्यतेखोर सरदार होता. त्याचा इतमामहि भला मोठा होता. एवढे लोक जमले होते पण हा कोणाकडे पाहीना; आपल्याच गुर्मींत होता. इतक्यांत सहज असें झालें कीं, त्याचें लघुवस्त्र म्हणजे हातरुमाल खालीं पडला ड्यूक ऑफ मार्लबरोजवळ बसला होता. झट्दिशीं वांकून मार्लबरोनें तो रुमाल उचलला व त्या उमरावाच्या हवालीं केला. ताबडतोब हा कुढा व आढ्यतेखोर माणूस इतका निवळला कीं, मार्लबरोशीं अगदीं खेळीमेळीनें वागूं लागला !

आमच्या लहानपणीं शेजारीं एक पेन्शनर मामलेदार राहत असत. असामी चांगली गब्बर होती. जन्मभर अंमल चालविण्याची व ज्याच्या त्याच्याकडून आर्जवाचें व स्तुतीचें बोलणें ऐकावयाची संवय झालेली. पेन्शन घेतल्यावर हा रुबाब कसा

22223
9990

राहाणार! पण अंमल नसला तरी पैसा होता; व आतां शिपाई प्यादे आणि पाटील-कुलकर्णी नसले तरी भिक्षुक, उपाध्ये, आश्रित ही मंडळी होती. दुपारचीं जेवणें होऊन रावसाहेबांची वामकुक्षी झाली म्हणजे पत्त्यांचा डाव निघावयाचा. रावसाहेब श्रीमंत, थोर, आश्रयदाते! अर्थात् बरोबर खेळणारी मंडळी धोरणानेंच वागत. या आश्रित मंडळींत एक भिक्षुक मोठा मिस्किल होता. तो तुमच्याशीं खेळावयास बसला असता तर प्रत्येक डावांत त्याचा चाणाक्षपणा तुमच्या ध्यानांत आला असता. पण रावसाहेबांशीं खेळतांना अगदीं शेलक्या वेळीं त्याचें पान चुकीचें पडावयाचें! किंवा रावसाहेबांच्या पानावर हुकुम मारावयाचें राहून जावयाचें! डाव संपतांच तस्तांत थुंकतां थुंकतां रावसाहेब म्हणावयाचे, "शिदभट! तुम्ही अगदीं बावळ्यासारखं करतां; अहो, तुम्ही हुकूम मारला असता तर आमचा डाव उलटत होता!" शिदभट उत्तर करी, "खरंच रावसाहेब! पण आपली हिकमत माझ्या ध्यानांतच आली नाहीं!" रावसाहेब खूश होऊन जात. त्यांचीं कोणची नस दाबावयाची हें शिदभटाला एकदां कळून चुकलें होतें!

नट, गवई, शिक्षक, नकलाकार इत्यादि मंडळी तर अगदीं भोळी असतात. त्यांना खूश करावयास फारसें कांहीं लागत नाहीं. "मी तुम्हांला ओळखलं नाहीं! काम अगदीं बेमालूम झालं!" एवढें म्हटलें म्हणजे कोणताहि नट अगदीं खूश होतो. वास्तविक पाहातां 'मीं तुम्हांला ओळखलं नाहीं' हा कांहीं फार मोठा गौरव नाहीं; पण तेवढ्यानें मिथ्यास्तुतीचा दोष न लागतां बोलणाराचें वशीकरणाचें काम साधतें.

"काय बोवा! ही भैरवी कोणाकडून घेतली?" एवढ्या शब्दांनीं गवईबोवा संतुष्ट होतात. भैरवी वाईट झाली कीं चांगली झाली हें बोलावयाची जरूरी नाहीं. बोवांना वाटतें कीं, ही आपली स्तुतीच आहे व आपला तर अभिप्राय न दिल्याचा हातचा शिल्लकच राहतो. शिक्षकांचें तर विचारूंच नका. प्रत्येक शिक्षकाला अशी एक जाणीव असते कीं, आपण मोठे दर्दी शिकविणारे असून मुलांत आपली लोकप्रियता फार आहे. बापडा या जाणिवेवरच जगत असतो; 'सर! आमच्या वर्गावर तुम्ही कां येत नाहीं!' असल्या एकाद्या अर्ध-बावळ्या पोरानें विचारिलेल्या प्रश्नानेंहि मास्तरसाहेब खूश होतात. पोरांनाहि हें माहीत असतें. तास संपवून बाहेर पडल्यावर व्हरांड्यांत एकादा विद्यार्थी नुसता हंसला तरी ती आपल्या कामाची शिफारसच आहे असें मानण्याकडे शिक्षकाचा कल असतो. पोरें हें इंगित समजूनच चालतात.

पण सगळ्यांत धूर्त म्हणजे व्यापारी लोक समजावे. गिऱ्हाइकाच्या मनांत वस्तु घेण्याची बुद्धि कशी उत्पन्न करावी हें ते उत्तम ओळखतात. आमच्या आळीला एक बोरें विकणारा येत असतो. कांहीं झालें तरी बोरें आंबट असावयाचींच; व तीं खाल्लीं तर पडसें-खोकला येणार हें ठरलेलेंच असतें. लोकांच्या मनांत कायम झालेला हा ग्रह कसा घालवावयाचा? म्हणून तो बोरेंवाला ओरडतो, "बोरं घ्या बोरं! ग्वाड बोरं! पडसं-खोकला घालवायचीं बोरं!" यांतील विनोद लक्षांत येऊन एकादा माणूस तरी मनांत हंसतो आणि तीं घ्यावयास तयार होतो. विकणाऱ्यानें त्याच्या विनोदबुद्धीलाच आवाहन केलेलें असतें. मंडईत गेलों म्हणजे मागें मागें एक म्हातारी माळीण

कोपऱ्यावर बसलेली दिसावयाची. ती मोठी लाघवी असे. तिचा ठराविक प्रश्न असावयाचा : " हं ! आज काय देऊं काका ! " यांतील ' आज ' शब्दांतील लाघव व, नातें उत्पन्न झालें आहे असें दाखविण्याचें कसब गिऱ्हाइकाला प्रिय वाटे. तुम्ही नेहमीं माझ्याकडून भाजी घेणारे असें नातें जोडणारें हें कसब या माळिणीच्या फार उपयोगी पडे. पण तिच्या अंगांत आणखीहि एक हिकमत होती. आपली वाईट वस्तु अथवा महाग वस्तु चांगली करून दाखवावयाची; पण दाखवितांना गिऱ्हाईकहि भाळावें अशी तिची खुबी असे. मेथी, चाकवत नवें आलें म्हणजे फारच थोडें देतात—अगदीं चार काड्यांची पेंढी बांधलेली असते. दोन पैसे मागावयाचे व ही असली पेंढी पुढें करावयाची म्हणजे त्या माळिणीलासुद्धां कसेंसेंच वाटे; पण यांतील दोष घालवून ती गिऱ्हाइकास कसें वश करी पाहा ! ती म्हणे, " कवळी मेथी ! कवळी मेथी ! दोन पैशाला घ्यावी, **नवरा-बायकूनं** खावी ! दोन पैशाला घ्यावी, नवरा-बायकूनं खावी ! " गिऱ्हाइकाच्या प्रापंचिक सुखस्मृतीला जागृति कशी आणावी व आपल्याला प्रिय असलेल्या स्त्रीचें व आपलें नांव अशा रितीनें निबद्ध झाल्याचें सुख त्याला कसें उत्पन्न करावें हें या म्हातारीला फारच चांगलें समजत होतें ! एवढ्या वशीकरणावर ती आपली मेथी भराभर खपवून टाकी हें काय सांगावयास पाहिजे !

## ७. : शेक्स्पियरची कुचाळी

नाटक हा वाङ्मयप्रकार आज हजारों वर्षें माणसांचें मनोरंजन करीत आहे. नाटक हें दृश्यकाव्यच आहे, अशी साक्ति वाङ्मयांतून उत्पन्न झालेली असल्यामुळें त्याच्या विचारवैभवाकडे व वाङ्मयवैभवाकडे जितकें लक्ष लेखक देतो त्याच्यापेक्षां जास्त लक्ष तें रंगभूमीवर अधिक चांगलें कसें दिसेल याकडे तो देतो. नाटक हें दृश्यकाव्य आहे असें एकदां ठरल्यावर त्यानें याकडेच लक्ष द्यावें हें ओघास अनुसरूनच आहे; पण इतकें मात्र खरें कीं, नाटक हें रंगभूमीवर न येतां वाङ्मयाच्या कोशांतच जर संतुष्ट राहिलें असतें तर सध्यां आहे त्यापेक्षां त्याचें रूप जास्त सोज्ज्वल राहिलें असतें. ज्यांना एकादी वस्तु वाचावयास द्यावयाची असेल त्यांना ती आवडेल अशा थाटानें ती त्याजपुढें मांडिली पाहिजे आणि ज्यांना एकादी वस्तु पाहावयासाठीं द्यावयाची असेल त्यांना ती आवडेल अशा रूपानेंच ती त्याजपुढें मांडिली पाहिजे. आतां निदान

आजपर्यंत तरी पाहणाऱ्यांची संख्या वाचणाऱ्यांच्या संख्येपेक्षां हजारोंपटींनीं जास्त असत आली आहे. पाहणें सर्वांना सहज आहे, पण वाचणें हें आपण केलेलें कृत्रिम आहे. त्यामुळें पाहणाऱ्यांची संख्या फार मोठी. अर्थात् या पाहणाऱ्यांचें मनोधारण ज्या दृश्य वस्तूनें चांगलें होईल त्याच वस्तूला ते चांगलें म्हणणार हें उघड आहे व या पाहणाऱ्यांना काय पाहावेंसें वाटतें हें ओळखिण्याचें कसब लेखकांना अवगत असल्यामुळें त्यांना हव्या अशाच वस्तु ते त्या नाटकांत दाखवितात. हे जे पाहणारे ते संख्येनें फार मोठे असें आतांच म्हटलें. त्याचा अर्थ असा कीं, ते वाटेल त्या तऱ्हेचे, वाटेल त्या संस्कृतीचे व वाटेल त्या मनोभावनांचे असतात. अर्थात् त्यांना कशानें बरें वाटतें, त्यांचे रागलोभ सानुकूलपणेंच पण कसे खिजवितां येतील हेंच नाटककाराला पाहावेंसें वाटतें. म्हणून असें होतें कीं, असंस्कृत अभिरुचीला जो खुराक बरा वाटेल तोच आपल्या लिहिण्यांत आणून घालणें हें नाटककाराला जरूरच होऊन बसतें. नाटककाराची आणि नटाची ज्या दिवशीं गांठ पडली त्याच दिवशीं ही क्रांति घडून आली असली पाहिजे. तोंपर्यंत नाटक हें केवळ वाचणाऱ्याच्या हातीं राहिलें असेल. वाचणारे थोडे व वाचतात म्हणूनच कांहींशा संभावित संस्कृतीचें असें धरावयास हरकत नाहीं. म्हणून नाटकाच्या वाङ्मयरूपावर लेखक जास्त भर देत असले पाहिजेत. पण आतांच म्हटल्याप्रमाणें नाटक हा वाचावयापेक्षां बघावयाचा प्रकार आहे, हें ज्या दिवशीं हटकून ठरलें त्या दिवशींच नाटकाच्या विचारविषयक तोलदारींत फरक पडत चालला.

ऐतिहासिक दृष्ट्या नाटक ही आधीं दृश्य वस्तु असून मागाहून वाङ्मयरूपांत प्रविष्ट झाली असें दिसतें; पण ती वाङ्मय लिहिणाऱ्यांच्या हातीं गेल्याबरोबर तें वाङ्मय लिहिणारे लोक संभावित असल्यामुळें प्रेक्षकांना वाङ्मयवाल्यांच्या तावडींत जावें लागलें. नाटक लिहिणारा आपल्याला जें संमत किंवा संस्कृत लोकांना जें संमत तेंच लिहीत असेल; पण नाटक हें करमणुकीचें व धनोत्पादनाचें साधन ठरल्यानंतर ज्याच्या-कडून पैसे घ्यावयाचे त्याचा जीव सुखावेल, असें त्यांत कांहीं तरी लिहिणें हें नाटककारांना प्राप्त झालें व उत्तरोत्तर जास्त जास्त खालीं शिरल्यानें जास्त जास्त माणसें पाहावयास येतात, हें दिसून आल्यावर नाटककारांचा अभिजातपणा कमी कमी होत जाऊन ते हळूहळू जनसंमर्दाच्या रुचिचक्रांत भोवंडत राहिले. नाटकांतील मूळ वस्तूच्या जोडीला कांहीं मालमसाला लेखक लोकांना घालावा लागतो. प्रथम प्रथम लोकरंजनासाठीं हा मालमसाला त्यांनीं लोकांच्या रुचीचा असा बनवीत नेला, पण आपलें प्रतिपाद्य मात्र कायम ठेविलें. पण यापुढें नट लोकांना पैसे मिळवून देण्याच्या व स्वतः मिळविण्याच्या ईर्ष्येनें असे लेखक पुढें आले कीं, नुसता मालमसालाच नव्हे तर मूळचीं नाट्यवस्तूसुद्धां सामान्य लोकांच्या रुचीला जशी भावेल तशी ते लिहून देऊं लागले. येथें नाटककार अस्तास गेला व सामान्य लोकांची रुचि प्रभावी ठरली. त्यांना हवा तो माल पकवून वाढणारी असामी म्हणजे नाटककार असें ठरून गेलें. पण या हीन पदवीपर्यंत पोहोंचावयाच्या आधीं लोकांस शिकविणारा, कांहीं नवें सांगणारा, निरनिराळीं सौंदर्यें त्यांज-पुढें उभीं करणारा, जे सुखदुःखाचे प्रसंग आले, पण स्मृतींतून

नष्ट झाले ते परतवून आणून त्याच्या आभासानेंच लोकांस संसाराच्या गोडींतील अवीटपणा दाखविणारा असा कोणी अधिकारी माणूस म्हणजे नाटककार होता. हें त्याचें फार उदात्त असें स्वरूप सांगितलें; पण या पदवीवर तो फार दिवस टिकला असें वाटत नाहीं. त्याची आणि नटाची ज्या दिवशीं गांठ पडली आणि नाटक करून पोट भरणें आम्हांला जरूर आहे हें ज्या दिवशीं नटानें त्याला सांगितलें त्या दिवशींच या त्याच्या अधिकाराला उतरती कळा लागली.

जसें इतर अनेक बाबतींत तसें या वाङ्मयाच्या बाबतींतहि रुचीचें संक्रमण इंग्लंड देशामध्यें आपल्या आधीं होत आलें आहे. मराठींत नाटकबिटक हें सगळें नवीनच आहे; आणि संस्कृत हें आपलेंच असें मानून चालावयाची जी आपली वहिवाट आहे तीप्रमाणें पाहतांसुद्धां वर उल्लेखिलेलें रुचिसंक्रमण या देशांत झालें होतें, असें वाटत नाहीं. संस्कृत नाटककारांच्या लिहिण्यांत सदभिरुचीला दंश करील, असें कांहीं फारसें नसे व जर कांहीं असलें तर नाट्यवस्तु ही पुराणांतील कथांतून उचलिली असल्यामुळें रामलक्ष्मण, कौरवपाण्डव इत्यादि नांवांशीं संलग्न असलेला जो आपला आदरभाव त्यांत तें सगळें पचून जाई. असें वाटतें कीं, हे संस्कृत नाटककार नटाच्या ताब्यांत अजून सांपडले नव्हते. उलट त्यांनीं सांगावें त्याप्रमाणें नटच वागत असावे. सामान्य जनसमूहाच्या रुचीचा अंमल रंगभूमिवर पडूं लागण्याच्या आधींच संस्कृत नाटककारांचें युगमान संपून गेलें; पण ज्या गोष्टीची झळ त्यांना लागली नाहीं तिची झळ मराठी नाटककारांना मात्र झपाट्यानें लागत चालली आहे असें दिसतें.

खुद शेक्सपियर यालाहि लोकाभिरुचीकडे लक्ष द्यावें लागत होतें, असें दिसतें. नाटकें लिहून त्यांतील वाङ्मयाचा आनंद आपण अनुभवावा व वाचकांनीं वाचून जी पसंती दर्शविली तींत सुख मानावें एवढ्यांतच त्याची आकांक्षा खलास झाली नाहीं; आणि हेंसुद्धां करमणुकीच्या साधनांचा इंग्लंड देशांत त्याच्या वेळेपर्यंत जो प्रसार झाला होता तो लक्षांत घेतां योग्यच होतें. ह्या वेळपर्यंत तेथें नाटकगृहें सुरू झालीं होतीं. त्याचा थाटमाट आणि रंगभूमीवर निरनिराळे प्रसंग वठविण्यास लागणाऱ्या सर्व सोयी हीं जरी आतांच्या मानानें फारच अल्प असलीं तरी नाटक हें ‘ भिन्नरुचि जनांचें ’ सर्वसंमत असें ‘ एक समाराधन ’ म्हणजे करमणुकीचें साधन म्हणून गणिलें गेलें होतें. तसेंच सर्व समाजांत एका तऱ्हेची सजातीयता असल्यामुळें सामान्य लोक व संस्कृत लोक यांच्यांत आपल्याइतकी तफावत नसे. गरिबी—श्रीमंतीमुळें एकमेकांत काय अंतर राहत असेल तेवढेंच. पण आचार-विचार, धर्मकल्पना, सामाजिक कर्तव्यें, ध्येयें, इतिहास व इतर सांस्कृतिक कल्पना याच्या बाबतींत दोनहि वर्ग जवळ जवळच होते. अर्थात् नाट्यवस्तु व इतर मालमसाला हीं कशीं निवडावीं, हें ठरवितांना लोकाभिरुचीला किती महत्त्व द्यावयाचें हें ठरविणें नाटककाराच्या स्वतःच्या अधिकारावर फार अवलंबून असतें. आपला दर्जा संभाळणें व लोकरंजनार्थ त्यांच्या रुचीस मानवेल असें लिहिणें या गोष्टींचा जितका चांगला मेळ घालतां येईल तितका घालण्याची कोणीहि नाटककार खटपट करीलच. श्रोत्याला जर खूश करावयाचें असेल, चमत्कृति वाटवावयाची असेल, त्याचे हर्षविषाद जर खवळवावयाचे असतील तर

तसतशी वस्तुयोजना करणें हें नाटककारास अवश्यच बनतें. नुसता मालमसालाच नव्हे, तर मुख्य वस्तूसुद्धां याच रूपाची ठेवावयास हवी हें नट श्रोत्यांच्या हवालीं झाल्यावर व नाटककार नटांच्या हवालीं झाल्यावर शेक्स्पियरच्या बाबतींतहि ओघानेंच आलें असावें आणि म्हणून एका हुशार, कष्टाळू, बुद्धिमान् आणि साहसी समाजाची शेक्स्पियरच्या हातून टवाळी झालेली आहे.

'मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकांत शायलॉक नांवाच्या ज्यूची व त्याच्या द्वारा एकंदर ज्यू लोकांची शेक्स्पियरनें केलेली टवाळी सर्वांनीं वाचिली आहे. शेक्स्पियरला अखिल मनुष्यजातीविषयीं सहानुभूति होती, असें म्हणण्याची वहिवाट आहे. सहानुभूति होती म्हणजे त्या शब्दाचा जो सर्वसामान्य अर्थ त्या अर्थानें होतीच; पण मनुष्यमात्राच्या भावना काय काय आहेत हें ओळखण्याची व त्या आपणांस वाटवून घेण्याची शक्ति म्हणजे समभावनाशक्ति ही त्याच्या अंगीं होती, हें जास्त खरें आहे. पण त्याच्याशीं येथें कांहीं कर्तव्य नाहीं. सर्वांच्या तिरस्कारास पात्र झालेल्या ज्यू लोकांविषयीं त्याला नेहमींच्या अर्थाची सहानुभूति नव्हती काय, असें कोणीं म्हटलें तर ती खास होती असें उत्तर देतां येईल; व त्याला खुद्द नाटकांत भक्कम आधार आहे. तथापि असें असूनसुद्धां या तिरस्कृतांना रंगभूमीवर आणून भिकारटकार लोकांकडून त्यांचा उपमर्द आणि त्यांची टवाळी करून शेक्स्पियर यानें श्रोतृवर्गांत हास्य उत्पन्न करण्याचा यत्न केला आहे, हें नाकबूल करण्यांत अर्थ नाहीं.

ज्यू लोक हे स्वतःस परमेश्वराचे मोठे लाडके समजतात; पण

त्यांचीं ऐतिहासिक दुःखें पाहतां परमेश्वरानें त्यांना दाखविलेला लडिवाळपणा इतर कोणाच्या वांट्यास येऊं नये अशीच इच्छा कोणी झालें तरी करील. या परमेश्वरी पसंतीच्या माणसांची त्यांच्या जन्मभूमींतून जी हकालपट्टी झाली व जी त्यांची पांगापांग झाली तिचा जोर केव्हां संपेल तें ध्यानांत येत नाहीं. ज्यू लोकांची पृथ्वीवरील एकंदर लोकसंख्या कांहीं वर्षांपूर्वींच एक कोटी तीन लक्ष होती. हे सर्व लोक एकाच देशांत असते, तर यांच्या गुणामुळें त्या देशाचा उत्कर्ष झाला असता व हे लोक स्वतःहि सुखी राहिले असते. परंतु एकदां वाताहत झाल्यानंतर त्यांच्या वस्तीला जो फुटकळपणा आला आहे तो अजून तसाच राहिला आहे. या फुटकळपणामुळेंच त्या त्या देशांतील सार्वजनिक जबाबदाऱ्यांतून ते मोकळे राहतात व एकादें चांगलें कोष्टक पाहून त्यांत नेमके जाऊन बसतात. त्याबरोबरच हेंहि खरेंच आहे कीं, ते कोणाचेच सखे नसल्यामुळें व कोणी त्यांचा सखा नसल्यामुळें सामाजिक भावनांच्या उद्रेकांचा प्रसंग आला कीं, समाजांतल्या उच्छृंखल व टारग्या लोकांचें शस्त्र पहिल्यानें त्यांच्यावर जाऊन पडतें. त्यांचा पैसा ओरबाडावा, त्यांच्या स्त्रिया भोंदाव्या, त्यांच्या धर्मावर थुंकावें असे प्रकार चालू होतात. यूरोपच्या इतिहासांत अगदीं कालपर्यंत असे शेंकडों प्रसंग घडून आले आहेत कीं, ज्यांत या कष्टाळू व बुद्धिमान् लोकांचा अनन्वित छळ झाला आहे. येशू ख्रिस्त स्वतः ज्यूच होता व त्याच्या भक्तगणांनीं त्याच्या तत्त्वज्ञानाचा नवीनच धर्म बनविल्यामुळें हातीं सामर्थ्य येतांच या उंडारलेल्या नवमत-वादी लोकांनीं जुन्या धर्मास चिकटून राहिलेल्या या ज्यू

लोकांचा मनस्वी छळ आरंभिला. ही परंपरा आज दोन हजार वर्षें अव्याहत चालू आहे. गेल्या थोड्याशा वर्षदशकांत ज्यू लोकांचें बुद्धिवैभव, त्यांची सहनशीलता, त्यांचा कष्टाळूपणा, जुनीं धर्ममतें सोडीत चाललेल्या खिस्ती लोकांना हळूहळू पटूं लागला आहे. पण शेक्सपियरच्या काळीं त्यांच्यासंबंधींची तिरस्कारबुद्धि सर्वांच्या मनांत सारखीच वागत असे. मॅग्ना चार्टा लिहून देणारा जॉन राजा यानें तर या ज्यू लोकांना नकोनकोसें केलें होतें. पैसा लागला कीं खजिन्यांतून उपसावा. पण खजिनाच रिता असला तर मग सावकारांवर धाड घालावी, हें राजे लोकांचें संभावित धोरण त्या वेळेस इंग्लंडांतहि जारी होतें. आतां सावकारावरच धाड घालावयाची तर जो चांगला गब्बर असेल आणि आपल्या धर्माचा नसेल अशा सावकारावर घालावी हेंहि ओघानेंच येई. जॉननें कित्येक वेळां या ज्यू सावकारांकडे पैशाचा तगादा लाविला व थोडें कांहीं ‘ हो ’- ‘ ना ’ होत आहे असें पाहतांच त्यानें प्रत्येक नकाराबरोबर ज्यू सावकाराचा एकेक दांत उपटण्याची शिक्षा फर्माविली. तसेंच दुसऱ्या एका राजाच्या कारकीर्दींत ज्यू लोकांच्या वसाहतीवर भोंवतालच्या आळशी व म्हणून अन्नास मोताद झालेल्या इंग्रज लोकांनीं एवढा हल्ला केला कीं, हजार दीड हजार ज्यू लोकांना किल्ल्याच्या आश्रयास जावें लागलें. हे पिसाट लोक तेथेंहि त्यांच्यावर चालून गेले. शेवटीं आतां कांहीं तरणोपाय नाहीं व आपण या दुष्ट लोकांच्या हातीं पडलों तर आपली सरसहा कत्तल होईल, स्त्रियांची अब्रू जाईल हें पाहून या अभिमानी ज्यू लोकांनीं तटाच्या आंत प्रचंड चिता पेटविली व रजपूत स्त्रियांनीं जसा जोहार केला तसा गृहस्थ,

उपाध्याय, बायकापोरें या सर्वांनीं किल्ल्यांत जोहार करून टाकिला! आपल्या शाळांत शिकविण्यांत येणारे इतिहास इंग्रजांनींच लिहिलेले असल्यामुळें त्यांत या हकीगती आपल्याला भेटत नाहींत हें बरोबरच आहे; पण वर दिलेल्या माहितीवरून ज्यू लोकांची रया इंग्लंडांत काय होती आणि सामान्य इंग्रज लोक त्यांना कसे पायपोस समजत होते याची कल्पना वाचकांस येईल. या असल्या लोकांच्या करमणुकीसाठीं नाटकें लिहिणाऱ्या शेक्सपियरला भावनागर्तेतून बाहेर पडतां आलें नाहीं.

इंग्रज श्रोत्यांना नुसतें हंसावयास लावणें एवढाच कांहीं शेक्सपियरचा हेतु प्रस्तुत नाटकांत दिसत नाहीं. ज्यू लोकांच्या विरुद्ध त्यांचे रागद्वेष भडकविण्याचीहि योजना त्यानें बुद्धिपुरस्सर केली आहे; आणि हे एकदां भडकावून झाले म्हणजे मग शायलॉकचें बोलणें शायलॉकच्या गळ्यांत घालून प्रेक्षकांकडून त्याची हुर्यो होईल असें केलें आहे. बॅसॅनिओ यास प्रियेचा मनोनुनय करावयास जावयाचें होतें. त्याजपाशीं पैसा नव्हता. मित्र ॲन्टोनियो सावकार खरा, पण त्याजपाशींहि त्या वेळीं कांहीं नव्हतें. मित्राखातर तो शायलॉक या ज्यू सावकाराकडे गेला. शायलॉकनें अट घातली कीं, अमुक वेळेला जर पैसे परत दिले नाहींस तर काळजाचें मांस कापून दिलें पाहिजे. ॲन्टोनिओनें ही अट पत्करिली आणि बॅसॅनिओनेंहि तोंड थोडें वेडेंवाकडें करून पैसे पत्करिले! पुढें दैवगति फिरली. पैसे देण्याची वेळ आली. शायलॉकनें अट पुढें टाकिली. ती पाहतांच मात्र सगळ्यांच्या अंगांचा भडका उडाला. ' In merry sport ' ही अट आपण घालीत आहों, असें जरी शायलॉक

म्हणत होता तरी या ख्रिस्त्यावर सूड उगवावयास सांपडावा म्हणूनच त्यानें हें कसब केलें होतें. बरें, हा त्याचा कसबी स्वभाव या ख्रिस्त्यांना माहीत नव्हता असें म्हणावें तर तसें मुळींच नाहीं. त्यांनीं त्याच्या तोंडावर त्याच्या बदमाशगिरी-बद्दल त्याला हजारों शिव्या मोजिल्या होत्या. असें जर होतें तर या अटीवर त्याजकडून पैसे घेणारे हे ख्रिस्ती लोक महा-मूर्खच असले पाहिजेत; आणि आपण मूर्खपणा करून त्याचीं फळें भोगण्याचा प्रसंग येतांच शायलॉकलाच पुन्हां शिव्या मोजावयास तयार ! पण असल्या या मूर्खपणावर रचिलेलें कथानकसुद्धां ज्यू लोकांचा कुटिलपणा हळूहळू दाखवीत व शायलॉकच्या फाजितीची तयारी करीत शेक्स्पियर यानें मोठेंच रसभरित केलें आहे. मधूनमधून ' ज्यू ' व ' ख्रिस्ती ' ' ज्यू ' व ' ख्रिस्ती ' असे शब्द पेरून आणि यहुदी धर्मा-विषयीं व लोकांविषयीं ख्रिस्ती पात्रांच्या तोंडांत ओंगळ भाषा घालून शायलॉक याला व त्याच्या द्वारा सर्व ज्यू लोकांना तिर-स्कारास्पद बनविण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. पण सूडासाठीं म्हणून त्याची जी फजीती घडवून आणिली आहे तीवरून तर तत्कालीन श्रोतृवर्गाच्या तावडींत कवि सांपडला आहे हें स्पष्ट दिसतें. शब्द प्रमाण कीं त्या शब्दांचा अर्थ प्रमाण हीच काय ती या प्रसंगांतील खरी गोम आहे. शायलॉकनें केवळ शब्द प्रमाण मानून फारच ओढून धरिलें. अर्थात् पोर्शिया हिनें करारनाम्यांतील त्याचे शब्दच प्रमाण मानून त्याचाच डाव त्याच्यावर उलटविला. येथें बौद्धिक झुंज झालें व त्यांत पोर्शियानें यश मिळविलेलें पाहून आपल्याला आनंद वाटतो. पण श्रोत्यांना डाव उलटविल्यामुळें जरी आनंद झाला तरी

ज्यू लोकांबद्दलच्या त्यांच्या कुत्सित वासना तेवढ्यानें खुलणें शक्य नव्हतें. त्यांना आनंदाची उकळी येण्याचें ठिकाण निराळेंच होतें. म्हणून शेक्स्पियरनें एका ढामरट खिस्त्या-बरोबर वृद्ध शायलॉकची मुलगी पळून गेल्याचें दाखविलें आहे. हें दृश्य रंगभूमीवर पाहतांच रसिक खिस्त्यांनीं टाळ्यांचा मोठाच गजर केला असेल. पण त्यांना खूश करण्यासाठीं शेक्स्पियरनें आणखी एक करामत केली आहे. प्रतिपक्षाच्या जीव घेण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप शायलॉकवर ठेवण्यांत आला व तो शाबीत धरून त्याला शिक्षा फर्माविण्यांत आल्या. त्यावरून ही करामत चांगली दिसून येते. न्यायाधीशांनीं त्याची सर्व संपत्ति तर लुबाडलीच; पण आपला धर्महि त्यानें टाकून द्यावा असें बजाविलें व शिवाय त्याच्या दौलतीपैकीं निम्मी दौलत त्यानें स्वखुशीनें वरील उनाड जोडप्याला बहाल करावी असेंहि फर्माविलें. शिक्षेंतील या शेवटच्या दोन कलमां-वरून ज्यू धर्म व ज्यू स्त्रिया यांबद्दल तेव्हांच्या खिस्त्यांच्या काय वासना होत्या हेंहि चांगलें ध्यानांत येईल. या वासना थिएटरांत खुलल्याशिवाय नाटकाला रंग येणें अशक्य होतें. म्हणून नटांच्या तावडींत सांपडलेल्या या नाटककारानें आपली महानुभावता थोडीशी दूर सारिली आहे. खुद्द नाटककाराला ज्यू लोकांसंबंधीं सहानुभूति होती याची साक्ष मात्र त्यानें अप्रत्यक्ष रीतीनेंच पण निःसंदिग्धपणें दिली आहे. " Hath not a Jew eyes ? " इत्यादि वाक्यांतून ही सहानुभूति चांगली दृग्गोचर होते; पण नट श्रोत्यांच्या तावडींत व नाटककार नटांच्या तावडींत सांपडला म्हणजे नाटकाला जो हीनपणा यावयाचा तो येऊं देणें शेक्स्पियरला चुकवितां आलें नाहीं.

ही जनांची रीतच दिसते. माणसांना हंसावयास हवें हें खरेंच आहे. नाहीं तर श्रोत्यांचें मनोरंजन कसें व्हावयाचें? पण या मनोरंजनासाठीं आपण कोणास खर्चीं घालतों हें पाहावयास हवें इतकेंच. बहुधा असें होतें कीं, ज्यांचा कुणी वाली नाहीं, जे केवळ अश्राप आहेत, ज्यांना दुखविल्याबद्दल किंवा ओशाळविल्याबद्दल कोणी जाब विचारणारा नाहीं, त्यांनाच खर्चीं घालावयाची चाल आहे किंवा निदान तो इतका दूरचा असावा कीं, हा जबानीचा प्रसंगच येणार नाहीं, अशी पोटांतून खातरी असावी. आपल्याकडेहि हेंच आहे. चांगल्या चांगल्या नाटककारांनीं भटजींचीं पात्रें आपल्या नाटकांत आणिलीं आहेत व हरतऱ्हेचीं कारस्थानें, हास्यास्पद भाषणें आणि मूर्खपणा त्यांच्याकडून करवून नाटकांत हास्य आणि उपहास वाढविला आहे. गोंधळयाच्या विनोदाखालीं जसा दिवट्या मरतो तसे या सुशिक्षित नाटककारांच्या विनोदाखालीं गरीब बिचारे भटजी मेले आहेत. एकादा गांवढा पुढें आणून त्याजकडून कांहीं विचित्र हावभाव करवावे व श्रोत्यांस हंसवावें असें प्रतिष्ठित नाटककारसुद्धां करितात. त्याच सदोबी वृत्तीचीं माणसें एका स्वकीय सरदाराच्या कुळांतसुद्धां त्यांना सांपडलीं असतीं; पण त्यांनीं हा 'सदोबा' अन्य जातींतून निवडिला आहे. दुसऱ्या एका नाटककारानें आपल्या एका नाटकांत मारवाडिणीचें पात्र आणून म्हाताऱ्या नवऱ्याचें नशीब कसें असतें याचें चित्र दाखविलें आहे; पण हें गमतीचें चित्र पाहत असतांनासुद्धां आपल्या मनांत, वर दिलेल्या सामाजिक विचारांस अनुसरून, कालवाकालव होते. मारवाडी समाजाला हें चित्र पाहत असतांना खरोखरच दुःख होत असेल. इतरांची

टवाळी करावयास आपणांस बरें वाटतें; पण तेंच अंगाशीं येऊन भिडूं लागलें तर जीव घाबराघुबरा होतो.

'नाटकांत शिक्षण असतें; करमणूक करतां करतां शिक्षण देतां येतें.' वगैरे शब्दप्रयोग सोयीसाठीं बनविलेले आहेत. बोध आणि उपदेश या गोष्टी बोलावयासाठीं केल्या आहेत. खरें म्हटलें म्हणजे दुसऱ्याची फजीती करून फिदीफिदी हंसावयाची त्यांत सोय केलेली असते, इतकेंच काय तें. जें सोंग पुढें उभें करून आपण हंसतों तें जर का अगदीं नजीक आलें तर तोच हंसणारा प्रेक्षक कावराबावरा होतो. आपलें सामाजिक व्यंग आपणसुद्धां रंगभूमीवर दाखवितों हें खरें आहे; पण तेथें गूढस्थ अपेक्षा अशी असते कीं, प्रेक्षक आपल्यापैकींच असतील. उद्यां आपल्या समाजांतील किंवा ऐतिहासिक वाडांतील एकादें बिंग चघळावयास घेऊन एकाद्या तिऱ्हाईत नाटककारानें रंगभूमीवर त्या पात्राची व तद्द्वारा आपल्या समाजाची फटफजीती उडवूं द्या कीं, लागलीच लोक एवढाले डोळे करतील. हॅम्लेट नाटकांत एक पोटनाटक आहे. आपल्या छिनाल आईच्या मनाला जाऊन भिडेल असा मजकूर हॅम्लेटनें त्यांत मुद्दामच घातला आहे. 'नाटक हें करमणुकीचें साधन' म्हणून तिनें तो देखावा वास्तविक पाहण्यास हरकत नव्हती; पण कथानकाचा विकास होतां होतां तें आपल्याला येऊन चिकटत आहे असें पाहतांच ती फणकाऱ्यानें उठून गेली. ही बारीक बाब मोठीच बोधप्रद आहे. राणीच्या वर्मी गोष्ट जाऊन लागली आणि ती दुःसह होऊन जर ती ओशाळली किंवा उठून गेली तर तिचें मन केलेल्या पापाबद्दल तिला खात असलें पाहिजे

हें उघड होईल, हें हॅम्लेटनें ओळखिलें होतें व तेवढया-साठींच त्यानें ही योजना केली होती. हॅम्लेटच्या द्वारा ही जी योजना शेक्स्पियरनें आपल्या नाटकांत करून पाहिली तीवरून इतकें सिद्ध होतें ना कीं, नाटकांतल्या योजनांनीं प्रेक्षकांपैकीं कोणाकोणाचीं हृदयें विद्ध होतात हें शेक्स्पियरला माहीत होतें व तीं तशीं करावयाचीं असलीं तर नाटकांत तशा हिकमती योजाव्या लागतात. जें, राजपुत्र हॅम्लेटनें पोटनाटकांत केलें आहे, तेंच शेक्स्पियरनें 'मर्चंट ऑफ व्हेनिस' नाटकांत केलें आहे. करमणुकीसाठींच कां होईना, ज्यू लोकांचीं पात्रें आणिलीं आणि मग त्यांचें विडंबन करून श्रोत्यांत हास्याचा खोकाळा पिकाविला. राणी जशी तटकन् उठून गेली तसे तेव्हांचे ज्यू प्रेक्षक उठून जात असले पाहिजेत. त्यांतहि एक गोम आहे. शायलॉकचा बौद्धिक पराभव करणें यांत कांहीं गैर नाहीं. सामान्य ज्यू माणूसहि या प्रकाराला इतकासा आड येणार नाहीं. कारण कीं, परस्परांविषयीं असें थोडेंसें व्हावयाचें हें त्यालाहि कळतें; पण न्यायाधीशमहाशयांनीं शिक्षा फर्मावितांना धर्मांतर करण्या-बद्दल जें पांडित्य केलें आहे त्याची मात्र त्यास चीड येत असली पाहिजे. पण याहिपेक्षां वृद्ध ज्यूची मुलगी पळवून नेण्याचा व वरती या उनाड दांपत्याला त्याची निम्मी दौलत मिळवून देण्याचा प्रकार वर्णिला आहे तो पाहून ज्यू प्रेक्षकांना संतापच येत असेल; पण शेक्स्पियरला हें करणें जरूरच झालें असावें. कारण नाटकगृहें भरावयास हवीं. त्याशिवाय पैसा उभा कसा राहातो व भरावयास हवींत तर कांहीं कुचाळी करावयास हवीच हवी. आतां तीहि कुणाची कराव-

याची ?—तर ज्यांना कोणी आपंगिता नाहीं किंवा सामाजिक दृष्ट्या किंवा स्थूलदृष्ट्या जो इतका दूर आहे कीं, जाब विचारावयास येणार नाहीं त्याची करावयाची. पैकीं शेक्स्पियरनें ज्यांस कोणी आपंगिता नाहीं त्यांचीच कुचाळी करण्याचें पत्करिलें, याचें फार वाईट वाटतें! नाटक हें समाजाचें चित्र असतें, हें सूत्र पत्करणाऱ्यांना तर वरील विवेचन पत्करिलेंच पाहिजे. तेव्हांचा इंग्रज समाज असाच होता कीं, ज्याला ज्यू लोकांची हिडीस टवाळी मोठी गमतीची वाटे. सामाजिक व्यंगांची नोंद करणें हें ज्ञानशीलत्वाचें लक्षण आहे. गांभीर्यानें त्याचें रूप त्या त्या लोकांपुढें पसरून मांडणें हें सुधारणाप्रियत्वाचें लक्षण आहे. पण तें घेऊन लोकांना हंसावयास लावून त्यांची खुशमस्करी करणें हें करमणूक करणाऱ्याच्या व ती करवून घेणाऱ्याच्या नादान भावनेचें लक्षण आहे.

शेक्स्पियर मोठा कसबी होता हें खरेंच; व त्याच्या कसबाचा रस चाखण्यासारखी मनःस्थिति तुमची आमची राहील. कसबप्रदर्शनाखालीं खर्ची कोण पडतो इकडे आपलें लक्ष जाणें शक्य नाहीं. कारण ज्यू आपला कोणीच नव्हे. पण खुद्द ज्यू प्रेक्षकाला मात्र तेव्हां पराकाष्टेची मानहानि वाटली असेल. कुळकर्णी-लीलामृतांतसुद्धां लेखकानें बहुत कसब दाखविलें आहे; पण श्री. केळकर यांची सौंदर्यशोधनांत गुंतलेली दृष्टीसुद्धां त्या कसबावर फार वेळ ठरेचना. कारण कुळकर्णीवर्गाची त्यांत नालस्ती होती व तो तर आपला. अर्थात् त्यांनीं पाटीलबोवांच्या वाङ्मयाचा खरपूस समाचार घेतला आहे. हें नाटक झालें तेव्हां एकादा ज्यू संपादक असता तर

त्याची दृष्टि शेक्स्पियरच्या या कसबावर अशीच गेली असती आणि लगोलग चिडून जाऊन त्यानें या नाटककाराच्या कुचाळखोरीचा खरपूस समाचार घेतला असता. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, एवढा नाटककारांचा मुकुटमणि पण त्याला आपलें कौशल्य प्रकट करितांना तें लोकांच्या पुढें यावें म्हणून व त्यांनीं सुखेनैव पाहावें म्हणून, त्या लोकांना कसला लांच द्यावा लागला हें या नाटकावरून दिसतें व नाटकाच्या धंद्यांतील व्यवहार लक्षांत घेतां खऱ्या महानुभाव माणसालासुद्धां आपली सदभिरुचि बाजूस सारून ग्राम्य आणि चावट रुचीच्या माणसांना खूश करण्यासाठीं काय करावें लागतें हें नीट ध्यानांत येतें. यावर कोणी असें म्हणण्याचा संभव आहे कीं, आपण जर असलें सोवळेंपण सुरू केलें व कोणाला कांहीं बोचलें कीं काय हेंच पाहत बसलों तर विनोदाला अवसरच राहणार नाहीं. यावर उत्तर इतकेंच कीं, हीं गोष्ट इतकी बिनतोड नाहीं. हें शुद्धपण पत्करूनसुद्धां विनोद उत्पन्न करितां येईल; पण त्याचा विचार हा प्रस्तुत लेखाचा विषय नाहीं.

---

## ८. : माझी विद्वत्ता

मी अनेक सभांतून भाषणें करितों हें मींच सांगावयास हवें असें नाहीं. माझ्या व्याख्यानांच्या घोषणा जितक्या वेळां येतात तितक्या वेळां जर माझीं भाषणें प्रसिद्ध करावयाचीं म्हटलीं, तर वर्तमानपत्रांना पुष्कळदां इतर मजकुराला जागा राहील कीं नाहीं याविषयीं शंका आहे. या आपत्तीकडे लक्ष देऊन वर्तमानपत्रकर्ते काटकसरीनें वागतात हें स्तुत्यच आहे. कांहीं कांहीं तर इतक्या तरतुदीनें वागतात कीं, भाषण होणार आहे व भाषण झालें याच्यापलीकडे ते कधींहि फिरकत नाहींत; पण असें होत असल्यामुळेंच माझ्या लेखांतील वस्तूला अजूनहि नवीनपणा शिल्लक राहिला आहे. ती वस्तु म्हणजे माझी विद्वत्ता होय! वक्त्याविषयीं गौरवानें बोलणें हें शिष्टाचाराला धरून असल्यामुळें व सूचक व अनुमोदक यांनीं मुद्दाम बोलावून आणिलेल्या वक्त्याची बोळवण समंजसपणें करावयास हवी या संभावित धोरणामुळें अध्यक्षांनीं माझ्या विद्वत्तेची आजवर जे

तारीफ केली असेल ती सोडून दिली तरी कांहीं कांहीं प्रसंगीं खरोखरीच्या गंभीर बुद्धीनेंच ही तारीफ होते आणि तेव्हां मात्र मला अगदीं चोरट्यासारखें होतें. त्याचा अर्थ मला इतकाच दिसतो कीं, ते माझ्यापेक्षांहि अडाणी आहेत ! तो विद्वान्पणाचा बोजा मला डोईजड झाल्यासारखा वाटतो व गंभीरपणाच्या आवरणाखालीं हे उपरोधानें तर बोलत नाहींत ना अशीहि पुसट शंका माझ्या मनाला चाटून जाते. पण हा शुद्ध शंकेखोरपणा होय. ते मनापासून बोललेले असतात. हे स्तुतीचे शब्द ऐकिले व ज्ञानाचा पल्ला किती विस्तार्ण आहे हें मनांत आलें म्हणजे लोक किती अल्पसंतुष्ट असतात आणि दुसऱ्याला बरें म्हणावयास लागणारीं मनाची ऋजुता त्यांच्या अंगीं केवढी मोठी असते हें मात्र कळून चुकतें; व आत्मपरीक्षणाची बुद्धीहि आपल्या मनांत उद्भवते.

आपली विद्वत्ता कितपत आहे याची चांचणी स्वतःची स्वतःस करितां येण्यासारखी असते. सकाळपासून झोंपीं जाईपर्यंतच्या आपल्या एका दिवसाच्या चर्येची तपासणी जरी आपण केली तरी या विद्वत्तेचें मान सहज ठरवितां येतें. आपलें ज्ञान म्हणजे एकाद्या विषयासंबंधीं थोडीबहुत माहिती; इतकाच त्याचा अर्थ असतो. सामान्य लोकांना आपापलीं कामें असतात त्यामुळें कांहीं कांहीं गोष्टींची माहिती करून घेण्याला त्यांना उसंतच मिळालेली नसते; किंवा ते वयानें लहान असतात; अथवा त्यांना त्याची आवश्यकताहि वाटलेली नसते. आपण मात्र उघडे डोळे ठेवून केवळ जगत राहिलों व सवड सांपडल्यामुळें आवश्यक गोष्टींची माहिती करून घेतली; यासाठींच इतरांपेक्षां शहाणे असण्याचा गौरव

आपणांला प्राप्त होतो. पण तेवढी एकादी लहानशी गोष्ट सोडली तर विद्वान् लोकांची विद्या खरोखर उपेक्षणीय असते; इतकेंच नव्हे तर, कित्येकदां त्यांची केवळ दया वाटण्यासारखी स्थिति असते. ज्यांना आपण अज्ञान समजतों त्यांच्यापुढें एकादुसरा टप्पा आपल्याला जातां येतें; पण तेंहि माहितीच्या रूपानें. खरी विद्या म्हणजे ज्ञान या दृष्टीनें विचार केला म्हणजे आपणहि हजार ठिकाणीं गांगरतो.

एकदां आगगाडीच्या डब्यांत माझ्याशेजारीं एक पोक्तसा कुणबी गृहस्थ दोन बाकांच्या मधल्या जागेंत बसला होता आणि त्याच्या पोटाशीं त्याचा सहा सात वर्षांचा मुलगा बिलगला होता. मुलगा खिडकीवाटे बाहेर पाही व आपल्या बापाला नाना तऱ्हेचे प्रश्न विचारी. केव्हां उत्तर द्यावें, केव्हां ऐकलें न ऐकलें करावें, केव्हां नुसतेंच खेकसावें असें त्याचें चाललें होतें. शेवटीं मुलानें बापाला विचारलें, " बाबा आगीन-गाडी कशी चालती व? " बापानें क्षणाचाहि विलंब न लावतां थोडक्यांत उत्तर दिलें, " कळ दाबत्यात ! त्येनं चालती. " ' कळ दाबतात ' म्हणजे काय करतात हें विचारण्याचें मुलाचें वय नव्हतें; व त्यानें विचारलेंच असतें तर बापानें त्याच्यावर खेकसून त्याला गप्प केलें असतें. अर्थात् कांहीं उत्तर मिळालें म्हणून मुलगा गप्प बसला व थोड्यांत निभावलें म्हणून बापहि खूश होऊन इकडे तिकडे पाहूं लागला. पण बापानें असें करावें हें अगदीं स्वाभाविक होतें. त्याला तरी काय माहीत—गाडी कशी चालते तें !

या प्रकारानंतर थोड्याच दिवसांनीं चि. मधूला बरोबर घेऊन मी एकदां सिंहगडच्या रस्त्याला फिरायला गेलों होतों.

22443

आंबिल ओढ्यांत शिवाजीनें आपले मावळे कसे लपवून ठेविले होते, बैलांच्या शिंगांस पलिते बांधून त्यांना शिवाजीनें कात्रजकडे कसें पिटाळून दिलें व शाइस्ताखानाच्या शिपायांस त्यानें कसें चकविलें याचें रसभरित वर्णन मी सांगत होतों. पुढें जातां जातां नदी दिसूं लागली. माहिती करून द्यावयास हवी म्हणून मीं म्हटलें, " ही पाहा मुळा नदी ! हीच वर खडकवासल्यापाशीं तुंबवून धरली आहे; तेथूनच आपल्या पुण्याला पाणी येतें. " मी माहितींत पुढें सरसावणार तोंच मधू म्हणाला, " ती अडविलेली नदी ही नसेल मग; आमच्या भूगोलांत लिहिलें आहे कीं, मुठा नदी अडवून पुण्यास पाणी आणिलें आहे. " मधूनें दिलेला हा तडाखा मुकाट्यानें पत्करून मीं म्हटलें, " भूगोलांतलें बरोबर आहे. ही मुठाच असली पाहिजे. " पुढें जातां जातां मी खडकवासल्याच्या धरणाविषयीं सांगूं लागलों व म्हटलें, " धरणाच्या भिंतींत पाणी सुटण्यासाठीं आणि अडविण्यासाठीं दरवाजे घातलेले आहेत. विश्वेश्वरअय्या म्हणून एक मोठे एंजिनियर येथें पूर्वी होते. त्यांनीं हे दरवाजे केले आहेत. " " पण हे दरवाजे उघडतें कोण अन् झांकतें कोण ? " " कोणी नाहीं; फार पाणी झालें कीं ते आपोआप उघडतात व कमी झालें कीं मिटतात. " " म्हणजे हें आपोआप होतें ? " " अगदीं आपोआप होतें. " " हें कसें होतें ? " " तशीच **हिकमत** त्यांनीं त्या दरवाजांत करून ठेविली आहे. " असें म्हणून मी तो विषय संपविला व विषयान्तरासाठीं इकडे तिकडे पाहूं लागलो. मी तरी काय करणार ! विश्वेश्वरअय्यांनीं काय केलें आहे, हें मला तरी काय माहिती ! मधूच्या पत्नीकडे एकादा टप्पा

माझ्या ज्ञानाची गति ! आगगाडींतील त्या पोक्त कुणब्यापेक्षां मला कांहीं जास्त कळत आहे असें मला वाटलें नाहीं. त्याची **कळ** अन् आमची **हिकमत** सारखीच ठरली ! खडकवासल्याची वासलात अशी लाजावी लागलेली पाहून पुढें जेव्हां पनामा कालव्याविषयीं एकदां बोलण्याचा प्रसंग आला तेव्हां मीं तें प्रकरण गळ्यांत घेतलेंच नाहीं. " जहाजें जिन्यासारखीं वर जातात व परत खालीं उतरतात " इतकें सांगून सौम्य व शिकवणुकीच्या आवाजानें मीं त्याला म्हटलें, " माधवराव बोडसांनीं ' चित्रमय-जगतां ' त मोठा सुंदर लेख यावर लिहिला आहे; तो मी तुला केव्हां तरी आणून देईन, बरं का ! " मला वाटतें, माझें एकट्याचेंच असें होत असेल असें नाहीं; पुष्कळ शिकलेल्या लोकांवरहि असेच प्रसंग येत असतील.

एकदां याहिपेक्षां मजा झाली. ' पृथ्वी गोल असून ती स्वतः-भोवतीं फिरते आहे ' या मास्तरांनीं सांगितलेल्या ज्ञानाचें मधू आश्चर्य करीत होता. " पृथ्वी गोल आहे म्हणजे काय हो ? आपण अगदीं लांब लांब गेलों तर आपल्याला उतरण लागेल ना ? कारण ती तुम्ही चेंडूसारखी आहे असें म्हणालांत ! अन् फिरती आहे तर आपण कसे फिरत नाहीं ? अन् आपण पडत कसे नाहीं ? " असे प्रश्नामागें प्रश्न त्यानें मला विचारले. उत्तरादाखल मीं त्याला सांगितलें कीं, " पृथ्वी आपल्याला आपल्या मध्याकडे ओढीत असते आणि म्हणून आपण पडत नाहीं." "पण आपलें खालीं डोकें वर पाय कसे होत नाहींत ?" " अरे, खालीं डोकें व्हायचें म्हणजे कुठें व्हावयाचें ? " " आभाळांत व्हावयाचें !" " मग आहेतच कीं आतांसुद्धां ! तुला वाटतं आहे का खालीं डोकं वर पाय झाले आहेत म्हणून ? " " नाहीं

वाटत. पण व्हायला नकोत का ?" या त्रांगड्यांतून माझी सुटका लवकर होईलसें दिसेना; म्हणून शेजारी बसलेल्या मंडळीकडे पाहून मीं म्हटलें, "कोलंबसनें जेव्हां पृथ्वीचें गोलपण, तिची वर्तुळगति व तिचें आकर्षण इत्यादींविषयीं स्पेन देशाच्या पण्डितांपुढें विवेचन केलें तेव्हां त्यांनीं त्याला अगदीं अस्सेच प्रश्न विचारले होते ! माणसाचें मन केव्हांहि सारखेंच असतें. तेव्हां काय आणि आतां काय !...." आम्ही थोड्या वेदान्तांत शिरत आहोंत हें पाहून हवी असलेली मोकळीक मिळालेली दिसतांच खालीं डोकें वर पाय होण्याची भीति न बाळगतां मधू टणाटण उड्या मारीत निघून गेला व मीहि मोकळा होऊन माझ्या विद्वत्तेची किंमत करीत कामास लागलों ! असल्या क्षुल्लक विषयांतसुद्धां ज्ञान केवळ दत्तक घेऊनच आपलें काम आपण भागवीत असतों. त्याचें शुद्ध स्वरूप आपल्याला प्रतीत झालेलें असतें, असें म्हणवत नाहीं. त्याचें शेवटचें सूत्रमय रूप हाताशीं धरून तें आपण अज्ञ लोकांच्या पुढें नाचवीत असतों. 'हा पाहा बोलणारा ढलपा' असें म्हणत ओरडत सुटलेल्या नीग्रोपेक्षां केवळ माहितीरूप ज्ञान प्राप्त करून घेतलेल्या माणसाची किंमत फारशी जास्त असेलसें मला वाटत नाहीं.

आपलें विद्वत्तेचें सोंग उगाच असतें. आपण केवळ अड-त्याचा धंदा करतों. अगदीं थोड्याशा दुसऱ्या लोकांनीं संपा-दिलेलें जें ज्ञान असतें तें घाऊक पद्धतीनें आपण त्यांच्या-कडून घेतों व फुटकळीनें विकतों. आपण शुद्ध घेवारीपणा करितों; सूक्ष्म बुद्धीच्या, विशेषत: प्रतिभाशाली व जिज्ञासु माणसांनींच खरें ज्ञान संपादिलेलें असतें. जें नवें प्रथम कळतें

6483

तें ज्ञान व तें ज्यांना प्रथम कळलें ते खरे विद्वान्! आपल्याला कळलेलें हें नवें ज्ञान म्हणजे ही नवी विद्या, ग्रहणशक्ति असलेल्या कांहीं लोकांना, ते सांगतात व मग हे त्या ज्ञानाची गोणी पाठीवर घेऊन सामान्य जगाच्या बाजारपेठेंत येतात व आपला माल चित्रविचित्र पद्धतीनें लोकांपुढें मांडितात. लोकांना वाटतें, हेच विद्वान् आहेत! पण यांची महती एवढीच असते कीं, लोकांनीं उत्पादिलेलें नवें ज्ञान समजून घेण्याची शक्ति व तें इतरांस समजून देण्याची हौस यांना असते. त्या मूळच्या द्रष्टयांची व सामान्य लोकांची गांठहि पडत नाहीं; त्यामुळें हे कावडवाहू लोक विद्वान्पणाचा गौरव उपभोगीत राहतात. ज्या आर्यभट्टाला पृथ्वीची दैनंदिन गति, ग्रहणांची उपपत्ति व सूर्याची अचलता माहीत झाली तो मूळ खरा विद्वान् होय; तीं चार लोकांस किंवा विद्यार्थ्यांस शिकविणारा विद्वान् नव्हे. गुरुत्वाकर्षणाचा नियम ज्या न्यूटनला उमगला तो मूळचा विद्वान्; तो नियम खुलवून सांगणारा शिक्षक विद्वान् नव्हे. ज्या जेनरनें देवीवरचें जन्तुरसायन तयार केलें तो मूळचा विद्वान् होय; लस टोंचणारा विद्वान् नव्हे. पाश्चूर हा विद्वान्; पण त्यानें काढिलेली कुत्र्यावरची लस टोंचणारे केवळ माहीतगार होत. तोंडावरून बर्फाची पासोडी घेऊन पृथ्वी हूं कीं चूं न करितां उत्तर-दक्षिण ध्रुवांकडे स्वस्थ पडलेली होती; पण ज्या नॅन्सेन, पेरी, स्कॉट इत्यादि लोकांनीं तिच्या तोंडावरचें पांघरूण काढिलें ते खरे विद्वान् होत; कारण त्यांनीं मूळ जाणिलें. त्यांनीं सांगितलेलेंच सांगण्याचें ज्यांनीं पत्करिलें आहे ते विद्वान् नव्हत, माहीतगार होत.

एव्हरेस्तवर पोहोंचण्यासाठीं जे बर्फाच्या कड्यांवरून कोसळून घेतात ते सृष्टीची खरी मनधरणी करितात; ते खरे जिज्ञासु होत. त्यांच्या प्रयत्नांची हकीकत सांठविणारे केवळ संग्रहकार होत. हे विद्वान् व हे जिज्ञासु सृष्टीचा ग्रंथ लावण्याची पराकाष्ठा करतात. त्या ग्रंथाची लिपि महानुभावांच्या लिपीपेक्षांहि अवघड आहे आणि त्याचा अर्थ दुर्बोध आहे. मोटारीची दुरुस्ती करणारा जसा वर तोंड करून तिच्याखालीं निजतो आणि वर दिसणारीं चाकें आणि त्यांचे व्यापार समजावून घेतो तसें अंतराळांतील सहस्रावधि चक्रांच्या खालीं निजून न्यूटननें त्या चक्रांच्या गति अजमाविल्या व ठरविल्या. याचें नांव 'नवें ज्ञान' व हें न्यूटनला झालें म्हणून तो विद्वान्. त्याला दिसलेले नियम शाळोशाळ समजावून सांगणारे शिक्षक केवळ माहीतगार होत. असा विद्वान् व माहीतगार यांच्यांत फरक आहे.

सामान्य व्यवहारांत जे विद्वान् म्हणून वावरतात पण आतांच सांगितल्याप्रमाणें जे केवळ निधिधारक असतात त्यांच्यांत व मूळ विद्वानांत जितकें अंतर असतें त्याच्या एकशतांशहि अंतर त्यांच्यात व सामान्य लोकांत नसतें. हे निधिधारक व सामान्य लोक बिऱ्हाडानें जवळजवळच राहतात; पण निधिधारकांपासून मूळ विद्वान् मात्र फार दूर राहतात. ते मूळ विद्वान् सृष्टीच्या विश्वासांतील लोक असतात. ती त्यांना जवळ येऊं देते व त्यांच्याशीं हितगुज करिते; आणि श्रेष्ठतर गुह्यें ती त्यांच्या कानांत सांगते. त्या गुह्यमंदिरांतून बाहेर येऊन हे द्रष्टे आपण पाहिलेलीं कौतुकें ग्रहणशील माणसांना सांगतात व पुनः ज्ञानगुहेंत प्रवेश करितात. हे ग्रहण-

शील लोक मोठे हौशी, आत्मश्लाघी, पुष्कळदां ज्ञानलालस पण बहुधा सदा प्रपंचनिरत असल्यामुळें जवळच राहत असलेल्या लोकांपुढें आपला बाजार मांडितात; व समंजस असल्यास नम्रपणानें व ढौली असल्यास ताठरपणानें आपल्या मालाची स्तुति करितात किंवा बडेजाव करितात. सामान्य लोकांना ही विद्या प्राप्त झालेली नसते याचें कारण ते या निधिधारकांपेक्षां कमी बुद्धिमान् असतात हें नव्हे; तर त्यांना हीं ज्ञानें प्राप्त करून घेण्यास उसंतच मिळालेली नसते किंवा ते वयानें लहान असतात किंवा त्यांना त्यांची आवश्यकता भासलेली नसते हें होय. यापेक्षां या दोघांत फारसा फरक नसतो. हरबाचा बाप गरीब होता पण रामचंद्रपंतांचा श्रीमंत होता; धोंडिबा अंधळा होता पण शरद धडधाकट होता; कोंडिबा वेडा होता तर प्रताप चलाख होता. यामुळें त्यांच्यांत फरक पडला इतकेंच. तसेंच अन्याबा, मन्याबा आणि जानबा यांना या ज्ञानबाची अजून आवश्यकता भासलेली नव्हती म्हणून हा फरक पडला. याहून जास्त महत्त्व या फरकाला नाहीं. पण मूळ विद्वानांतील व निधिधारकांतील फरक सृष्टीच्या देण्यांतीलच आहे. हें आपलें अलोलकीचें देणें सृष्टीनें अमुकच माणसांना कां द्यावें हें आज तरी सांगतां येत नाहीं; पण त्यांची कोटीच निराळी आहे. या निवडक माणसांचा एक स्वतंत्र वर्ग आहे. निधि-धारकांत व सामान्यांत मात्र असें नातें नाहीं. म्हणून मामूल 'विद्वानां'नीं आपली पदवी यथायोग्यपणेंच परीक्षिली पाहिजे.

पुष्कळ वेळां या माहीतगारांची स्थिति फार शोचनीय होते. त्यांनीं माहीत करून घेतलेलीं विद्वानांचीं सूत्रेंच डळमळतात; ऐकिलेले बीजमंत्र आपण नीट ऐकिले नाहींत

असें त्यांचें त्यांनाच दिसूं लागतें; असें झालें म्हणजे लौकिक विद्वानांनाहि आपला पवित्रा बदलावा लागतो; कारण वाचायचें आणि सांगायचें असें त्यांचें व्रत असतें. पण वाचायचेंच बदललें म्हणजे सांगायचें बदलणारच ! यालाहि ते तयार असतात. ज्ञानगुहेंत बसलेल्या द्रष्टयाकडे त्यांचा कान असतो. ते त्या द्रष्टयाला विचारितात, " आतां काय ओरडूं ? " तो आंतून गुरगुरतो, " जा ! ओरड कीं, न्यूटनचें सगळें चूक आहे. " " काय म्हणतां ? न्यूटन चूक आहे म्हणून ओरडूं ?" " अरे होय, होय; तसेंच ओरड. " " पण मला हें कसें समजावून सांगतां येईल ? " " जा, सांग जा कीं, हें नवें तत्त्वज्ञान पांचसहा जणांनाच कळलेलें आहे. " मग तो तें ज्ञान आपल्या खटाऱ्यांत भरतो व ' लई सस्तं लावलं आहे ' असें गाणें गात सर्वांना सांगतो, " न्यूटन चुकला आहे ! " इतक्यांत तिकडून निरोप येतो, " अरे, थोडें थांब, माझें अजून नीट ठरलेलें नाहीं. " तो म्हणतो, " कांहीं हरकत नाहीं, तसें सांगतों. " अशी ओढाओढ लौकिक विद्वानांची चाललेली असते. त्यांतहि प्रवृत्तीचा भाग येऊन पडला म्हणजे तर विचारूच नका ! रशियांतला पुढारी म्हणाला कीं, " मी म्हणतों हेंच सत्य आहे " कीं कांहीं लौकिक विद्वान् हेंच बरोबर आहे असें सांगत सुटतात. पण तें सांगतां सांगतां हिंदुस्थानचा पुढारी म्हणाला कीं, "त्याचें चूक आहे पण माझें मात्र खरें आहे, " तर प्रवृत्तिबद्दल होऊन ते पुन्हां सांगत सुटतील कीं, " महात्मा गांधी खरे आहेत. " मग त्या ज्ञानाचा बटवडा ते करीत सुटतील. ' मला कळतें ' असें म्हणणाऱ्याला जसे घेवारी सांपडतात, तसे ' मला कळत नाहीं ' असें म्हणून

कळत आहे असें सुचविणाऱ्यालाहि घेवारी भेटतात व गंमत ही कीं, हे सर्व विद्वान् म्हणून वावरतात.

अशा प्रकारच्या लौकिक विद्वानांत म्हणजे माहितगारांत मी आपली गणना करीत असल्यामुळे मला विद्वान् हें भव्य नांव कोणीं लाविलें म्हणजे संकोच वाटतो. कारण विद्वानाची माझी व्याख्या मीं आतां विशद केल्याप्रमाणें आहे. एकाद्या विषयांतली थोडीशी माहिती आपण करून घेतलेली असते. मूळ जाणणाऱ्यांचें ज्ञान आपण केवळ दत्तक घेतलेलें असतें. तें इतरांस नसतें; कारण, तें त्यांच्या मार्गांत आलेलेंच नसतें. शिवाय हें जें एकाद्या विषयाचें ज्ञान आपण संपादिलेलें असतें त्याविरहित ज्ञानक्षेत्रांत आपली स्थिति केवळ केविलवाणी असते. ज्यानें त्यानें म्हणजे जो कोणी लौकिक जीवनांत थोडीबहुत हालचाल करतो त्यानें आपलें ज्ञान नीट जोखून पाहिलें, त्याची एकदेशीयता ओळखिली व त्याच्या मर्यादा अनुभविल्या तर मी म्हणतों अशा तऱ्हेची संकोचवृत्ति त्याच्या ठिकाणींहि उत्पन्न होत असावी, असें वाटतें.

पण अशा अल्प माहितगारांनाहि विद्वान् ही पदवी या देशांत इतकी सुलभ आहे हें पाहून मात्र आपल्या राष्ट्राचें मागासलेपण ध्यानांत उतरतें व इतरांच्या बरोबरीस येण्यास केवढा पल्ला गांठावयाचा आहे हें पाहून मनास हुरहूर वाटूं लागते.

# १. नायक आणि नायिका कोणास म्हणावें ?

नायक, नायिका, आणि खलनायक हीं नांवें नाटकांतील कोणत्या पात्रांना द्यावीं यासंबंधीं रूढ असलेल्या कल्पना असाव्यात तितक्या तर्कशुद्ध नाहींत, असें मला वाटतें. ज्याचा वाङ्मयांत नुकताच प्रवेश झालेला आहे आणि म्हणून नाटक-वाङ्मयाचीसुद्धां ज्याची केवळ तोंडओळखच झालेली आहे अशा वाचकालासुद्धां नाटकाचा नायक कोण, त्याची नायिका कोण व खलनायक कोण या प्रश्नांचीं उत्तरें अगदीं सहज देतां येतात; याचें कारण तरी इतकेंच आहे कीं, या बाबतींतील अडाखे अगदीं कायमचे बसून गेलेले आहेत. असे अडाखे एकदां बसलेले असले म्हणजे सर्वांनाच आपलें काम सोपें जातें. मूळ अडाखा बसवितांना जी कांहीं विचाराची चिकित्सा करावी लागते ती अगदीं आरंभीं कोणी तरी केलेली असते आणि मग त्या ठरलेल्या सूत्राच्या आधारानें आपण चालूं लागतों.

नायक, नायिका आणि खलनायक खरोखर कोणास म्हणावें हा चिकित्सासूचक प्रश्नहि उत्पन्न होण्याचें कारण नाहीं असेंच कोणाहि माणसाला वाटेल. कारण पूर्वीं एकदां केव्हांतरी विचार होऊन याचा निर्णय झालेला आहे, अवश्य ती रूढि पडलेली आहे; आणि रूढीमुळें कसल्याहि वैचारिक दगदगीची आवश्यकता न भासतां अगदीं सामान्य शिक्षिताला-सुद्धां या प्रश्नाचें उत्तर सहज देतां येतें. पण मला असें वाटतें कीं, पडलेली रूढि तर्कपद्धतीस सोडून आहे, म्हणून ती टाकून देऊन कांहीं नवें सूत्र बसवितां येतें कीं काय तें पाहा-वयास हवें. मी पुढें जे विचार सांगणार आहें ते जर यापूर्वींच कोणाच्या लिखाणांत येऊन गेले असले तर ते पहिल्यानें सांगितल्याचें श्रेय त्या लेखकाकडे जाईल हें मी मान्य करितों. पण मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, माझ्या वाचनांत हे विचार मला कोठें आढळलेले नाहींत. कदाचित् माझें वाचन असावें तितकें विस्तृत नसल्यामुळें असें झालेलें असणें अगदीं शक्य आहे. पण जर का हे विचार वाचकांच्या पाहण्यांत आधींच कोठें आलेले नसले तर त्यांनीं ते अवश्य लक्षांत घ्यावेत अशी त्यांना माझी विनंति आहे.

बहुतकरून प्रत्येक नाटकांत प्रेमाचा विषय अवश्य असतो. नाटक वाचूं लागतांच यांतील कोणत्या स्त्रीचें लग्न कोणत्या पुरुषाबरोबर पुढें व्हावयाचें आहे याचा सुगावा चतुर वाच-काला लागूं लागतो; आणि म्हणून या स्त्रीपुरुषांच्या प्रीति-विषयक हालचालीकडे त्याचें लक्ष लागून राहतें. त्यांच्या प्रेमाला कसकशी भरती येत चालली आहे, त्यांत व्यत्यय कोण आणीत आहे, कांहीं आकस्मिक प्रसंगानें अथवा कोणीतरी

केलेल्या सहेतुक कारवायांनीं तीं एकमेकांपासून दूर कशी सरत आहेत आणि शेवटीं परिस्थितींत बदल झाल्यामुळें आणि इतर लोकांच्या कारवायांना यश न मिळाल्यामुळें हीं दोघं कशीं समीप येत जातात व त्याच्या प्रेमाला अवश्य तें विवाहाचें रूप कसें प्राप्त होतें यावर त्या वाचकाची दृष्टि आपोआपच खिळून राहते. या पात्रांपैकीं जो पुरुष असतो, तो त्याच्या मतानें नाटकाचा नायक असतो; त्याच्याशीं जिचें लग्न होतें तिला तो नाटकाची नायिका म्हणतो; आणि त्यांच्या प्रीतिसंगमाच्या आड ज्यानें कोणी कांहीं विपरीत कारवाया केल्या असतील तो त्या नाटकाचा खलनायक आहे असें तो ठरवितो. यांत त्याचें कांहींच चुकत नाहीं. कारण, पडलेल्या रूढीला अनुसरूनच त्याच्या मनाचा व्यापार होत असतो. नायक, नायिका खलनायक या शब्दांना कांहीं आक्रमक स्वरूपाचा अर्थ आहे व स्वतंत्र आकांक्षा, इच्छा आणि पराक्रम यांचा कांहीं अंश या नांवांनीं सूचित होतो हें त्याच्या ध्यानांत येत नाहीं. ज्याला आपण 'नायक' म्हणतों त्याच्या हेतूनें, आकांक्षेनें आणि पराक्रमानें नाटकाचें कथानक अंकित व्हावयास हवें; जिला आपण 'नायिका' म्हणतों तिच्याहि आकांक्षा, भावना आणि पराक्रम यांनीं नाटकाचें कथानक ठिकठिकाणीं वळण घेत असलें पाहिजे; तसेंच ज्याला आपण 'खलनायक' म्हणतों तो मत्सर, सूड, अपवित्र वासना इत्यादींनीं प्रेरित होऊनच नायकनायिकांच्या कामांत व्यत्यय आणीत आहेना, इकडे त्याचें लक्ष जात नाहीं. जीं माणसें प्रीतिविकारामुळें जवळ येऊं पाहतात आणि शेवटीं खरोखरच जवळ आलेलीं आहेत त्यांनाच नायक–नायिका म्हणावें आणि त्यांच्या आड

येणाऱ्या माणसाला खलनायक म्हणावें हा अगदीं साधा विचार त्याच्या मनांत कायम झालेला असतो.

ज्या नाटककारांनीं नाटकाच्या संविधानकांत दोन स्त्री-पुरुषांच्या प्रीतिविषयक हालचालींपेक्षां कांहीं निराळा विषय प्रतिपादण्यासाठीं किंवा उकलून दाखविण्यासाठीं घेतलेला असतो तेसुद्धां, ज्या प्रमुख पात्रांच्या द्वारा हें प्रतिपादन किंवा ही खुलावट करितात, त्या पात्रांचा शेवटीं विवाह झाला आहे असें दाखवितात. या स्त्रीपुरुषांचें लग्न होणें हा त्यांचा विषय नसतो. त्यांना विशेष अगत्याचा वाटणारा असा दुसरा कोणता तरी विषय त्यांच्या कथानकाच्या मुख्य सूत्रस्थानीं असतो. परंतु ज्या स्त्रीपुरुषांच्या हस्तें तो वठवावयाचा आहे त्यांचें शेवटीं लग्न व्हावयास हवें हा आग्रह त्यांच्याहि बुद्धीला असतो. स्वाभाविकपणेंच, वर सांगितलेल्या वाचकानें अशा प्रकारचें नव्या पद्धतीनें लिहिलेलें नाटक जरी वाचलें तरी त्याचा मूळ आडाखाच खरा ठरतो. ध्येयविषयक उदात्तप्रकारची कसलीहि गडबड जरी या पात्रांनीं केलेली असली तरी यांचें शेवटीं लग्न लागलेलें आहे ही गोष्ट त्याला विसरतां येत नाहीं; आणि याच माणसाचें पुढें लग्न लागावयाचें आहे असा होरा आपण आधींच बांधिलेला होता याचेंहि समाधान त्याला वाटत असतें. पण याचें मुख्य कारण तरी हेंच आहे कीं, मूळ प्रस्थापित झालेली जी रूढि आहे तिच्या तंत्रानें तो चालतो आणि नवीन तऱ्हेनें लिहिणारेहि या रूढीच्या छापें-तून बाहेर पडलेले नसतात. अर्थात् नायक, नायिका आणि खलनायक यांच्याविषयींच्या सनातन कल्पना आजहि जशाच्या तशा रूढ आहेत.

असें वाटतें कीं, कथानक ज्या पात्रांच्या हेतूंनीं, आकांक्षांनीं आणि पराक्रमांनीं उत्पन्न झालें असेल आणि शेवटपर्यंत अंकित राहिलें असेल तीं पात्रेंच त्या नाटकाचीं नायक-नायिका असावयास हवींत. रसिकानें आपल्या मनास हा प्रश्न विचारावयास हवा कीं, प्रस्तुत नाटकांत मध्यवर्ति कल्पना कोणती आहे ? काय झालें, असें या नाटकांत म्हटलें आहे ? हा प्रश्न विचारतांच त्याचें त्याला एकाच वाक्यानें उत्तर देण्यासारखें असतें. कारण, नाटकाची प्रधान कल्पना त्याला उत्तम कळलेली असते; आणि ती अगदीं लहान असते. या कल्पनेचा उच्चार स्वत:शींच केल्यानंतर ती ज्या पात्राच्या हेतूमुळें उद्भवली, पोसली व शेवटपर्यंत तग धरून राहिली तेंच पात्र प्रमुख आहे हा विचार त्याला आपोआप सुचण्यासारखा किंवा निदान कोणीं सुचविला असतां मानवण्यासारखा असतो. म्हणून नाटकांतील प्रधान कल्पना ज्याच्या कर्तृत्वानें उत्पन्न होते आणि ज्याच्या छापेंत वागते तो त्या नाटकाचा नायक आहे हीच भूमिका आपण पत्करावयास हवी. अशा व्यक्तीलाच आपण नायकत्व अर्पण केलें पाहिजे. कोण वगळला असतां नाटक एकदम विरघळून जातें, म्हणजे शिल्लकच राहत नाहीं, हें पाहावें आणि असा जो कोणी असेल तो त्या नाटकाचा नायक असें बेलाशक समजावें. जी एकादी घटना मानवी व्यवहारांत घडली असेल ती कोणी घडविली, आपल्या तंत्राप्रमाणें ती कोणी चालू ठेविली, तिच्या योगानें आपला हेतु तडीस नेण्याचा उद्योग कोणी केला, हें पाहिल्यावर ज्याचें नांव मनापुढें येतें तो त्या नाटकाचा नायक होय, असेंच समजलें पाहिजे. अशा या नायकाचें व ठराविक त्यांतसालि नायिकेचें

नाटकाच्या शेवटीं लग्न झालेलें असलेंच पाहिजे असें नाहीं. कथानकाचें आरंभस्थान, मध्यस्थान आणि अंत्यस्थान तो स्वतः असला पाहिजे. इतकें साधून नाटककारानें त्याचें लग्नहि साधलें असलें तर चांगलेंच झालें; पण हें झालें नसलें आणि नाटकांत दुसऱ्याच कोणा दोघांचें लग्न झालें असलें तरी तेवढ्यानें या पात्राचें नायकत्व कधींहि जातां कामा नये.

आपली रूढि अशी आहे कीं, अशा सर्वतोपरी कारणरूप आणि कर्तृत्वशाली असलेल्या माणसाला दूर सारून केवळ ज्यांचें शेवटीं लग्न लागलें आहे त्या माणसांना नायकनायिका समजावें ! कित्येक वेळां असें दिसून येतें कीं, नायक-नायिका अगदीं अळणी व कर्तृत्वशून्य अशीं माणसें असतात. यदृच्छेनें त्यांच्यावर जीं संकटें येतात किंवा हितशत्रूच्या कारवायांमुळें त्यांच्यावर ज्या तोहमती येतात त्यांमुळें जर्जर होऊन बसणें, पड खाऊन दुर्दैवाला बोल लावीत राहणें, अनुकूल कालाची वाट पाहात बसणें व आपल्या दुर्दैवाची कहाणी सांगून मित्रांच्या सहानुभूतीची अपेक्षा करणें एवढेच उद्योग हे लोक करीत बसतात; आणि मग नाटकाचा शेवट कसा व्हावयास हवा याविषयीं नाटककर्त्याची आणि रसिकांची अपेक्षा एकच असल्यामुळें तीं त्यांचीं सर्व संकटें दूर होतात व त्यांचें लग्न होतें. वास्तविक यांत त्यांचा कांहींच पराक्रम नसतो. कथानकाचें मुख्य उत्थान एकाद्या निराळ्या माणसाच्या हेतूंतून झालेलें असतें. तोच आपलें कर्तृत्व विशेष प्रकारें दाखवितो. रसिकाला दर वेळेला तो काय करीत आहे हें पाहण्याची इच्छा उत्पन्न होते. कथानकांतील प्रत्येक नवा उपक्रम त्याच्या हातून झालेला असतो आणि आरंभिलेला त्याचा

उद्योग कदाचित् यशस्वी होतो किंवा कदाचित् त्याला अपेशहि मिळतें. पण अशा प्रकारें कथानकाला आरंभस्थान पुरविणारा हेतु जो बाळगतो आणि तें चालू राहण्याला सूत्रहि पुरवितो तोच त्या कथानकाचा नायक ठरला पाहिजे.

हा नायक सद्धेतूनेंच प्रेरित झालेला असावयास हवा किंवा सद्धेतूनें प्रेरित झाल्यावर त्या हेतूच्या सिद्धीसाठीं पुढें त्यानें केलेलीं कृत्येंहि सत्कृत्येंच असावयास हवींत असा आग्रह धरणें हेंहि चूकच आहे. नाटककारानें आपल्या कथानका-साठीं मानवी व्यवहारांतून जी कल्पना उचलली असेल तिच्यावर सर्व अवलंबून आहे. त्या कल्पनेंतच जर ही गोष्ट कर्तृत्वरूपानें अंतर्भूत असेल कीं, एक वाईट प्रवृत्तीचा कर्ता माणूस आहे, तर त्या नाटकाचा तोच नायक बनला पाहिजे. कारण, नाटकांत जें काय घडून येतें तें तोच करतो; असा प्रसंग नाटकाला घ्यावा कीं नाहीं याचा नाटककारानें विचार करावा व रसिकांनीं या गोष्टीला संमति द्यावी किंवा देऊं नये; पण एकदां तो प्रसंग घेतल्यानंतर त्याचा जो कोणी खरा खरा नायक असेल त्यालाच तें पद अर्पण करावयास हवें. कित्येक वेळां असेंहि होईल कीं, या कर्त्या माणसाचा हेतु खरोखरीच उदात्त अथवा अगदीं स्वाभाविक असा असेल; पण या हेतूच्या सिद्धीसाठीं त्यानें नाटकभर जीं कृत्यें केलीं असतील तीं मात्र अपकृत्यें असतील. पण असें झालें म्हणून त्याचें नायकत्व मात्र आपण हिरावून घेतां उपयोगाचें नाहीं. कारण नाटकांतील जें सगळें घटित आहे तें त्याच्या कर्तृत्वानें घडलेलें असतें. फार झालें तर आपल्याला इतकेंच म्हणतां येईल कीं, हा नायक प्रवृत्तीनेंच वाईट आहे किंवा वास्तविक

याचे हेतू चांगले असून त्यांच्या सिद्धीसाठीं मात्र भरकटत जाऊन हा अपकृत्यें करितो. हा आपला शेरा चोरून ठेवण्याचीहि जरूरी नाहीं. याचा अर्थ असा कीं, नायक भला असो कीं बुरा असो, त्याच्या अंगीं 'नायकत्व' आहे कीं नाहीं, एवढेंच काय तें आपण पाहिलें पाहिजे. कथानकाचें उत्थान त्याच्यापासूनच झालें आहे ना, म्हणजे कथानकाचें आरंभस्थान तोच आहे ना, आणि कथानकांतील पुढील सगळें सूत्र आपल्या हेतूच्या सिद्धीसाठीं भल्याबुऱ्या साधनांनीं त्यानेंच चालविलें आहे ना, एवढेंच काय तें आपण पाहावयास हवें. मुख्य ताळा पाहावयाचा तो असा कीं, या माणसाचा हेतु व त्याचें कर्तृत्व हीं जर वजा केलीं तर कथानकांत कांहीं शिल्लक राहतें कीं काय?

आतां हें हेतुस्थान व हें कर्तृत्व एकाद्या पुरुषाच्या अंगीं असेल किंवा एकाद्या स्त्रीच्या अंगीं असेल. ज्या कोणाच्या अंगीं असेल तो स्त्री असो कीं पुरुष असो, तो त्या कथानकाचा नायक ठरला पाहिजे. पुरुषानें हें केलें असलें तर पुरुष नायक ठरेल, आणि स्त्रीनें केलें असेल तर स्त्री नायक ठरेल. ती स्त्री आहे म्हणून तिला 'नायिका' हें नांव द्यावयाचें असलें तर हरकत नाहीं. पण मग त्या नाटकांत नायक मात्र असावयाचा नाहीं! कारण खरोखरी नायकत्वाचे गुण असलेलें माणूस स्त्री असल्यामुळें केवळ भाषेची पद्धति म्हणून आणि व्याकरणाचा आग्रह म्हणून आपण त्या माणसाला 'नायिका' हें नांव दिलेलें असणार इतकेंच काय तें. मामुली रूढीप्रमाणें पाहतां मामूल पद्धतीच्या नायकाशीं जिचें शेवटीं लग्न लागतें ती स्त्री म्हणजे नायिका, इतकाच काय तो

अर्थ असतो. वास्तविक तिच्या अंगीं कांहींच कर्तृत्व नसतें. कथानकाच्या उत्थापनांत तिचा हेतु कारण नसतो आणि कथानकाची घडण तिच्या कर्तृत्वानें अंकित वा रंजित झालेली नसते. केवळ 'ईण' प्रत्यय लाविल्यानें ज्याप्रमाणें अधिकार उत्पन्न होत नाहीं त्याप्रमाणेंच केवळ नायकाशीं लगीन लाविल्यानें ती नायिका ठरत नाहीं! शाळाखात्याचे इन्स्पेक्टर लोक शाळा तपासावयास गांवोगांवीं गेले म्हणजे कित्येकदां सडे न जातां आपलें खटलेंहि बरोबर नेतात आणि मग हे स्वत: मुलांची शाळा तपासावयास गेले म्हणजे बाई-साहेब मुलींची शाळा तपासावयास म्हणजे पाहावयास अथवा मुलींना आपलें दर्शन करवावयास तेथें जातात. त्यांनाहि 'इन्स्पेक्टरीणबाई' असें म्हणतात. तथापि केवळ 'ईण' प्रत्यय लाविल्यानें खरोखरीचा इन्स्पेक्टरपणा अंगीं येत नाहीं! उलट ज्या बाईचें मुळींच लग्न झालेलें नाहीं पण जी शिकली-सवरली आहे व जिला विद्याखात्यानें तपासनीस नेमिलें आहे ती खरोखरीची 'इन्स्पेक्टर' आहे अथवा 'इन्स्पेक्टरीण' आहे हें कोणीहि मान्य करील. झांशीच्या राणीनें हाताशीं फौज घेऊन सेनापतित्व गाजविलें म्हणून ती स्वत: 'सेना-पति' होय. तथापि गंगाधरपंत हे त्या वेळीं जिवंत असते तरी ते केवळ तिचे पति म्हणून लोकांनीं जर त्यांना सेनापति पद अर्पिलें असतें तर तोहि प्रकार हास्यास्पद झाला असता. लक्षांत घ्यावयाची गोष्ट ती ही कीं, कोणत्या दोन माणसांचें पतिपत्नीत्वाचें नातें आहे हें आपल्याला सांगावयाचें नाहीं! प्रस्तुत त्यांच्या सामाजिक नात्याचा विचार चालू नाहीं, तर हेतूचा आवेग आणि कर्तृत्वाचें सूत्र कोणाच्या

अंगीं आहे हें पाहावयाचें आहे. तें ज्याच्या अंगीं असेल, तो स्त्री असो कीं पुरुष असो, त्याला नायक हें नांव शोभलें पाहिजे. पण केवळ भाषेची पद्धति म्हणून व व्याकरणाचा आग्रह म्हणून, ही व्यक्ति जर स्त्री असेल तर तिला नायिका हें नांव देणें युक्त होय. कथानकांतील टीकेच्या दृष्टीनें मात्र या ठिकाणीं नायक व नायिका या दोनहि शब्दांचे अर्थ एकच आहेत.

खलनायक हें नांवसुद्धां वास्तविकपणें ज्या माणसांस द्याव-यास हवें त्यांनाच केवळ देण्याची रूढि नाहीं, त्यांच्याशिवाय इतरांनाहि तें देतात. वरील परिच्छेदांत वर्णिलेला जो नायक आहे त्याचा हेतु जर संभावित असेल आणि त्या हेतूच्या सिद्धीसाठीं जर त्यानें सत्कृत्येंच केलेलीं असतील तर त्याच्या मार्गांत मत्सरानें किंवा अन्य हेतूनें जो कोणी विघ्न आणूं इच्छितो आणि त्याच्या उदार चरिताचा ग्रास करूं पाहतो त्यालाच खलनायक असें म्हणतां येईल. खलनायकाचें खलत्व हें सापेक्षतेनें स्पष्ट व्हावयास हवें; म्हणून मुख्य नायक जो, तो सज्जन असला पाहिजे, त्याचे हेतू आणि तदनुसार त्याची क्रिया ही संभावितच असलीं पाहिजेत. अर्थात अशा नायकाशीं जो क्षुद्र हेतूसाठीं वैर करतो तो खलनायक होय.

वर म्हटलें आहे कीं, नायक हा भला किंवा बुरा कसाहि असूं शकतो. कारण नायकत्व हें त्याच्या वृत्तीवर अवलंबून नसतें; आपल्या हेतूनें आणि पराक्रमानें जो सर्व कथानक अंकित करतो तो नायक होय असें वर स्पष्ट केलें आहे. नायक हेतु आणि पराक्रम यांत सचोटी आणि संभावितपणा दाखवितो पण त्याच्याशीं असूयेनें किंवा अन्य हेतूनें जो कोणी

स्पर्धा करतो त्यालाच खलनायक म्हटलें पाहिजे. बहुतकरून सर्व रसिक लोक अशा प्रसंगींच ' खलनायक ' हा शब्द योजितात. पण अडचण आहे ती ही कीं, या शब्दाचा उपयोग केवळ याच ठिकाणीं न करितां आणखीहि एका ठिकाणीं तो शब्द ते खर्ची घालतात; ही चूक नायक म्हणजे कोण याची मीमांसा न झाल्यामुळें त्यांच्या हातून होते. एकाद्या नाटकांत मामूल वहिवाटीप्रमाणें जीं नायक--नायिका असतात तीं कितीहि निष्क्रिय आणि अळणी असलीं तरी त्यांना कोणी तरी खलनायक भेटतोच. पण या नायक–नायिकांचें प्रेमपुराण हाच नाटकाचा मुख्य विषय असल्यामुळें आणि त्यांतच या खलनायकांचें खलत्व दिसत असल्यामुळें अशा अगदीं साध्या ठिकाणींसुद्धां या शब्दांची योजना शोभून जाते. पण कित्येक प्रसंगीं असें होतें कीं, ठराविक नायक–नायिकांच्या हेतूंतून कथानक जन्मलेलें नसतें; आणि त्यांच्या पराक्रमानें तें पोसलेलेंहि नसतें; तें दुसऱ्या कोणाच्या हेतूंतून निघालेलें असतें आणि त्याच्या पराक्रमावर भरारलेलें असतें. असें असलें तरीसुद्धां या दुसऱ्या माणसाला तो केवळ नायकाचा विरोधी आहे म्हणून खलनायक हें नांव रूढीप्रमाणें प्राप्त झालेलें असतें. ज्यांना रूढीप्रमाणें नायक-नायिका म्हणतात त्यांच्या हेतूमुळें कांहीं एकादें प्रकरण उपस्थित झालेलें असतें, असें मुळींच नाहीं; किंवा उत्पन्न करून त्यांनीं तें वाढविलेलें असतें असेंहि नाहीं. ते आपले नाटकांत असतात इतकेंच काय तें! आणि फार झालें तर दुर्दैवाचे किंवा दुसऱ्या कोणाचे आघात निमूटपणें सहन करीत बसतात. कथेचें उत्थान आणि कथेचें सातत्य हीं दुसऱ्या कोणाच्या तरी हेतूवर आणि पराक्रमावर अवलंबून

असतात; पण केवळ तो त्या ठराविक नायक–नायिकांशीं स्पर्धा करितो किंवा त्यांच्या बाबतींत कांहीं आगळीक करितो यासाठींच त्याला खलनायक असें म्हणण्याची वहिवाट पडली आहे! तो खलनायक नसतोच नसतो; पण नायक मात्र असतो. इतकेंच कीं, त्याचा कार्याचा आवेग जरी साहजिक असला तरी त्याच्या हातून घडणारीं कृत्यें अपकृत्यांत मोडणारीं असतात. अशा ठिकाणीं खर्चीं पडणारा ‘ खलनायक ’ हा शब्द आपण खर्चीं टाकूं नये, असें माझें म्हणणें आहे.

दोन-तीन वर्षांपूर्वीं कै. देवल यांचें ‘ दुर्गा ’ नाटक विद्यार्थ्यांना शिकवितांना वरील विचार माझ्या मनांत पहिल्यानें आले आणि नंतर ‘ भावबंधन ’ व ‘ पुण्यप्रभाव ’ हीं गडकऱ्यांचीं नाटकें शिकवितांना ते विचार माझ्या मनांत अगदीं दृढावले. ‘ दुर्गा ’ नाटकाचें सबंध कथानक, ज्यांना नायक-नायिका हें नांव मामूल वहिवाटीनें दिलेलें आहे त्यांच्या हेतूंतून मुळींच उत्पन्न झालेलें नाही आणि त्यांच्या नवनवीन उपक्रमांनीं वाढतहि गेलेलें नाहीं. तुळाजी या पात्राच्या हेतूवर आणि पराक्रमावर सगळें कथानक आधारिलेलें आहे. तो अकरमाशा आणि म्हणून त्याची अवहेलना झालेली होती, हें त्याच्या संतापाचें कारण होय. यांतून कथानक उद्भवलें आहे; आणि आपल्या संतापाच्या उपशमासाठीं त्यानें जीं कृत्यें केलीं त्यांनीं तें कथानक चालू राहिलें आहे. त्याचा हेतु चांगला कीं वाईट याविषयीं मतभेद असूं शकेल. किंबहुना त्याचीं कृत्यें वाईट म्हणतां येतील. पण तेवढ्यामुळें त्याचें नायकत्व आपल्याला हिरावून घेतां येत नाहीं. फार झालें तर तो वाईट नायक आहे असें म्हणतां येईल; पण तसें म्हटलें

तरी तो नायक आहे हें शिल्लकच राहतें. तोच जर कथेंत नाहीं असें मानिलें, कारणस्थानीं असलेला त्याचा हेतु आणि साधनस्थानीं असलेलीं त्याचीं कृत्यें हीं जर वगळलीं, तर कथानकाला जागाच उरत नाहीं.

हाच प्रकार 'भावबंधन' नाटकांतील घनश्यामाच्या बाबतींत दिसून येतो. लतिकेनें इतका चवचालपणा करावयास नको होता. ती सुशिक्षित असली म्हणून लोकांना चीड येण्याइतपत तिनें फटकळच असावयास हवें होतें, असें नाहीं. पण गडकऱ्यांनीं लतिका अशीच कल्पिलेली आहे आणि त्यामुळें चिडलेला घनश्याम आपल्या कामाला लागतो. म्हणजे घनश्यामाची चीड आणि तिच्या उपशमासाठीं त्यानें केलेलीं कृत्यें यांवरच सगळें कथानक उभें आहे आणि म्हणून त्याला नायक म्हणावयास हवें. त्यानें इतकें चिडावें कीं नाहीं; आणि चिडल्यावरसुद्धां इतकीं अपकृत्यें करावींत कीं नाहीं, या विषयावर निराळें बोलतां येण्यासारखें आहे. म्हणून त्याला कोणी वाईट म्हणून शिवी दिली तरी चालेल, पण तेवढ्यानें त्याचें नायकत्व लुप्त होत नाहीं. रूढीप्रमाणें पाहतां प्रभाकर हा नायक आहे; पण हा माणूस इतका निस्तेज आणि निष्क्रिय आहे कीं, त्याला नायक हें नांव देण्याची कोणासहि लाजच वाटावी. त्यानें फार फार केलें तें इतकेंच कीं, शेवटीं लग्नाच्या वेळीं तो बोहल्यावर येऊन उभा राहिला! असें असूनहि रूढीप्रमाणें त्याला नायकत्वाचा गौरव प्राप्त झाला आहे आणि जिनें घनश्यामाच्या अपकृत्यांचा कसलाहि तेजस्वी प्रतिकार केला नाहीं त्या लतिकेला, केवळ तिचें नायकाशीं लग्न झालें एवढ्याच मुद्यावर, नायिकापण प्राप्त झालें आहे.

'पुण्यप्रभाव' नाटकांत तर ही गोष्ट ढळढळीतपणें दिसून येते. वसुंधरेच्या बापानें वृंदावनाच्या अंतःकरणांत घरें पडतील असे शब्द बोलण्याची कांहीं जरूरी नव्हती. आपली मुलगी त्याला द्यावयाची नव्हती तर त्याला संभावितपणें नकार देतां आला असता; पण त्यानें वृंदावनाला म्हटलें कीं, तुझी आई वाईट चालीची आहे! हा आरोप खरा असता तरीहि तो केल्यामुळें वृंदावनाला राग आला असता आणि जर तो खोटा आहे तर मग वृंदावनाचा संताप अधिकच योग्य ठरतो. यांतून कथानकाला सुरुवात झालेली आहे आणि मग त्याच्या हातून अपकृत्यें झालेलीं आहेत. तो संतापला नसता आणि त्यानें हीं कृत्यें केलीं नसतीं तर कथानक मुदलींच उद्भवलें नसतें. म्हणून या कथानकाचा नायक वृंदावन हाच आहे. नायक, नायक म्हणून टीकाकारांनीं गोंजारिलेला भूपाल हा एक निष्क्रिय आणि मेंग्या माणूस आहे; तो कांहींहि करीत नाहीं; पण वहिवाटीनें त्याच्या गळ्यांत नायकत्व पडलेलें आहे. खरा नायक वृंदावन हा आहे, आणि त्याच्या अपकृत्याला विरोध करण्याची ईर्ष्या धरणारी जी कालिन्दी तीच खरी नायिका आहे. तिच्या हेतूनें आणि कृत्यानें कथानक हळूहळू वृंदावनाच्या हातांतून सुटत जातें. ती वृंदावनाची पत्नी आहे यासाठीं तिला हें नायिकापण अर्पिलेलें नाहीं; तर तिनें कर्तृत्व दाखविलेलें आहे व कथानक आपल्या प्रयत्नानें अंकित केलेलें आहे म्हणून तिला हें नांव दिलेलें आहे.

या तीनहि उदाहरणांवरून दिसून येईल कीं, नायक, नायिका व खलनायक हे शब्द वहिवाटीनें अनेकदां भलत्याच

माणसाला प्राप्त होतात. असें होऊं देतां कामा नये. दर वेळेला ही चूक होते असें मात्र खचितच म्हणावयाचें नाहीं. ती कोठें होते याचा उमज पडावा म्हणूनच हेतुस्थान, कारण-स्थान, उगमस्थान, कर्तृत्व, पराक्रम, कथानक चालू राहणें, कथानक भरारणें इत्यादि शब्दप्रयोग वर केलेले आहेत; व त्यांचें मर्महि थोडक्यांत सांगितलें आहे. तें लक्षांत घेतल्यास चालू रूढीचा पुन्हां विचार करण्याची आवश्यकता उरणार नाहीं, हा विचार कांहीं वाचकांच्या मनांत तरी उत्पन्न होईल असा भरंवसा वाटतो.

## १०. : माझ्या राजेश्वरा !

तुझ्या राज्यांत यावें, तुझी ओळखदेख करून न घेतांच तेथें राहावें, तेथचे सर्व भोग भोगावे आणि एके दिवशीं तेथून निघून जावें हें बरें नव्हे. रामदासस्वामींनीं असें करणाऱ्यांना ठपका दिला आहे. या परमविरक्त तापसानें आग्रहानें सांगितलें आहे कीं, माणसांनीं असें करणें युक्त नव्हे; एखाद्याच्या घरीं पाहुणे म्हणून यावें आणि घरधनी कोण तें न ओळखतांच तेथून निघून जावें हें मोठें नवल आहे, असें त्याला वाटे. राजाची ओळख करून घेणें किती अवश्य आहे हें त्यानें दासबोधांत मोठ्या अगत्यानें आणि परोपरीनें सांगितलें आहे.

आपल्या देहाचें कौतुक करावें, सुगंधित पाण्यानें तो स्वच्छ करावा, नाना प्रकारच्या उटी लावून त्याला शीतळता आणावी, केशराच्या आणि चंदनाच्या अनुलेपनानें त्याला शोभा आणावी, अलंकारांनीं आणि पुष्पमाळांनीं त्याला सुशोभित करावें, रेशमी आणि जरतारी वस्त्रप्रावरणांनीं त्याला नटवावें; हे सगळे सोप-

स्कार करावे; परंतु मेणाच्या या सुंदर मंदिरांत ज्याची स्थापना झालेली आहे तो कोण आहे आणि त्याचें वैभव काय आहे हें ओळखण्याची वासना मात्र बाळगूं नये याची रामदासाला मनापासून खंती वाटते. आपल्याला जिज्ञासासुद्धां पुरती असूं नये याचें या श्रेष्ठ संताला नवल वाटतें. या मंदिराच्या बाह्य देखाव्याला आपण इतकें भुलावें, आपले डोळे आणि आपलें मन त्यांतच गर्क व्हावें; पण दाराच्या आंत डोकावून, गाभाऱ्यांत कोण उभा आहे आणि त्याचें ध्यान कसलें आहे हें पाहाण्याची मात्र इच्छा आपल्याला होऊं नये, हें खरोखरच चमत्कारिक आहे.

हे राजेश्वरा ! आम्ही सर्वजण शुद्ध यात्रेकरूंसारखें करितों. जत्रेंतील प्रत्येक दुकानापुढें आम्ही उभे राहतों; कांहींहि घ्यावयाचें नसतां वस्तूंचें भाव मात्र विचारतों; प्रत्येक पाणीपोईवर पाणी पितों; पुढून चाललेली भजनाची प्रत्येक दिंडी कौतुकानें पाहतों; प्राकारांतील जनसंमर्दाच्या खेचाखेचींत हौसेनें शिरतों; प्रत्यक्ष मंडपघसणींतहि घुसावेंसें म्हणतों; पण इतक्यांत कोणी सांगतात कीं, गाभाऱ्याच्या दारावर तोब्यांचा मारा चालू आहे आणि शिपाई लोक लाठ्या घेऊन उभे आहेत. कळस पाहिल्याचें समाधान आम्हांला असतेंच म्हणून आम्ही तेथून बाहेर पडावयास पाहतों. कारण आम्हांला बाजारांत हिंडावयाचें असतें; फडावर चाललेल्या कुस्त्या पाहावयाच्या असतात; कपाळाला भंडारा लावून आणि डाव्या हातांत तुणतुणें घेऊन गाणाऱ्या गोंधळ्याचे पवाडे ऐकावयाचे असतात; ‘ काशीका राजा देखो दिल्लीची राणी देखो ’ हें चित्रकथ्याच्या पेटींत पाहावयाचें असतें ! हें होत आहे तो देवळांत पुन्हां जावेंसें

वाटतें; पण या श्रमानें आतां आम्ही दमलेले असतों. इतक्यांत दह्यांडी फुटल्याची गर्जना होते. मुख्य म्हणजे आमच्या दशम्याहि संपत आलेल्या असतात. मग मुलासाठीं एक साखरेचा हत्ती आणि बायकोसाठीं एक सुतकांठी खण घेऊन, गोठ्याच्या ओढीनें जसा बैल, तसें घराच्या ओढीनें आम्ही चालूं लागतों; वाटेनें जर कोणी विचारिलें कीं, "कोठें गेला होतां?" तर "देवदर्शनाला गेलों होतों" असें आम्ही बेलाशक सांगतों! "कांहींच वेचिलें नाहीं, शेवटीं हात झाडिले" हें दासांचें म्हणणें खरें ठरतें.

पण राजेश्वरा! यालासुद्धां आमचा इलाज नाहीं. आम्हांला या गोष्टींचें कांहीं वाटत नाहीं असें नाहीं. आम्हांलासुद्धां ती रुखरुख आहेच. पण आम्ही काय करावें! थोडेंसें देखणेपण म्हणजे पाहण्याची शक्ति आम्हांसहि आहे. आमच्या बेतांना पडूं लागलेल्या मर्यादा पाहिल्या म्हणजे आम्हांला जागृति येते. त्या मर्यादा मानवी वासनांच्या संघर्षानेंच पडत आहेत असें दिसलें म्हणजे आम्ही पुन्हां यत्न करितों; पण पुढें असा एक काळ येतो कीं, तेथें मानवी विरोधानें आमचे बेत फसत आहेत असें दिसत नाहीं; तर दुसरें कांहीं तरी आड येत असावें असें वाटतें. आमच्यांत जे कोणी विशेष चाणाक्ष व नम्र आहेत त्यांना एक निराळाच प्रत्यय येतो. आपल्या स्वयंभू शक्ति किती आहेत याची त्यांना खरी अटकळ असते. पण आपल्याला जें यश येत आहे तें मात्र आपल्या शक्तीच्या मानानें व परिस्थितीनें अनुकूलता दाखविली आहे त्यापेक्षां जास्त येत आहे असें त्यांना दिसूं लागतें. अर्थात् अकल्पित असें आणखी कांहीं तरी कारण येथें असलें

पाहिजे, असें त्यांनाहि वाटूं लागतें. अशा प्रकारें मानवी शक्तीच्या व परिस्थितिविशेषांच्या पलीकडे कांही तरी चालू असावें असें आम्हांसहि वाटतें. पण हें सर्व येथेंच थांबतें. त्याचाच शोध करीत बसावें हें युक्त असलें तरी आमचे जे नित्याचे उद्योग आहेत ते आम्हीं केव्हां करावे? ते केलेच पाहिजेत; आम्हांस खावयास पाहिजे, प्यावयास पाहिजे; इतर अनेक आवश्यक गोष्टी आम्हांस हव्या. त्यासाठीं आम्हांस झगडावें लागतें. त्यांत आमचा बहुतेक वेळ व आमच्या बहुतेक शक्ती खर्च होतात. मग हा जो गंभीर बुद्धीचा शोध तो आम्हीं केव्हां करावा? आमच्यापैकीं कोणी कोणी तो करितात, म्हणजे त्या मार्गांत ते असतात इतकेंच. आणि मधून मधून तो शोध पूर्ण झाला आहे असेंहि त्यांच्यापैकीं कोणी सांगतात. पण त्यांचे ते शोध भौतिक शास्त्रशोधांसारखे नसतात. ते फक्त त्यांचे त्यांनाच कळतात व ते झाल्यामुळें आपल्याला अपरिमित आनंद होत आहे असेंहि ते सांगतात. अशा लोकांची संख्या अत्यल्प असते आणि ते मधूनमधून केव्हां तरी जन्मास येतात. हे असले लोक कांहीं लिहूनहि ठेवितात आणि त्यावरच आम्हां सर्वांचा गुजारा चाललेला असतो.

अशा लोकांपैकीं कांहीं जण, माझ्या राजेश्वरा! आम्हां प्रापंचिकांचा फारच धिक्कार करितात. ते सांगतात कीं, हें सर्व झूट आहे, हें सर्व मिथ्या आहे, स्वप्न आहे, हा सर्व भ्रम आहे, ही सगळी माया आहे, ही दुपारची सावली आहे, याचा अंगीकार करूं नका. यांच्यापैकीं कांहीं असें असतात कीं, ते जरी अशा प्रकारचीं वर्णनें करीत असले तरी स्वतः इतर प्रापंचिकांप्रमाणेंच वागतात. ते खातात, पितात, भोग

भोगतात व त्याला राजयोग म्हणतात. आणि आश्चर्य हें कीं, ते आम्हां प्रापंचिकांचा धिक्कार करीत असतांनासुद्धां त्यांचा तो राजयोग चालावयाची व्यवस्था आमच्यापैकींच अनेक जण करीत असतात! आणि हाच धर्माचरणाचा एक प्रकार आहे असें हे मानितात. जे राजयोगी नाहींत ते माणसांतून इतके उठलेले असतात कीं, त्यांची व आमची गांठ कधीं पडतच नाहीं; आणि पडलीच तर ते इतके पिसाटासारखे वागतात कीं, त्यांच्याजवळ जाण्याची बुद्धि सहसा कुणाला होऊंच नये. ते वेड्यासारखे वागतात, अंतराळांतच बघत बसतात, कसलाहि विनोद झालेला नसतांना हंसत सुटतात. दु:खाचें कांहींहि कारण न होतां कोठें तरी एकाद्याच्या वळचणीखालीं कष्टी होऊन उभे राहतात. त्यांना कसला आनंद झाला होता हें आम्हांला कसें कळावें? आणि त्यांच्या जीवात्म्याला कसले क्लेश होत आहेत याचें ज्ञान तरी आम्हांला कसें व्हावें?

आम्ही गंभीर तत्त्वाच्या शोधाला विमुख आहों असा आरोप आमच्यावर संतांनीं कां बरें करावा? राजेश्वरा, त्या राजयोग्यांच्या भोंवतीं आम्ही हात जोडून उभे राहात नाहीं का? आणि या पिसाटांच्या वांकुल्यासुद्धां आम्ही भयचकित मनानें आणि परमार्थाच्या वासानें दुरून बघत नाहीं काय? आम्हांला परमार्थाची बुद्धि नाहीं हें म्हणणें उगाच आहे. या आरोपाचें आम्हांला फार वाईट वाटतें. अरे, जेथें परमार्थप्राप्तीचा नुसता पुसट पुसट वास येत असेल तेथेंसुद्धां आम्ही जाऊन लगटतों हें तूंच पाहतोस ना? तुझ्या स्वरूपाची अगदीं अस्फुटहि खूण कुठें दिसली तरी आम्ही तेथें घोंघावत जातों

हें खरें नाहीं काय? ही आमची बुद्धि कित्येक वेळां इतकी भ्रांत बनते कीं, एकाद्या साध्या वेड्या माणसाच्या ठिकाणीं-सुद्धां कांहीं साक्षात्काराच्या खुणा आहेत असें वाटून आम्ही त्याच्याहि मागें लागतों. यावरून आम्हांला परमार्थाची तहान आहे हेंच सिद्ध होत नाहीं काय? या आमच्या मूर्खपणाचें-सुद्धां उगमस्थान आमच्या परमार्थाच्या क्षुधेंत आहे हें विसरून चालावयाचें नाहीं.

संत म्हणतात त्याप्रमाणें जर आम्ही खरोखरच परमार्थ-विमुख असतों तर या सर्व संतांचीं नांवें तरी आज पृथ्वीवर शिल्लक राहिलीं असतीं काय? खचित सांगतों कीं, मला अति-शय प्रिय असलेल्या या माणसांच्या जातीवर संतांनीं घेतलेलें हें शुद्ध बालंट आहे. कोणत्याहि दिशेला जा आणि कोणत्याहि देशांत जा, जिकडे तिकडे संतमहंतांच्या खुणा पसरलेल्या दिसतील. एवढ्या विशाल पृथ्वीच्या पाठीवर केवळ टीचभर लांबीरुंदीचा असलेला आमचा हा महाराष्ट्र देश घेतला तरी यांतसुद्धां संतांची आणि देवतांची काय गर्दी झाली आहे पाहा! दोन कोस कांहीं असे जात नाहींत कीं, जेथें एकादें देवस्थान भेटलें नाहीं आणि एक पचक्रोशी अशी जात नाहीं कीं, जेथें संतांची समाधि नाहीं. आमच्या अंगीं परमार्थबुद्धि नसती तर हीं देव[illegible]ीं मंदिरें आणि या संतांच्या समाधि कोठून आल्या असत्या बरें? आणि तरीहि साधुसंतांची तक्रार आहेच कीं, माणसें प्रपंचाला फार भुललीं आहेत. राजेश्वरा! या तक्रारीचें मात्र मला फारच नवल वाटतें. आपली परमार्थाची आवड व्यक्त करण्यासाठीं माणसांनीं आतां करावें तरी काय!

तत्त्वज्ञानी लोक आणि संतमहंत सांगतात कीं, माणसांनीं

प्रपंचांतून उठून जावें. खरी गोष्ट. पण यांत दोन अडचणी येतात. एक म्हणजे त्यांतून उठल्याशिवाय तुझें ज्ञान कांहीं होऊंच नये असा हा कांहीं अवघड मोका असावा असें मला वाटत नाहीं. प्रपंच करण्यांत आणि तुझें ज्ञान होण्यांत एवढा विरोधच असावयास पाहिजे? असें खरोखरच असलें तर तें मोठें विस्मयकारक आहे. अशानें या कामीं आमच्या पदरांत निराशेशिवाय कांहींच पडणार नाहीं. आम्हांस जेथून उठून जावयास हे सांगतात तेथून उठून जाऊं नये असें आम्हांस अगदीं प्रांजलपणानें वाटतें. राजेश्वरा, उगीच तुझ्यापासून चोरून ठेवण्यांत कांहींच मतलब नाहीं. ज्यांची संगत आम्हीं तोडावी असें हे सगळे लोक सांगतात त्यांची संगति आम्हांला अत्यंत प्रिय वाटते. आमचें इहलोकीचें जिणें आम्हांला त्यांच्यामुळेंच सुखाचें वाटतें; इतकेंच काय, पण आमचीहि संगत त्यांना कधीं सोडवणार नाहीं. त्यांचें स्वतःचें जिणेंसुद्धां आमच्या-मुळेंच सुखाचें झालेलें असतें. म्हणून येथून उठून जाण्यास आमचें मन खरोखर नाखूष असतें.

शिवाय दुसरें असें कीं, समजा, आम्ही उठलों असें जरी मानिलें तरी कोठें जावयाचें याचा बोध आम्हांला मुळींच झालेला नाहीं. जे अगदीं उठून गेले गेले म्हणून म्हणतात ते आमच्या आश्रयानेंच कोठें तरी आसपास राहत असतात. फार झालें तर गांवाच्याबाहेर राहतात, एकादा मठ बांधतात, पुढें पडलेले तांदूळ गोळा करून ठेवितात; आर्त, कष्टी आणि निराशाग्रस्त यांच्याकडून उत्पन्नें मिळवितात; वर्षांतून एकदां भंडारा करितात; जे कोणी प्रसादाला येतील त्यांनीं पेटींत कांहीं तरी टाकावें अशी परभारें आपल्या शिष्यांच्या द्वारा

अपेक्षा ठेवितात; शिष्यसंप्रदाय वाढवितात. फार काय सांगावें, मेल्यानंतरसुद्धां ते आमच्यांतून हलत नाहींत. आम्ही साधीं-भोळीं माणसें; आम्ही एकदां मरून गेलों म्हणजे आमची चिमूटभर राखुंडी बनते आणि दुसऱ्या दिवशीं आलेल्या नदीच्या पुरांत ती वाहून जाते. आम्ही कोणी शिष्ट असलों तर फार फार म्हणजे शाळेंतल्या पोरांना सुट्टी मिळते. बाकी आमचें कांहींहि शिल्लक राहत नाहीं. पण प्रपंचांतून उठून गेलेल्या या मंडळींचें पाहा ! जिवंत असतांना तर ते आमच्या शेजारांतून हलत नाहींतच, पण मेल्यावरसुद्धां समाधीखालीं निजून राहतात. त्यांच्या समाधींचा तरी केवढा बडेजाव ! त्यांची वसति आमच्यांत कायमची झाली याचीच आम्हांला प्रौढी वाटूं लागते ! ते अजरामर झाले आहेत असें लोक एकमेकांत बोलूं लागतात. मग ते आमच्यांतून कसे बरें उठले ! पण यांचें सोडून दिलें तरी उठून जावयाचें तें कोठें जावयाचें याचा निकाल कोणींहि केलेला नसतो. ' उठून जावें ' याचा अर्थ इतका वाच्य करूं नये, थोडा अलंकारिक करावा असें मानिलें तर प्रपंचाची संगति कायमच राहते. मग मनानें तरी उठून जाणें कसें बरें शक्य होईल !

अशा तिढ्यांत सांपडल्यावर अगतिक झालेल्या पण मोठ्या कुशाग्रबुद्धीच्या माणसांनीं निराळेंच तत्त्वज्ञान सांगावयास आरंभ केला. प्रपंचांत राहूनहि परमार्थ साधितां येतो असेंच सांगावयास त्यांनीं सुरुवात केली ! राजेश्वरा, तुला हें ज्ञान मान्य आहे ना ? आम्हां सर्वांना असें वाटतें कीं, हें तुला मान्य असलें पाहिजे. ज्याअर्थीं तूं स्वतःच हा मानवी प्रपंच उभा केला आहेस त्या अर्थीं तूं स्वतःच त्याच्यावर एवढी करडी

नजर ठेवशील असें वाटत नाहीं. प्रपंचावर जर तुझी एवढी अवकृपा असती तर तो तूं कां बरें उत्पन्न केला असतास? आणि तुझे 'अवतार अवतार' म्हणून गाजलेल्या प्रचंड पुरुषांनीं हा प्रपंच इतका मन लावून कां बरें केला असता? प्रपंच करूंच करूं हा मानवजातीचा हट्ट इतका प्रखर आहे कीं, तो प्रपंच ज्यांनीं पराक्रमानें आणि सुबुद्धपणानें केला तेच तुझे अवतार असा अभिप्राय तिनें कायम करून टाकिला! ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीला प्रपंचांतून उठून जावें लागतें या सूत्रावर मानवजातीनें केलेली ही अत्यंत मनोरंजक टीका आहे. शेवटीं प्रपंचांत राहूनहि ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होऊं शकते, या तत्त्वाची छाप समाजानें आनंदानें पत्करिली.

राजेश्वरा! तुझ्या नांवाची गर्जना करीत, आम्हां महाराष्ट्रियांच्या प्रापंचिक विपत्तींचें निरीक्षण करीत, दऱ्याखोऱ्यांतून, कडेपठारांवरून आणि नगरोपनगरांतून भ्रमन्ती करणारा रामदास जेव्हां या कामीं आमच्या साहाय्याला धांवला तेव्हां तर सर्व लोकांना हायसें झालें असेल. या थोर संतानें सर्व प्रजांना धीर दिला आणि इतर संतांच्या माऱ्यानें हैराण झालेल्या लोकांना प्रपंच अंग चोरून करण्याची जी पाळी आली होती ती जाऊन तो प्रपंच साखसुरतपणानें व मान वर करून करावयाचें धैर्य त्यांना आलें. राजेश्वरा! हा विरागी संत तुझाच पाईक होता ना? तुझें रामनाम 'आनंदवनभुवना'च्या कोनाकोपऱ्यांत निनादत ठेवण्याचें काम तुझ्या या शूर भक्तानेंच केलें ना? पण असें झालें तरी त्यानें आम्हांला एक निकड लाविलेलीच आहे. या विश्वराज्याच्या सिंहासनावर झळकत असलेल्या तुझी ओळख करून न घेतां या प्रपंचांतून

आम्हीं जावें हें बरें नव्हे, असा त्याचा आग्रह आहे! हीच तर सर्वांत मोठी अडचण आहे!

ते लोक 'प्रपंचांतून उठा' म्हणाले तेव्हां आम्ही अगदींच खट्टू होऊन गेलों. आपल्याच्यानें हें होण्यासारखें नाहीं हें ओळखून आम्हीं त्यांना शरणचिठी दिली आणि खिन्न मनानें आपापल्या उद्योगाला लागलों. पण रामदासस्वामींनीं असें आश्वासन दिलें कीं, एवढ्या वैतागाची जरूर नाहीं. प्रपंचांत राहूनहि तुम्हांला हें साधितां येण्यासारखें आहे. त्यांनीं जें हें आश्वासन दिलें त्यामुळें आमचा जीव भांड्यांत पडल्यासारखा झाला. पण त्याच्या पाठोपाठ त्यांनीं बजाविलें कीं, "उगाच घर पाहोनी गेला। घरधनी नाहीं ओळखिला। राज्यामधूनीच आला। परि राजा नेणे॥" असें होतां उपयोगाचें नाहीं. प्रपंच-त्यागाचें संकट गेलें खरें, पण हें दुसरें शिल्लकच राहिलें! याचें निवारण कसें व्हावयाचें हा प्रश्न मोठा अवघड होता. परंतु लोकांच्या सुदैवानें गीतेंतील कर्मयोगाची मीमांसा एका श्रेष्ठ आधुनिकानें केली. त्यानें स्वच्छ सांगितलें कीं, श्रीकृष्णाच्या मताप्रमाणें ज्यानें त्यानें आपलें प्रपंचांतलें विहित कर्म करावें; इतकेंच कीं, त्यावर आसक्ति ठेवूं नये. म्हणजे वासनाक्षय झाल्यामुळें आमच्यापैकीं प्रत्येक जण बंधनांतून मुक्त होईल. रामदासाच्याहि पुढचें हें आश्वासन मिळाल्यामुळें आम्ही प्रपंचांत अधिक स्थिर झालों व त्यामुळें जास्तच सुखावलों. परंतु बंधमुक्त होऊन जरी आम्ही मुक्ति पावलों तरी रामदासांनीं सांगितलेला राजा ओळखण्याचें काम तसेंच शिल्लक राहून जातें. शिवाय हें काम आम्ही तुझ्या राज्यांत असतांनाच करावयास हवें. आतां हा घोटाळा कसा उलगडावा? जीवित पाहूं

जावें तर टीचभर. त्यांत पोटासाठीं मिळविण्याच्या कामीं आम्ही अगदीं रकमेस येतों; इकडे एक वर्ष गेलें, दोन वर्षे गेलीं असें झपाट्यानें चाललेलें असतें व 'आयुष्यें धाव घेतली' या दासवचनाचा प्रत्यय रोज येतो. तेव्हां आतां काय करावें!

जों थोडें विवेचून बघावें तों कोणी ज्ञानी सांगतात कीं, सर्व कांहीं तुझें तुझ्यापाशींच आहे; "तुझें आहे तुजपाशीं, परि तूं जागा चुकलासी"; म्हणून इकडे तिकडे धुंडाळीत न बसतां तुझ्यांतच गूढस्थ असलेलें रूप योग्य दृष्टीनें न्याहळून पाहा म्हणजे तोच तो राजा हें तुझ्या ध्यानीं येईल. असलीं वचनें वाचलीं म्हणजे आम्हांला अगदीं बावरल्यासारखें होतें. हें एकंदर विशाल विश्व पाहिलें म्हणजे, हे राजेश्वरा! तुझ्या वस्तीला आमच्या देहासारखें इतकें दुर्बल स्थळ तूं निवडिलें असशील हें खरेंसुद्धां वाटत नाहीं. आमचा हा देह तरी कसला आहे पाहा! हा एक मांसाचा लगदा आहे. याला दुर्गंधीसुद्धां येते. थोड्याहि आघातानें हा मोडून खालीं पडतो. वाऱ्याच्या सोसाट्यांत हा भलतीकडेच हेलपाटत जातो आणि पावसाच्या माऱ्यानें हा बधिर होऊन जातो. याची कुवत काय आहे बरें, कीं तूं आपलें वसतिस्थान याच्या ठिकाणीं करावेंस? 'नैनं छिन्दन्ति शस्त्राणि' असें जें तुझें रूप तें हत्यारानें छिन्नभिन्न होणाऱ्या या भंगुर देहांत राहतें काय? 'नैनं दहति पावकः' असें रूप आगीनें पोळणाऱ्या आमच्या कुडींत राहील तरी कसें? पावसानेंहि न भिजणारें आणि वाऱ्याचीहि मात्रा न चालूं देणारें तुझें रूप कफवातबद्ध शरीरांत वसतीस येऊन राहतें हें तत्त्वज्ञान्यांच्याकडील वर्तमान खरें कसें वाटावें! या मानवी देहापेक्षां सहस्रपटीनें अधिक बळकट आणि अधिक

शाश्वत अशा या बाहेरच्या विश्वांत, हे राजेश्वरा ! तुझी वसति असावी हें युक्त वाटतें. परंतु मायेचा विचार करणारे असें सांगतात कीं, विश्व म्हणजे आभास आहे. म्हणजे हें सगळें नुसतें विघटनक्षम आहे एवढेंच नव्हे तर हें केवळ भ्रमरूप आहे—केवळ स्वप्नरूप आहे ! अर्थात् अशा केवळ सांवली-सारख्या विश्वांत तुझी वसति कोठून असणार ? पण आम्हांला विचाराची जाचणूक होते ती अशी कीं, ज्या मानवी देहांत तुझी वसति आहे असें वर्तमान आम्ही ऐकितों तो देहहि या सांवलीसारख्या विश्वांतच मोडतो. मग तुझ्या वसतीला येथें तरी कोठली जागा सांपडणार ! स्वाभाविकपणेंच " परि तूं जागा चुकलासी " ही मेख योग्य ठिकाणीं बसत नाहीं आणि या सगळ्या शब्दाशब्दींत मन मात्र गोंधळून जातें.

असल्या मृण्मय आणि भिकार देहांत तुझें वसतिस्थान आहे या विचारापेक्षां या देहाहून दशसहस्रपट भव्य, सुंदर आणि शाश्वत अशा या बाह्य वस्तुजातांतच तुझें रूप शोधावें हें आम्हांला जास्त बरें वाटतें ! तूं आपलीं सामर्थ्यें कशीं पेरिलीं आहेस आणि या वस्तुजाताला तूं कोणते न्याय लावून दिलेले आहेस याचें संशोधन करीत करीत पुढें पुढें गेल्यानें तुझी ओळख अधिकाधिक होत जाईल असें आमच्यापैकीं कांहीं बुद्धिमंतांना वाटतें. परंतु या देहांतच तुझें रूप शोधणाऱ्यांचें मर्म जसें आमच्या ध्यानांत येत नाहीं, तसेंच या बाह्य वस्तुजाताच्या शोधकांच्या प्रयत्नाचें मर्महि आम्हांला पटत नाहीं. कारण, त्यांचें संशोधन भारीच चिकट आणि कंटाळवाणें असतें. रामदासानें सांगितलेला हा 'पिपीलका मार्ग' म्हणजे मुंगीचा मार्ग आहे; आणि आम्हांस तर तुझ्या

राज्यांत असतांनाच तुझी ओळख व्हावयास हवी आहे! म्हणून मग एकीकडे प्रपंचांतील सुखांचें सेवन करीत असतांना किंवा त्यांतील हाल भोगीत असतांना या विश्वांत तुझ्या रूपाचा जो साक्षात्कार नित्य होत असतो तो पाहूनच आम्हांला अत्यंत सुख वाटतें आणि याहून कांहीं जास्त करितां येईल असेंहि वाटत नाहीं. मात्र मधून मधून तुझें हें सुंदर रूप न्याहळीत बसण्याची वासना वनांत सदैव जागृत असते. मरुत् देव आपलीं साफसफाईचीं सर्व साधनें हाताशीं घेऊन तुझा मार्ग झाडूनझुडून स्वच्छ करितो; प्रत्यक्ष इन्द्रसुद्धां मोठमोठ्या पखालीं पाठीवर घेऊन तुझ्या आगमनाचा रस्ता सुवासिक पाण्यानें शिंपून टाकितो; तुझ्या मार्गावर उषा आपल्या हातानें अत्यंत मृदु अशा पायघड्या पसरिते; तोंच तुझें आगमन होत आहे याची ललकारणी मेघ नांवाचे मोठमोठाले राजे, चोपदार बनून करितात. हा सगळा थाट पाहून आतां तुझा रथ येणार या आशेनें आम्ही सगळे टक लावून तिकडे पाहूं लागतों. परंतु राजेश्वरा! तुझी अशी कांहीं चमत्कारिक लहर आहे कीं, या मार्गानें जातांना तूं आपल्या रथाचीं निळीं तावदानें नेहमींच लावून घेतोस! अरेरे! हें आमचें खरें दुःख आहे. ही आमची खरी निराशा आहे.

परंतु यांतहि कांहीं आश्चर्य नाहीं. तुझी ओळख व्हावी हें कितीहि अगत्याचें असो, ती होण्यासारखी आहे हा विचार मात्र मानव्याच्या अनुभवानें कठीण वाटतो. आजवर सहस्रावधि अधिकारी लोक होऊन गेले, परंतु “ न कळे आगमानिगमासी; न कळे आगमानिगमासी ” एवढाच त्यांचा संदेश आम्हांसाठीं शिल्लक राहिला आहे. ते तरी दुसरें काय सांगणार!

आमच्या प्राचीनतम वैदिक संस्कृतींच्या आरंभस्थानीं असलेल्या एका प्रसिद्ध सूक्तांत शेवटीं शेवटीं सांगितलेला अत्यंत उदात्त विचार हाच काय तो मनाला प्रामाणिकपणाचा वाटतो. सूक्तांत म्हटलें आहे कीं, "को अद्धा वेद क इह प्र वोचत् कुत आजाता कुत इयं विसृष्टिः। अर्वाग् देवा अस्य विसर्जनेनाथ को वेद यत आबभूव ॥ इयं विसृष्टिर्यत आबभूव यदि वा दधे यदि वा न दधे। यो अस्याध्यक्षः परमे व्योमन् सो अंग वेद यदि वा न वेद ॥ (सताचा) विसर्ग म्हणजे पसारा कशापासून किंवा कोठून आला हें यापेक्षां विस्तारानें येथें कोणी सांगणार? कोण निश्चयात्मक जाणतो? देव झाले तरी ते या सृष्टीच्या विसर्गानंतरचे मग ती जेथून निघाली तें कोण जाणणार? हा विसर्ग म्हणजे पसारा जेथून आला, किंवा तो निर्मिला गेला अगर न गेला तें परम आकाशांत असणारा या जगाचा जो अध्यक्ष तो जाणीत असेल; किंवा नसेलहि! कोणीं सांगावें?" यापुढें आम्ही कोठें जाणार? खरोखर तुला सांगतों, ही आमची माणसांची जात तुझ्या शोधाच्या कामीं अगदीं रंजीस आलेली आहे, अनेकांनीं तिला धोपटलें आहे, मूर्ख म्हटलें आहे, पातकी म्हटलें आहे. परंतु एक तरी मायेचा पूत असा निघावा कीं, जो या मानहानींतून तिला राजरस्त्यानें बाहेर काढील! असा कोणी जोंपर्यंत निघाला नाहीं तोंपर्यंत आम्हांला या कामांत यश येईल असें खरोखर वाटत नाहीं; मग कोणी संसार सोडावयास सांगो कीं धरावयास सांगो! हा काय पाठशिवणीचा खेळ आहे कीं काय! आम्हीं मानवांनीं या कामीं इतके श्रम केले आहेत कीं, संतमहंतांचे आग्रह खरे मानूनसुद्धां, हे राजेश्वरा! तुझी ओळख होईल अशी कोणतीहि नवी

गोष्ट आमच्यानें झालेली नाहीं. मग आमच्यामागें विनाकारण ही भिरभिर कां? रामदासस्वामी सांगतात त्याप्रमाणें एवढें मात्र खरें कीं, "संसार सुखें करावा। परी कांहीं परमार्थ वाढवावा। परमार्थ अवघाच बुडवावा। हें विहित नव्हे ॥ १ ॥"

## ११. गैरसमजाचा पाठलाग

के. विष्णुबोवा ब्रह्मचारी यांनीं म्हटलें आहे कीं, कांहीं गोष्टी बचकेनें उचलितां येतात तर कांहीं केवळ चिमटीनें उचलावयाच्या असतात. 'गैरसमजाचा पाठलाग' ही गोष्ट चिमटीनेंच उचलावयास हवी.

आपल्या जीवितांतील मनस्तापांची व दुःखांची जर बारकाईनें पाहाणी केली तर असें दिसून येईल कीं, त्यांतले बरेच ताप व त्यांतलीं बरींच दुःखें आपल्याविषयीं झालेल्या गैरसमजाच्या जाणिवेंतून उद्भवलीं आहेत. हा जाणिवेचा उद्वेग फार भडक नसतो; पण रोज येणाऱ्या बारीक ज्वराप्रमाणें तो आपलें जिणें अगदीं बेचव करून टाकितो. रोजच्या कामांत आपल्याला मन घालावेंच लागतें; पण तें चालू असतांना व तें संपल्यावर ही गैरसमजाची जाणीव त्याच मनाच्या एका कोपऱ्यांत खरूज खाजवीत बसली आहे याची ओळख आपणांस सदैव असते. मोठ्या लोकांनाहि गैरसमज उपद्रव देतात हें खरें; पण त्यांच्या

मनाला सामान्य लोकांच्या मनाइतका त्रास होत नाहीं. इतर दुसरीं सांत्वनें त्यांच्या मनाला थंडावा देत असतात. त्यांना विद्या प्राप्त झालेली असते, त्यामुळें त्यांना शांति प्राप्त होते. ते लोकहितासाठीं झगडत असतात; अर्थातच त्यांना लोकप्रियतेचा लाभ होतो. ते चांगले गबर असतात म्हणून केवळ गुर्मीनेंच या दुःखाची स्वारी ते पिटाळून लावितात; पण आपल्यासारखे जे सामान्य प्रापंचिक लोक आहेत त्यांची अवस्था फार कठीण असते. गैरसमजाचा जाच त्यांना सारखा खात असतो. आपलीं मनें कमकुवत असतात त्यामुळें हा जाच आपल्याला हशावारी नेतां येत नाहीं. आपल्याला कोणी कसलीहि शाबासकी देत नाहीं; आपल्याला पैशाचाहि उबारा नसतो व आपला रोजचा पोटाचा धंदा विशेष अभिमानास्पद नसतो. बरें, हें दुःख विस्तारून सांगतांहि येत नाहीं, कारण त्याचें रूप सूक्ष्म असतें व तें आपलें आपल्यालाच कळण्यासारखें असतें. दुसऱ्या कोणास सांगितलेंच तर तो कुचेष्टेनें हंसतो आणि असल्या गोष्टी मनाला लावून घ्यावयाच्या नसतात असा उपदेशहि तो आपल्याला करितो. यांत त्याचाहि कांहीं दोष नसतो, कारण वस्तु बचकेनें उचलावयाची संवय त्याला झालेली असते व आपलें मनोगत तर चिमटीनेंच उचलतां येण्यासारखें असतें.

कांहीं गैरसमज आपल्या वाइटावर असलेले लोक मुद्दामच उत्पन्न करितात व एकदां सुरू केलेले गैरसमज पसरत ठेवण्याची तरतूद ते करीत राहतात. हे गैरसमज फार भयंकर असतात. ते आपल्या अब्रूला काळिमा आणितात आणि कांहीं कांहीं वेळां तर उपजीविकेच्या साधनांचाहि ते होम करितात. हे घालविण्याची साधनेंहि आपल्यापाशीं नसतात; आणि असलीं तरी

आपण जों जों जास्त निरवानिरव करावी तों तों ते चिघळत जातात. लोकांना वाटतें कीं, ज्या अर्थी हे गृहस्थ इतके कासावीस होत आहेत त्या अर्थी येथें कांहीं तरी पाणी मुरत असावें. म्हणजे वैऱ्याच्या कामाला हातभार लाविल्याचें अपश्रेय मात्र आपल्याला येतें. शेवटीं गैरसमजाचा पाठलाग पुरता होण्या-सारखा नाहीं हें ओळखून आपण गप्प बसतों. पण वैऱ्याला तरी हेंच हवें असतें तो म्हणतो, यांचें खोटें म्हणून हे गप्प बसले. सुदैवानें असल्या दुष्ट लोकांची संख्या आपल्याला वाटते तितकी मोठी नसते. शिवाय हा गैरसमज पसरविण्याचा धंदा यशाच्या उन्मादामुळें ते गैरसावधपणें करूं लागतात व मग त्यांचें बेंड बाहेर येऊन त्यांची लायकी व दानत किती आहे हें लोकांना कळूं लागतें. पण हें होऊं लागेपर्यंतच्या काळांत मात्र असल्या लोकांच्या हातून कैक बळी गेलेले असतात व कित्येकांची अब्रू धुळीस मिळालेली असते; पुढें जरी त्यांची नाचक्की झाली तरी त्यांनीं सुरू केलेले गैरसमज ज्या कोनाकोपऱ्यापर्यंत पोहोंचलेले असतात तेथपर्यंत ही नाचक्की पोहोंचत नाहीं.

हे दुष्टाव्यानें उत्पन्न केलेले गैरसमज जरी सोडले तरी रोजच्या व्यवहारांत आपल्याला अस्वस्थ करणारे किंवा निष्का-रण लाज आणणारे कांहीं गैरसमज असतातच; पण ते इतरांच्या हातून केवळ अजाणतेपणें उत्पन्न झालेले असतात. आपल्या हातून असें कांहीं पातक घडत आहे ही गोष्ट त्यांच्या गांवींहि नसते. त्यांनीं आपण होऊन कांहींच केलेलें नसतें व कांहीं जर केलेलें असलें तर तें यथायोग्य व न्यायाचेंच आहे असें त्यांस वाटत असतें. आणि पुढें जरी त्यांना कळून आलें कीं

आपलेंच चुकलें होतें तरी त्यांचा कांहीं इलाज नसतो. कारण गैरसमजाच्या लाटा इतक्या सूक्ष्म होत गेलेल्या असतात व इतक्या दूरवर पोहोंचलेल्या असतात कीं, त्यांचा पाठलाग करून त्यांना नेस्तनाबूत करणें त्यांना साधण्यासारखें नसतें व शेवटीं संताप बाजूस राहून कित्येकदां विनोदाला मात्र अवसर उत्पन्न होतो !

गैरसमजाच्या वाटा जितक्या जास्त, बारीक आणि वांकड्या-तिकड्या तितकें नुकसान जास्त. वर्तमानपत्रांतून होणाऱ्या गैरसमजांनीं तर अगदीं कहर होतो. हजारों लोकांचा गैरसमज त्यांच्या द्वारा एकदमच होतो आणि तो दुरुस्त करण्याचें कसलेंहि साधन आपल्यापाशीं नसतें. दुरुस्ती लिहून धाडिली तर संपादक लोक ती अगदीं बारीक टाइपांत आणि कोठें तरी जाहिरातींच्या सांदींत छापून देतात व म्हणून ती निरुपयोगी ठरते. असें करण्यांत संपादकांचें कांहीं हित नसलें व त्यानें ती अगदीं ठळक ठिकाणीं छापिली असें मानिलें तरी मूळ मजकूर ज्या ज्या लोकांनीं वाचला होता ते ते सर्व लोक ही दुरुस्तीहि वाचतील अशी शाश्वती कोणी कोणास द्यावी ? म्हणजे गैरसमज टिकून राहतातच ! कोर्टांत तर हें गैरसमजाचें पीक अगदीं वेड्यासारखें येतें. गैरसमज नाहींसा करून घेण्या-साठीं एकादा भला माणूस सरकार-दरबार करतो; पण तेथचे वकील, साक्षीदार आणि बघे यांच्या रमण्यांत तो अगदीं कासावीस होऊन जातो व 'भीक नको पण कुत्रें आवर' म्हणून फिर्याद काढून घेतो ! एकादा बडा अधिकारी भर कचेरींत हाताखालच्या कारकुनाला तडातड टाकून बोलतो. पुढें त्याच्या ध्यानीं येतें की, आपलेंच चुकलें होतें. तो त्या कारकुनाला बोलावून घेतो व सांगतो

कीं, तुमचेंच बरोबर आहे; मी असें बोलावयास नको होतें. पण त्या कारकुनाच्या बेवकुबीचा बोभाटा शंभरजणांत झालेला असतो; आणि ही अधिकारीमहाशयांची कबुली त्याच्या कानांत होते. तिचा काय उपयोग! कारकुनाविषयींचा गैरसमज शिल्लकच राहतो. कांहीं कांहीं वेळां एखाद्याच्या चेहऱ्याकडे पाहून 'हा उर्मट आहे, दुष्ट आहे' असा कांहीं तरी समज आपण करून घेतों. आतां, त्या माणसाचा चेहराच तसा आहे त्याला त्यानें काय करावें? कित्येकदां अमका तमक्याच्या संगतींत आहे एवढ्यावरूनच आपलें त्याच्याविषयीं वाईट मत बनतें. कांहीं विशेष कारणास्तव दोन माणसें एकत्र आलीं कीं, तीं स्वभावानें व दानतीनेंहि सारखींच असलीं पाहिजेत असें समजणें खरोखर अगदीं चूक आहे. अशा प्रकारच्या गैरसमजांनीं आपण लोकांविषयीं वाईट ग्रह करून घेतों व लोकहि मनांतून आपल्याला अवहेलीत असतात. दुरुस्ती करावयाची म्हटलें तर दिवसाकांठचा आपला निम्मा वेळ याच कामांत खर्च होईल. तेव्हां असें वाटतें कीं, हें असेंच चालावयाचें. सुसंस्कृत माणसांना एवढेंच शक्य आहे कीं, गैरसमज जरी आवरतां येण्यासारखे नसले तरी प्रथमच आपल्या हातून ते उत्पन्न न होतील अशी सावधगिरी ठेवावयाची.

या गैरसमजाचें रूप कसें बारीक असतें व सामान्य लोकांच्या जीवनालाहि त्यांनीं कडवटपणा कसा येतो हें प्रपंच न्याहाळल्यानें चांगलें ध्यानांत येतें. येथें एक सुखवस्तु गृहस्थ आहेत. त्यांची राहणी विशेष टापटिपीची आहे. ओसरीवर बैठकीची जागा असून समोरच्या भिंतीवर एक मोठें थोरलें घड्याळ लाविलेलें असतें. खडकीची तोफ किंवा रामनारायणा–

ऱ्या गिरणीचा भोंगा चुकेल, पण त्यांचें घड्याळ एक पळभरहि मागेंपुढें व्हावयाचें नाहीं. ओसरीपुढें मोठें थोरलें अंगण व पुढें रस्त्याच्या सपाटीला दरवाजा. सकाळचा उद्योग आवरला म्हणजे झाडाझुडपांचा परामर्ष घेत हे गृहस्थ अंगणांतून हिंडत आणि घरांतील प्रौढ मुलीबाळीहि मोकळेपणानें इकडे तिकडे करीत. अलीकडे पांचचार वेळां त्यांच्या ध्यानांत एक गोष्ट आली व त्यामुळें त्यांच्या अंगाचा अगदीं संताप होत असे. दहा वाजण्याच्या सुमारास एक उंचसा गृहस्थ त्यांच्या दारावरून जाई. पण जातां जातां दारापुढें आला कीं थोडा वांकून पाहून पुढें निघून जाई. रावसाहेब म्हणत, 'काय पाजी माणूस आहे हा! माझ्याच घरांत माझ्या मुलीबाळींना हिंडण्याची चोरी झाली म्हणावयाची! हा आपला रोज मानगुटी खालीं करून त्यांना न्याहळून पुढें झटकतो.' शेवटीं एके दिवशीं ते थोडे आड उभे राहिले व त्या गृहस्थानें वांकून पाहतांच पुढें येऊन दोष देण्याच्या आवाजानें टाफरले, "कां हो? तुम्हांला रोज माझ्या घरांत बायकामाणसांकडे वांकून पाहण्याची शरम वाटत नाहीं? आपल्या वाटेनें सरळ नाहीं का जातां येत?" बिचारा गृहस्थ गोरामोरा झाला व म्हणाला, "साहेब, आपला गैरसमज झाला आहे. मी कचेरींत चाललेलों असतों. माझ्यापाशीं घड्याळ नाहीं. आपल्या ओसरीवर तें आहे; तें पाहून मी पुढें जातों. पण भिंतीवर तें थोडें उंच असल्यामुळें दिसत नाहीं म्हणून वांकून पाहतों; दुसरें कांहीं नाहीं." रावसाहेबांचें सगळें अवसान गळालें. गैरसमजानें आपण त्यांच्यावर उगाच खेकसलों याची त्यांना लाज वाटली. दुसरे दिवशीं त्या गृहस्थाला वांकावें लागलें

नाहीं. रा. सा. नीं आपलें घड्याळ वीतभर खालीं लाविलेलें होतें! हा खुलासा जर झाला नसता तर रा. सा. विनाकारण चडफडत राहिले असते व त्या गृहस्थाविषयींचा त्यांचा गैरसमज कायम राहिला असता. गैरसमज हे असे बळावतात.

माझे एक स्नेही नूतन मराठी विद्यालयाच्या 'स्वदेशी भांडारां' त नेहमीं धोतरें विकत घेत असत. 'भांडार' नवीनच निघालेलें होतें. पण त्याचे चालक प्रो. नारळकर असल्यामुळें 'भांडारा'ची चांगली चलती होती. स्वदेशी व्रत म्हणून रामभाऊंनीं याच दुकानांतून धोतरें घेण्याचा प्रघात ठेवला होता खरा; पण पुढें ते हळूहळू कुरकुरू लागले. त्यांना धोतरें वरचेवर घ्यावीं लागत; कारण दोन दोन तीन तीन महिन्यांत धोतरजोडा फाटून जाई; आणि या फाटण्यांतहि एक चमत्कार असे. इंच सव्वा-इंच लांबीच्या चिरण्या धोतरांना पडूं लागत. अशा दोनचार पडल्या म्हणजे धोतरें निकामी होत. मग रामभाऊ म्हणत, "पोरंपोरं मिळून दुकान चालवीत आहेत, त्यांना किती कळणार? मोठाले व्यापारी यांना बैठ्या घडीचा माल देतात आणि तो हीं पोरें विकतात. अहो, नारळकर झाले तरी बड्या व्यापाऱ्यांचें हें कसब त्यांना कसें कळणार? अर्थातच घडीच्या ठिकाणीं नेमक्या चिरण्या पडूं लागतात." मध्यप्रांतांतला त्यांचा एक मित्र मे महिन्यांत त्यांच्याकडे येई. बैठक सुरू झाली कीं स्वदेशीच्या गोष्टी निघत व मग 'स्वदेशी भांडारा' संबंधीं बोलणें निघायचें; रामभाऊ त्याला सांगत, "काय, नारळकरांचें दुकान म्हणून आम्हीं धोतरं घ्यावीं; अन् दर दोन-तीन महिन्यांनीं तीं फाटावीं; अस्सं चाललं आहे!

अहो, बैठ्या घडीचा माल! मुंबईचे अन् इथले बडे व्यापारी यांना बैठ्या घडीचा माल ओपतात अन् तोच हे आम्हांला देतात. कशाची आली आहे स्वदेशी! उगाच बुडायचं झालं!"

पुढें एके दिवशीं सकाळीं मंडईंत जातां जातां वाटेंत या माझ्या मित्राकडे मी जरा टेकलों. तो दाढी करीत बसला होता. दाढीबिढी झाल्यावर त्यानें ब्लेड स्वच्छ धुतली आणि धोतराचा सोगा सोडून त्याच्यावर ठेवून ती तो कोरडी करूं लागला. हें पाहतांच मी झटकन पुढें झालों अन् त्याचा हात धरून म्हणालों, "धोतरें कां फाटतात, कळलें? भले महाराज! यानेंच बारिक चिरण्या पडतात; अन् तुम्ही मोठे माहीतगारासारखे 'बैठ्या घड्या', 'बैठ्या घड्या' म्हणून पुकारा करतां!" ब्लेड बाजूस सारून पाहतात तों खरोखरच धोतराला चिरणी पडलेली! रामभाऊ अगदीं खजील झाले. ते म्हणाले, "मी त्या पोरांना उगीच कीं हो मूर्ख ठरविलं!" मीं म्हटलें, "पण हें इथं थांबून कसं चालेल! तुमच्या वर्ध्याच्या मित्राला तुम्ही हें कळविलं पाहिजे! त्याचाहि तुम्ही गैरसमज करून दिला आहे." रामभाऊंनीं आपल्या फजितीचें वर्णन करून त्याला मोठें पत्र लिहिलें व त्याच्या गैरसमाजाचा परिहार व्हावा असें केलें. पण त्यानें परत लिहिलें कीं, माझें मत बदललें हें खरें; पण आमच्या चिंगीचा नवरा, दीर हे सगळे दिवाळीला आले होते त्यांना मी हीं धोतरें फाटण्याची हकीकत सांगितली आहे! त्यांचाहि गैरसमज घालविला पाहिजे! मी जांवयाला लिहावयाचें म्हटलें तरी पण त्यांचा भाऊ विलायतला नुकताच रवाना झाला आहे त्यालाहि लिहावें कीं काय? अन् त्यानें जर आणखी कोणाला सांगितलें असलें

तर त्यानें त्या लोकांना लिहावें अशी विनंति त्यास करावी कीं काय? हा पाठलाग आपण कुठवर करायचा?" या त्याच्या उत्तरानें रामभाऊ अगदीं नामोहरम झाले. असा गैरसमज सूक्ष्म होत जातो व हातीं लागत नाहीं.

प्रो. अण्णासाहेब कर्वे यांच्या सत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्तानें 'रत्नाकर' मासिकानें मला कर्वे यांच्या कर्तबगारीवर लेख लिहावयास सांगितलें. "यशस्वी समाजसुधारक" या नांवाचा लेख मीं लिहिला. त्यांत खुद्द कर्व्यांच्यासंबंधानें असें एक वाक्य छापिलें आहे, "पण (कर्व्यांचें) हें बोलणें जरा **बडबडीचें** होईल असें वाटतें." आतां एवढ्या मोठ्या माणसासंबंधानें व त्या शुभ प्रसंगीं मी असें कसें लिहीन? खरोखर लिहिलेलें नव्हतेंच; पण मुद्रकांनीं चूक केली व तपासनिसांनीं ती राहूं दिली. अर्थात् हें वाक्य वाचल्यावर कर्वे यांच्या नातेवाइकांनीं, चाहत्यांनीं व उपकृतांनीं मला खूप नांवें ठेविलीं असतील व अजूनहि त्यांच्या मनांत तो दंश राहिला असेल— पण खरी गोष्ट निराळी होती. त्या लेखाचें हस्तलिखित अजून माझ्यापाशीं आहे. त्यांत मूळचें वाक्य असें आहे,—"पण (कर्वे यांचें) हें बोलणें जरा **गडबडीचें** होईल असें वाटतें." यांतील 'गडबडीचें' शब्दाऐवजीं मुद्रकांनीं 'बडबडीचें' असा शब्द छापिला. ही चूक उमगतांच मीं हस्तलिखित मागवून घेतलें व संपादकांची खातरी केली. पण प्रकटरीत्या ही दुरुस्ती करण्याच्या कामीं मीं किंवा संपादकांनीं जी आस्था दाखवावयास हवी होती ती दाखविली नाहीं. आज करूं, उद्यां करूं, असें करतां करतां ती चूक तशीच राहून गेली व म्हणून वरील मंडळींचा मजवरील रोषहि

कायमच राहिला असेल. गैरसमज असा सांचून राहतो. पदरीं पातक नसतांना लोकांचा असा रोष होतो व यामुळें आपल्याला कष्ट होतात. थोड्या चलाखीनें हें सगळें वांचलें असतें. पण तें झालें नाहीं. माझ्या परवांच्या एका लेखांत शेवटीं शेवटीं "तराटणी हवेंत **चिरत** चालली" असें छापिलें आहे. माझा शब्दप्रयोग "**विरत** चालली" असा आहे! आतां तो छापलेला शब्द वाचून कोणी कोणी मनांत म्हणाले असतील, "लेखक झाले म्हणून त्यांनीं काय वाटेल तें लिहावें काय!" पण मीं तो शब्द मुळीं लिहिलाच नव्हता! आणि ही दुरुस्तीची संधि मीं साधिली नसती तर कांहीं वाचकांचा तरी रोष माझ्यावर राहून गेला असता. गैरसमज असे पसरतात.

रा. विनायकराव जोशी हे 'सुधारक' पत्राचे संपादक होते. 'सुधारका'चें टिळकांच्या संबंधींचें धोरण आम्हां विद्यार्थ्यांना त्या वेळीं अत्यंत संतापजनक वाटे; म्हणून श्री. जोशी यांच्यासंबंधींहि आमच्या मनांत अढी असे. गांवांतून इकडे तिकडे फिरतांना हे विनायकराव भेटले म्हणजे आम्हीं त्यांच्याकडे अवहेलनेनें पाहत असूं. आमच्या त्या तसल्या पाहण्यानें विनायकरावांना वाईट वाटत असेल यांत कांहींच शंका नाहीं. पण एकदां मित्रांशीं बोलतां बोलतां आमच्या सहज ध्यानांत आलें कीं, ज्या गृहस्थांना आम्ही 'सुधारका'चे जोशी म्हणून समजून अवहेलनेनें रोंखीत होतों ते गृहस्थ विनायकराव जोशी नव्हतेच! ते हिराबागेचे चिटणीस असलेले दुसरेच एक गृहस्थ होते; आम्ही त्यांना विनायकराव समजत होतों! आतां ही चूक कळल्यावर वास्तविक पाहतां आम्हीं त्यांच्याकडे जाऊन त्यांची माफी मागावयास हवी होती कीं, आम्ही तुमच्याकडे

विनाकारण तिरस्कारानें पाहत होतों! पण तें झालें नाहीं. पुढें न्यू इं. स्कूलमध्यें मीं नोकरी धरल्यावर माझी व विनायकराव ऊर्फ अप्पासाहेब जोशी यांची प्रत्यक्ष ओळख झाली. त्यांची वागण्याची गंभीर ढब, बोलण्याची संथ पद्धति, जुन्या माहितीची त्यांची मनोरंजक खैरात, विनोदाचा संतत प्रवाह व परमतसहिष्णुता हीं पाहून माझ्या ध्यानांत आलें कीं, वर्तमानपत्रांतील धोरण हा एक निराळाच प्रकार असतो! गैरसमज नाहींसा होऊन त्यांची माझी मैत्री झाली हें ठीक झालें; पण ज्या गृहस्थाकडे आम्ही तिरस्कारानें पाहत होतों त्या बिचाऱ्याच्या मनांतील अवमानाचें शल्य तसेंच राहून गेलें याचें मात्र वाईट वाटतें.

आमच्या घरीं खालीं एक चांगला हुशार विद्यार्थी राहत असे. त्याच्या बापानें दुसरें लग्न केलें होतें व नव्या संसारांत तो रतलाम येथें दंग असे. हा पहिला मुलगा पुण्यास एका नातेवाईक बाईपाशीं राहत असे. सातव्या इयत्तेंत आल्यावर गणपतीनें यू. एस्. एफ्. चा कोर्स घेतला. कॉलेजांत जावें तर ती खर्चाची बाब व वडिलांकडून अगदीं उपेक्षा; अन् दुसरें म्हणजे तेव्हां एफ्. वाय्. पासून गणित आवश्यक असे व गणपतीला तर गणित येत नव्हतें. शिवाय यू. एस्. एफ्. होणाऱ्यांना सरकारी नोकरी मिळण्याची विशेष सवलत; तेव्हां अशी परीक्षा पास होतांच गणपतीला येथील बॉंबे ऑफिसमध्यें ताबडतोब नोकरी लागली. मिलिटरी अकौंट्सच्या कचेरीला येथें 'बॉंबे ऑफिस' म्हणतात हें सर्वांस माहीत आहे. परीक्षा पास झाली, नोकरी लागली; स्वाभाविकच गणपतीला आनंद झाला; म्हणून फारशा न भेटलेल्या आपल्या

बापालासुद्धां त्यानें समाधानाचें पत्र लिहिलें व म्हटलें, "मला गणित येत नाहीं म्हणूनच मीं कॉलेजचा नाद सोडला; यू. एस्. एफ्. झालेल्याला कॉलेजमध्यें घेत नाहींत. मला सध्यां बॅंबे ऑफिसमध्यें ३५ रुपयांची नोकरी लागली आहे." गणपतीचें कोणतेंहि करणें बापाला पसंत पडत नसे. तो वाईट आहे, खोटें बोलतो असा दुर्ग्रह त्यानें करून घेतला होता. या फड्यां माहीतगार बापानें गणपतीला उत्तर लिहिलें तें मोठें मासलेवाईक होतें! त्यानें लिहिलें, "चि. गणपती यांस अनेक आशीर्वाद, वि. वि. तुम्ही यू. एस्. एफ्. पास झालां हें वाचून सौभाग्यवतीला व मला फार आनंद झाला. असेंच यश वरचेवर श्रीकृपेनें तुम्हांस मिळत जावें. पण तुम्हीं मॅट्रिक होऊन कॉलेजांत जावें अशी आमची फार इच्छा होती. तथापि आपलें शहाणपण चालवून आपण यू. एस्. एफ्. झालां त्यालाहि कांहीं हरकत नाहीं. कॉलेजांत जावयास अजूनहि काय हरकत आहे? यू. एस्. एफ्. झाला म्हणजे काय बाटला कीं काय? मॅट्रिक काय, अन् यू. एस्. एफ्. काय; राज्य एका इंग्रज सरकारचेंच ना! मग कॉलेजांत कां नाहीं जात? तुमच्याच मनांत नसलें तर कॉलेजवाले तरी काय करणार? तुम्ही लिहितां कीं, मला गणित येत नाहीं— नसेल येत; कॉलेजांत काय गणिताशिवाय इतर विषय शिकवीतच नाहींत कीं काय? आपण आपलें समजलें तेवढेंच शिकावें; पण तुमच्याच मनांत नाहीं तेथें कॉलेजवाले काय करणार! पण एका गोष्टीनें मात्र तुम्हीं आम्हांला अगदीं चकित करून सोडिलें! आम्हीं आपले अशिक्षित असलों म्हणून काय गाढव आहों असें समजतां काय! अहो! तुम्ही पुण्यास नोकरी आहे म्हणतां अन् लिहितां कीं

बॉंबे ऑफिसमध्यें नोकरी करतों! हें कसें काय? पुण्यांत राहून मुंबईला नोकरी करतां काय? कांहीं तरी खरें लिहावें! का बाप आपला वेडाबागडा असला म्हणून त्याला कांहींहि लिहावें!– कळावें; देव तुम्हांला खरें बोलण्याची बुद्धि देवो, हा आशीर्वाद—"

आतां या शहाण्या बापाला गणपतीनें काय लिहावें! खऱ्या माहितीच्या अभावीं त्यानें अनेक गैरसमज करून घेतले होते–हे कसे दूर व्हावयाचे?

इतिहासप्रसिद्ध माणसांच्या किंवा पुढारी लोकांच्या चरित्रांत अशा गैरसमजांनीं त्यांना अगदीं सतावून सोडिल्याची उदाहरणें आहेत. पण तीं उदाहरणें ढोबळ असतात; आणि आरंभीं म्हटल्याप्रमाणें त्यांनीं त्यांचें इतकेंसें नुकसानहि होत नाहीं; पण आपल्यासारख्या सामान्य माणसांना या गैरसमजांची भारीच जाचणूक होते आणि आपण परस्परांविषयीं विनाकारण वितुष्ट बाळगितों. असलींच नेहमींच्या व्यवहारांतलीं चारपांच उदाहरणें वर दिलीं आहेत. तीं 'चिमटीनें उचलून' नीट न्याहळून पाहिलीं तरच त्यांतील खरें सौंदर्य ध्यानांत येईल असें वाटतें.

# १२. ललित-लेखक जीविताचें अनुकरण करतात काय ?

पाश्चिमेकडील देशांत आज दोन अडीच हजार वर्षें वाहत राहिलेल्या सर्व ज्ञानगंगांचें उगमस्थान ॲरिस्टॉटल् हा होय. हिमालयाच्या पाणलोटावरून सहस्रावधि नद्यांच्या धारा खालीं आलेल्या नकाशांत दिसतात. यांनींच आर्यावर्ताचा अर्धाअधिक भाग प्रथम जलमय व सुपीक करून टाकिला आहे. पश्चिमेकडील मानवयोनींत ॲरिस्टॉटल् हा हिमालया-सारखा शोभतो. त्याच्या एकट्याच्या लहानशा मस्तकांतून ज्ञानाच्या हजारों धारा बाहेर पडल्या व त्या शतकानुशतक पश्चिमे-कडील अनेक वंशखंडांच्या जीवितांत मुरत राहून त्यांचें जीवित सुसंस्कृत आणि संपन्न करून टाकीत आहेत. मानवी जीविताचर अशा प्रकारची शाश्वत छाप बसविणारा त्यासांशिवाय इतर कोणी तत्त्ववेत्ता आजवर होऊन गेला असेल असें वाटत नाहीं.

त्याचीं जीं विविध प्रवचनें चालत त्यांत कवींविषयीं बोलतांना तो म्हणाला कीं, “ कवि अनुकरण करितो. ” हें वचन बोलतांना त्याच्या मनापुढें शोकपर्यवसायी नाटकें होतीं असें टीकाकार लोक सांगतात. तीं तशीं असोत किंवा नसोत; कवि अनुकरण करितो म्हणजे काय याचा बोध आपल्याला स्वतंत्रपणेंच करून घेतला पाहिजे.

कवींना जीवितांत जें दिसतें त्याचें चित्रण ते करितात असा या सामान्य विधानाचा अर्थ आहे. या तत्त्ववेत्त्याच्या काळीं काव्य-नाटकादि लिहिणारे कवी मानवी जीविताचें केवळ हुबेहूब वर्णन करण्यांतच आपल्या कौशल्याचें सार्थक मानीत होते कीं काय हें माहीत नाहीं. पण अनुमानानें खचित असें वाटतें कीं, तेव्हांचे कवीहि असें करीत नसावेत. ते मानवी जीविताचें अनुकरण करीत असतील हें बरोबर आहे. पण जसलें कसलें मानवी जीवित त्यांना भोंवतालीं दिसत होतें तसलेंच जीवित, कानामात्रेचाहि फरक न करतां, ते चित्रित करीत असतील असें वाटत नाहीं. कारण स्थूलमानानेंसुद्धां मानवी जीविताकडे पाहिलें तर त्याचा कोणताहि खंड असा दिसत नाहीं कीं, जो कवींनीं किंवा नाटककारांनीं कोणत्या तरी दोन टोकांमधून नेमका उचलिला व काव्याच्या किंवा नाटकाच्या सांच्यांत चपखल बसविला. मानवी जीविताचा कोणताहि एकादा तुकडा कवितेंत किंवा नाटकांत आणून बसविलेला आहे व तो जसा बसावयास हवा तसा बसला आहे असें झालेलें नाहीं, हें कवी व नाटककार स्वतःसुद्धां सांगतील. सृष्टीनें चांगलें बांधेसूद व कलाकुसरीचें कथानक आपण होऊन पुरविलें आहे व कवीनें किंवा नाटककारानें त्याला कवितेचें

किंवा नाटकाचें रूप देण्याचेंच काम केवळ केलें आहे असें झालेलें किती ठिकाणीं आढळतें हें वाङ्मय वाचणाऱ्यांनीं अवश्य पाहावें. मला वाटतें, अपवादादाखल एकादें नाटक व कदाचित् एकादी कादंबरी सांपडेल, पण एकंदर जो वाङ्मयसंभार आपल्या डोळ्यांपुढें उभा आहे, त्याच्या अवलोकनानें जर कांहीं सिद्ध होत असेल तर तें हें कीं, हे कसबी लोक माणसांच्या प्रापंचिक जीवनांतून केवळ ओबडधोबड असा पाषाण हातांशीं घेतात आणि मग आपल्या अपेक्षेची कुशाग्र छिन्नी त्याच्यावर चालवून आपल्याला हवा आहे तसा आकार त्या पाषाणाला देतात. त्यांच्या हातीं जो केवळ कच्चा माल लागतो त्याची रुचकर आणि भोग्य वस्तु कशी बनवावी हें आपल्या वासनेच्या संमतीनें ते ठरवितात.

मौज अशी आहे कीं, त्यांनीं मूळ वस्तूंत इतकें कृत्रिम आणून पेरिलें तरी त्यांनीं प्रपंचांतील स्वाभाविक चित्रेंच रंगविलीं आहेत असें आपण म्हणत राहतों. वाङ्मयांत वाचावयास सांपडणारा सर्व प्रकार हा मूळ सृष्टीच्या घटनेंतच जसाच्या तसा सांपडतो असें म्हणणें हें, स्वाभाविकपणा वाङ्मयाला आवश्यक आहे, या आपल्या अपेक्षेला जमून दिसतें म्हणून आपण म्हणतों. वाङ्मयांत स्वाभाविकपणा असावा या आपल्या मूळ अपेक्षेचा अर्थ इतकाच आहे कीं, अवाच्या सवा, मुलुखानिराळें, एक हात लांकूड तर नऊ हात ढलपी, असें कांहीं असूं नये. जें जें वाङ्मयांत आलेलें असतें तें तें केव्हां ना केव्हां तरी आपल्याला जीवनक्रमांत खास भेटेल, असेंच असावें. वाङ्मयप्रकारांत काढलेलें सगळेंच्या सगळें चित्र स्वाभाविकच आहे याचा अर्थ, या चित्रांत मुलुखानिराळें असें कांहीं

नाहीं, एवढाच आहे. पण ' या चित्राचे निरनिराळे अवयव एकमेकांच्या शेजारीं जसे बसविलेले तुम्हांस दिसत आहेत तसेच खुद्द प्रपंचांतहि दिसतात काय?' असा प्रश्न जर कोणीं केला, तर आपणांस गांगरल्यासारखें होईल. आणि 'वाङ्मय लिहिणाऱ्यानें जे कार्यकारणभाव कल्पिलेले आहेत, ज्या एका वस्तूंतून दुसरी वस्तु अवश्य निघालीच पाहिजे असें त्यानें दाखविलें आहे तें नेहमींच्या स्वाभाविक प्रपंचांत तुम्हांस हटकून सांपडतें काय?' असा प्रश्न कोणीं केला तर आपलें मूळचें म्हणणें विचार करूनच पुन्हां मांडावयास हवें असें आपणांस वाटूं लागेल.

वाङ्मयलेखक हा केवळ सृष्टीपुढें दर्पण धरितो असें समजणें चूक आहे. जें सृष्टींत दिसतें तें तो घेतो म्हणून त्याचें लिहिणें स्वाभाविक असतें, इतकेंच काय तें खरें असतें. पण त्याला जें दिसतें तें तो आपल्या अपेक्षेप्रमाणें पुन्हां जुळवितो. सृष्टीनें बनविलेल्या कथानकाचा बनाव त्याला आवडत नाहीं. त्याची अपेक्षा निराळी असते, त्याची आवड वेगळी असते आणि त्याची रसाची रुचि भिन्न असते. कशां-तून काय उपजावें याची त्याला कांहीं स्वयंभू कल्पना असते. पण प्रपंचांतील व्यापाराकडे तो जों पाहूं लागतो तों त्याची अपेक्षा फसते. कांहीं नावडतेंच त्याच्या डोळ्यापुढें दत्त म्हणून उभें राहतें. कांहीं भलतेंच रसमिश्रण झाल्यानें त्याच्या तोंडाला कडवट चव येते. मग हे प्रपंचांतील व्यापार तो एकमेकांपासून विलग करितो आणि आपली अपेक्षा, आवड, रुचि आणि उपजतबुद्धि यांचा कल पाहून हे सुटे केलेले सगळे अवयव आपल्या योजनेप्रमाणें तो निराळ्या सांच्यांत बसवितो. याचा अर्थ

असा कीं, प्रपंचांतील कापीव ठोकळे तो उचलतो पण ते मुळा-मध्यें ज्या नात्यांनीं आणि अनुक्रमानें बसविलेले असतात तीं नातीं व ते अनुक्रम योग्य त्या त्या ठिकाणीं तो बदलून टाकितो व आतांच सांगितलेल्या आपल्या कलाप्रमाणें तो त्यांचा एक नवा सांचा बनवितो. प्रपंचांतील मूळ ठोकळे उचलले येथ-पर्यंत त्याचें लिहिणें निःसंशय स्वाभाविक आहे; पण त्यानें त्या ठोकळ्यांत जीं नवीं नातीं उत्पन्न केलीं तीं मात्र त्याच्याच कृत्रिमांचीं आहेत असेंच म्हटलें पाहिजे. 'कवि अनुकरण करतो' हें खरें असेल पण आपल्या वस्तूचा बनावसुद्धां प्रपंचां-तील अनुभवाप्रमाणें तो बनवितो हें मात्र खरें दिसत नाहीं.

हीं नवीं नातीं तो कां उत्पन्न करतो हें पाहाण्यासारखें आहे. समाजाच्या जीवनक्रमाचें मनुष्यप्राण्यानें कांहीं अवलोकन केलें आहे. त्यावरून व मानवी हिताकडे लक्ष ठेवून बऱ्या-वाईटाचे, न्यायान्यायाचे आणि खऱ्याखोट्याचे कांहीं अडाखे त्यानें बसविले आहेत. या अडाख्यांस धरून मानवी प्रयत्नांची फलश्रुति व्हावी अशी सर्वांप्रमाणें लेखकाचीहि अपेक्षा असते चांगल्याच्या पोटीं चांगलेंच जन्माला यावें असें त्याला वाटतें व त्याला असा नेहमीं धाक वाटतो कीं, वाईटाच्या पोटीं बहुधा वाईटच निपजेल. अशा प्रकारची कांहीं एक संगतीची अपेक्षा तो बाळगितो. चांगल्यांतून चांगलें, सौम्यांतून सौम्य, उग्रांतून उग्र जर निघालें नाहीं तर त्याला धक्का बसल्यासारखें होतें. म्हणून आपल्या लेखनांत तरी तो या चुकीची दुरुस्ती करूं पाहतो. कार्यकारणांत अपेक्षित असलेली संगति जर मुळांत नसली तर ती आपण आणिली पाहिजे असा त्याच्या बुद्धीचा आग्रह असतो. सद्गुणी माणसाला नेहमीं यश मिळावें

आणि दुर्गुणी माणसाला शेवटीं कांहीं तरी शासन व्हावें अशी बुद्धि त्याच्या मनांत कायम झालेली असते आणि म्हणून मूळ प्रपंचांत जरी हा अनुक्रम त्याला नेहमीं सांपडत नसला तरी आपल्या वाङ्मयनिर्मितींत तो अवश्य असावयास हवा असें त्याला वाटतें. प्रयत्नशील माणसाला संपत्तिमान् होतां यावें आणि मूर्ख, ऐदी माणसांना वैभव लाभूं नये अशी त्याची इच्छा असते आणि सृष्टीच्या नोंदवहींत जरी त्याला असें नित्य आढळलें नाहीं तरी तें तसें असावयास हवें असें वाटून तो आपली वाङ्मयनिर्मिती तसतशी करितो. याचा अर्थ हाच कीं, लेखक सृष्टीचें अनुकरण करीत नाहीं.

लेखक शोकपर्यवसायी कथानकें लिहितो म्हणून असें वाटण्याचा संभव आहे कीं, वर सांगितलेलें सृष्टीच्या कारखान्यांतलें वैपरीत्य तो पत्करितो व म्हणून आपल्या कथानकाचें पर्यवसान शोकपर करण्यास तो तयार होतो. पण हें खरें नाहीं. सृष्टीच्या व्यापारांत अपेक्षाभंग सांपडतो व त्यावर त्यानें आपलें कथानक शोकपर केलेलें असतें असें नाहीं. त्याच्या वाङ्मयांयांतील शोकपरत्वाची भूमिका अगदीं निराळी असते. कामक्रोध, मोह, मदमत्सर इत्यादि प्रवृत्तींचीं प्रास्ताविक रूपें मनुष्याच्या जीविताला अत्यंत उपयोगी असतात. ती उपयोगीपणाची मर्यादा या प्रवृत्तींनीं ओलांडिली व उद्दाम बनून कथानकांतील नायकाची त्या फरपट काढूं लागल्या म्हणजे कथानकाला शोकपरत्वाची बाधा होऊं लागते व त्या अगदींच बेफाम झाल्या म्हणजे कथानक शोकपर्यवसायी होतें. लेखक जीं शोकपर्यवसायी कथानकें लिहितात तीं अशीं असतात. पण प्रपंचांत जीं अनेक शोकपर्यवसानें होतात तीं केवळ या अति-

रेक-तत्त्वानें होतात असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. प्रपंचांतील शोकपर्यवसानें कां घडतात कोणास ठाऊक ! एकापुढें एक कांहीं भलभलतेंच घडून येत असतें. ते सगळे प्रसंग एका सांखळीचे दुवे आहेत असेंहि म्हणतां येत नाहीं. कोणत्या नात्यांनीं आणि कारणांनीं ते एकमेकांपुढें आलेले असतात हेंहि कळत नाहीं.

शोकपर्यवसानें किंवा आनंदपर्यवसानें मात्र भराभर घडत असतात. आपापल्या प्रपंचांतला किंवा इतिहासांतला एकादा कालखंड उचलावा व त्यांत अचानकत्व, असंगति, अपेक्षाभंग, निराशा आणि आनंद यांचें मिश्रण किती झालेलें असतें तें पाहावें. प्रथम मुलगा होतो तो मरतो; पुढें अनुक्रमानें पांच मुली होतात; त्यांच्यांतील एक मधली सुरूप म्हणजे आई-बापांच्या रूपांतील सौन्दर्यकला एकत्र केलेली अशी असते; बाकीच्या तिच्या बहिणीशा वाटतात पण साधारण कुरूपच असतात; नोकरी नीट लागलेली असते; अधिकाऱ्यांत बदल होतो; दहा वर्षांनंतर अक्षर चांगलें नसल्याचा ठपका येतो; बायकोला कळा लागतात; चिमणीच्या नांवानें तिकिट घेतलें होतें त्याचे लॉटरींतून पांच हजार रुपये येतात, थोरलीचा नवरा तिला फार मारतो; मध्यें पांच वर्षें खंड पडून मुलगा होतो; नोकरींत वाहवा होते; पक्षघात होतो; जीव जातो— यांत कशाला कांहीं मेळ असतो काय ? जीवित असें असतें. याचें अनुकरण ललितलेखक कधीं करितात ? बहुतेक जीवितें अशींच असतात. पण लेखकांचें पाहावें तों त्यांच्या कथानकांत कांहीं सुसूत्रपणा असतो, संगति असते, योजना असते; आणि तरीहि आपण अनुकरण करितों असें ते म्हणतात व आपण

त्याला होकार भरतो. एकाद्या जीवितांत सूत्रबद्धता व योजना त्यांना सांपडतहि असेल, पण मग तें लिहिणें प्रापंचिक जीवनाचें प्रतिबिंब नव्हे, तें प्रतिनिधिरूप लिहिणें नव्हे. म्हणजे लेखक हे जीविताचें अनुकरण करितात, असें नाहीं. त्यांनीं अनुकरण केलें असतें तर आतांच वर सांगितलेल्या कथानकासारखीं कथानकें त्यांनीं वाङ्मयांत घातलीं असतीं. पण असें कधींहि होत नाहीं. आणि त्यांनीं तशीं कथानकें घातलीं तर वाचक तसलें वाङ्मय कधींच वाचणार नाहींत. याचा अर्थ वाचकाला व लेखकाला मूळच्यासारखेंच सांगणारें वाङ्मय नको असतें, असा आहे. मग कवी, नाटककार, कादंबरीकार सृष्टीचें अनुकरण करितात हें म्हणणें इतर एकाद्या अर्थानें कदाचित् खरें असलें तरी वाङ्मयवस्तूविषयीं बोलत असतां तें मुळींच खरें नाहीं.

आणखी एक बाब याच दृष्टीनें विचारांत घेण्यासारखी असते. मानवी जीवितांत अशा कांहीं गोष्टी घडून येतात कीं, त्या पाहून माणसें चकित व स्तंभित होऊन जातात; पण लेखकांना वाटतें कीं, आपल्या ज्ञानाचा जो संचय आहे व आपली जी अनुमानपद्धति आहे तिच्यावरून या कार्याच्या कारणांची कांहीं उपपत्ति बसवितां येण्यासारखी आहे व उपपत्तीस धरून वाङ्मय म्हणजेहि अनुकरणच झालें, असें तो समजतो. जर एकादी घटना बनली आहे तर तिला कांहीं कारण असलेंच पाहिजे येथपर्यंत त्याचें अनुमान बरोबर असतें; पण तें कारण दरवेळीं आपल्याला सांगतां येण्यासारखें आहे असेंहि तो आग्रहानें समजतो, तें मात्र बरोबर नाहीं. दिसत असलेल्या कार्याला कारण असावयास हवें ही अपेक्षा तर्कास धरून

आहे; पण आपण केलेली कारणमीमांसा ही दरवेळीं बरोबर आहे असें जें तो समजतो तें मात्र तर्कास सोडून आहे. कारण सृष्टीच्या जड घडामोडींतील प्रत्येक कार्याचें कारण जर आपणांस सांगतां येत नाहीं तर तिचे जे सूक्ष्म व्यापार चालू असतात त्यांचीं कारणें मात्र आपणांस सांगतां येतीलच असें त्यानें कां मानावें हें कळत नाहीं.

आपले जयापजय व आपले लाभालाभ हे नेहमीं आपल्या प्रयत्नांतूनच निष्पन्न होत नाहींत, तर अजून अज्ञात असलेल्या इतर कांहीं शक्तींचे व्यापार आपल्या प्रयत्नांवर होत असतात व ते ज्या मानानें अनुकूल किंवा प्रतिकूल असतील त्या मानानें आपले जयापजय व लाभालाभ सिद्ध होतात किंवा फसतात हें मानवानें पुरतें ओळखिलेलें आहे. म्हणून प्रत्येक सुसंस्कृत देशाच्या तत्त्वज्ञानांत अशा स्वतंत्र शक्तीचें अस्तित्व मानिलें आहे. पण मौज अशी आहे कीं, हा जो अज्ञात शक्तींचा परगणा असतो त्यांतील हालचालीहि आपल्याला कळतात असें मानण्याकडे लेखकांचा कल दिसतो—इतकेंच नव्हे, तर त्या हालचालींचें धोरणहि आपण प्रपंचांत ठरविलेलें बरेंवाईट, खरेंखोटें, इत्यादींचे जे अडाखे आहेत त्या अडा-ख्यांना धरूनच आंखलेलें असतें, असेंहि मानण्याकडे त्यांची प्रवृत्ति होते. म्हणजे असें कीं, मानवी प्रयत्नांच्या अवलोकनानें जें न्याय सिद्ध झाले ते न्याय, सृष्टीच्या किंवा परमेश्वराच्या अधिराज्यांतसुद्धां जसेच्या तसेच चालू राहतात, असें मानण्या-पर्यंत त्याची मजल जाते. अन्याय केला असतां नुकसान होतें असा एक लेचापेचा कां होईना पण अडाखा त्यानें बसविलेला आहे. तो सृष्टीहि अमलांत आणिते अशी त्याच्या

नैतिक अनुमानाची उडी असते. "अस्पृश्यता मानणें हें पाप; यानें नुकसान होणारच" असें म्हणतां म्हणतां बिहार प्रांतांत झालेले भूकंपहि या पापामुळेंच झाले असें म्हणण्याचें धाडस महात्मा गांधी करितात. लेखक लोक असलेंच साहस अनेकदां करितात. "नियतीची खूण ( Finger of Destiny ) असले शब्द ते योजूं लागतात; आणि ती योजना व तो हस्त-क्षेप आपण बसविलेल्या नियमान्वयें होत आहे असें म्हणण्याचें धाष्टर्यहि त्यांच्या हातून होतें. कांहीं प्रसंगीं आपल्याला हवा आहे तसा सर्व परिस्थितीचा जम बसत असलेला दिसतो; पण कांहीं कांहीं वेळां आपण कितीहि आटोप दाखविला तरी परि-स्थिति विसकटतच चाललेली असते. यालाच नेहमींच्या व्यव-हारांत 'योगायोग' म्हणतात. सगळें जुळून येतें तेव्हां 'योग' असतो व कोठें तरी फिसकटतें तेव्हां 'अयोग' असतो. पण योग जमतो तेव्हां आपल्या अंगाला सत्य व न्याय असतातच असें नाहीं; तसेंच जेव्हां अयोग उद्भवतो तेव्हां आपण सत्य व न्याय यांना पारखे झालेले असतों, असें नाहीं. तथापि असें असलें तरी कवी, नाटककार इत्यादि हा योगायोग जशाच्या तसा चित्रित करण्याचें काम करीत नाहींत. त्यांच्या कल्पनेची भरारी अनिरुद्ध चालते व त्यांस वाटतें कीं, येथेंहि आपल्या दंडकाला अनुसरून कांहीं गूढस्थ योजना असावी व ती आपल्याला, अस्पष्ट का होईना, पण दिसत आहे.

येथेंच थोडी सावधगिरीची सूचना आपण एकमेकांस द्यावयास हवी. जर या लेखकाला कांहीं योजना आहेसें वाटलें तर ती हवीहवीशी वाटत असल्यामुळें खरोखरच आहे असें मान-ण्याकडे त्याच्या बुद्धीचा कल जास्त होतो. जें अस्पष्ट असेल

तें सुस्पष्ट आहे असें त्यास वाटूं लागतें. जें केवळ छायारूप असेल तें देहधारी आहे असें त्यास भासतें आणि जेथें केवळ सहज आकस्मिकपणा असतो तेथें बुद्धिपुरस्सरता आहे असें तो मानूं लागतो. जें हवें अशी वासना आहे तें वासनेच्या प्रखरपणामुळें 'आहे' असें वाटूं लागणें स्वाभाविक असतें. पण येथेंच फसगतीला जागा आहे हें त्यानें ओळखावयास हवें. समान परिस्थितींत अन्य काळीं वा अन्य स्थळीं अशीच प्रतीति येते काय हें त्यानें पाहावयास सिद्ध झालें पाहिजे. असे जर कांहीं नियम त्याच्या हातीं लागले असले तर हें त्याचें बोलणें बरोबर आहे. एरवीं सहज एखादा बनाव बनला पण याला मात्र योजनेनें झाला आहे असें वाटलें, इतकेंच म्हणतां येईल. मोठा भाऊ कागदावर सफाईनें कांहीं इंग्रजी लिहीत असला म्हणजे आपल्या स्लेट पाटीवर पेन्सिलीनें अनेक तऱ्हेच्या रेघोट्या मारून धाकटा भाऊ मोठ्या आशेनें त्याला विचारतो, "दादा! यांत एकहि इंग्रजी अक्षर आलें नाहीं काय?" आतां त्यानें इतकें गिरगटलेलें असतें त्यांत कोठें तरी एकादें इंग्रजी अक्षर उमटलेलेंहि असेल व दादा लाडिकपणानें आपल्या भावाला गंमत म्हणून शाबासकीहि देत असेल. पण आपल्याला हें माहीत आहे कीं, T किंवा D जें काय उमटलें असेल तें सहजासहजीं उमटलेलें आहे, त्यांत योजनेचा अंश कसलाहि नाहीं.

ज्या लेखकाला कांहीं योजना दिसल्याचा भास झाला त्याची स्थिति केवळ अशीच आहे. लहान मुलें रात्रीच्या वेळीं अंगणांत निजलेलीं असतात आणि आकाशांत ढगांची उलाढल चालू असते. या उलाढालींत ढगांना केव्हां केव्हां उंटाचें रूप

येतें; तें पाहतांच “ उंट आला ! ” म्हणून मुलें ओरडतात. कांहीं वेळानें ढगांचा आकार हत्तीसारखा होतो. मुलें पुन्हां “ हत्ती, हत्ती ” म्हणून ओरडतात. आपल्या लेखकांची स्थिति या अर्भकांच्या स्थितीहून विशेष बुद्धिमत्तेची असते असें मला वाटत नाहीं. उंट आणि हत्ती हे दिसतात खरे, पण वाऱ्याच्या मनांत ते उत्पन्न करण्याची योजना खचित् नसते. आपण एकादे वेळीं खेडेगांवाला गेलों असतां एकाद्या जुन्या खोलींत बसावें—म्हणजे समोरच्या जुन्या भिंतीकडे पाहतां पाहतां तेथें एकादी डोळ्याची आकृति आहे असें वाटूं लागतें. मग कांहीं वेळानें त्याच्या शेजारीं नाकहि उमटलेलें आहे असें वाटतें. असें होतां होतां बारीक दृष्टि आणि कल्पनेची भरारी यांच्या व्यापारामुळें आपल्याला सबंध चेहरा तेथें दिसूं लागतो. आपल्या लेखकांची अवस्था नेमकी हीच आहे. चेहरा दिसला खरा, पण त्यांत कल्पनेचें कार्य किती हें लक्षांत घ्यावयास हवें आणि योजनेचा तर अंशहि नाहीं हेंहि ओळखावयास हवें. लेखकांना जो योजनेचा भास होतो तो या वरील भासा-सारखाच होय. नाहीं तर समान परिस्थितींत नेमक्या त्या त्या तऱ्हेच्या योजना अमुक नियमान्वयें होतात असें त्यांस दाखवितां आलें असतें. गूढ उकलण्याच्या हेतूनें ‘ मूळचें पाहून सांगावयाचें ’ म्हणजे अनुकरण करावयाचें असा त्यांचा हेतु असतो तोहि या कामांत साधत नाहीं असें म्हणावयास हवें. अशा प्रकारें स्वतः बसविलेले अडाखे किंवा त्याला होणारे

आभास यांस अनुसरून लेखक मूळ वस्तूंत हवे तसे फेरफार करून घेतो व आपलें वाङ्मय लिहितो; तरीहि अनुकरणाबद्दल आपण त्याची वाहवा करितोंच. त्याचें लिहिणें आपल्याला आवडतें याचें कारण त्यानें जीविताचें अनुकरण केलेलें असतें हें नव्हे, तर त्यानें त्यांत कृत्रिम केलेलें असतें हें होय.

## १३. पारमार्थिकांनीं केलेला रामदासाचा पराभव !

रामदासाइतका दुर्दैवी ग्रंथकार दुसरा कोणी झाला असेल असें वाटत नाहीं ! रामदास हा अत्यंत श्रेष्ठ दर्जाचा, पहिल्या प्रतीचा ग्रंथकार झाला, पण इतर श्रेष्ठ दर्जाच्या ग्रंथकारांना जें भाग्य लाभतें ते रामदासाला लाभलें नाहीं. अशा ग्रंथकर्त्यांना अनुयायिवर्ग लाभतो, अनुकरण करणारे भेटतात, त्यांच्या प्रमेयांची फोड करणारे असतात, आणि त्यांचे पंथहि वाङ्मयांत प्रस्थापित होतात. रामदासाला हें वैभव मुळींच लाभलें नाहीं. म्हणून असें वाटतें कीं, रामदास हा ग्रंथकार दुर्दैवी ठरला. रामदासाला शिष्य नव्हते असें नाहीं; त्याचें अनुकरण झालें नाहीं असेंहि नाहीं आणि त्याच्या प्रमेयांवर टीकाग्रंथ जरी झाले नसले तरी त्याचा पंथ प्रस्थापित झाला नाहीं असेंहि नाहीं. रामदासी संप्रदाय अजूनहि सर्वांना परिचित आहे, दासबोधाचीं पारायणें करणारे हजारों लोक

आहेत; मनाच्या श्लोकांची गर्जना करून आणि काखेला कुबडी घेऊन हिंडणारे अनेक महंत आहेत; पण हें सारें रामदासाला त्याच्या भक्तिशाखेंत लाभलेलें वैभव होय. रामदास हा रामाचा भक्त होता. इतर संत विठ्ठलाचे भक्त होते व कांहीं थोडेसे दत्तात्रेयाचे भक्त होते. रामदासानें रामाची भक्ति फैलाविली. पण कांहीं झालें तरी ती भक्ति होती. बरेच लोक विठ्ठलभक्तींत मुरलेले होते, रामदासामुळें कांहीं रामाच्या भक्तींत मुरले एवढाच फरक. या भक्तांना रामदास हा गुरु वाटत होता यांत कांहींच शंका नाहीं, पण तो त्यांचा भक्तिमार्गांतील गुरु होता. 'ब्रह्माण्ड भेदून रामकथा पैलाड न्यावी' याचा साधासुधा व परंपराप्राप्त अर्थच ते जाणीत. आपल्याला संसार-तापत्रयांतून मुक्त करणारा हा गुरु आहे; याची चरणसेवा करावी; यानें दिलेला रामनामाचा मंत्र जपावा व देह सार्थकीं लावावा असा पमरार्थविषयांतील, आधींच इतरांनीं चोखाळलेला विचार, उपासनाभेदानें त्यांनीं मनाशीं बाळगिला होता. आपला गुरु हा आधीं होऊन गेलेल्या मोठमोठ्या संतांच्या मालिकेंतील एक तेज:पुंज मणि आहे, त्यांनीं विठ्ठलभक्ति सांगितली होती, हा रामाची भक्ति प्रतिपादितो एवढाच फरक आहे, असें त्यांच्या मनावर बिंबलेलें होतें. रामदासाची त्यांना पुरती ओळख झालेली नव्हती. समाजांत जो भक्तिमार्गाचा आखाडा पडलेला होता त्यांतलेच ते होते; फक्त उपासनेचें दैवत निराळें होतें, इतकेंच काय तें! रामदासाच्या मनाचे बहुविध व्यापार त्यांना कळले नाहींत. हा आपला गुरु आजवर झालेल्या गुरूंहून कोणत्या बाबतींत निराळा आहे याचा उमज त्यांना पडलाच नाहीं.

त्याचें विविधरूप दर्शन झालेले शिष्य कांहीं तरी असलेच पाहिजेत. त्यानें शेंकडों मठांची स्थापना केली आणि एक-विचारें अनेकांना भरविलें. केवळ भक्तिप्रसारासाठीं इतक्या यातायातीची आवश्यकता नव्हती; इतक्या मठांची स्थापना नको होती; जगाचें नश्वरत्व कोठेंहि प्रतिपादितां आलें असतें; आणि दासबोध व तदितर ग्रंथांत एवढा अवाढव्य व्यवहारवाद विवरून सांगण्याचें प्रयोजन नव्हतें. पण रामदासानें हें सर्व केलेलें आहे. त्याच्या ज्या शिष्यांनीं हें सर्व पाहिलें व ओळखिलें ते कोठें गेले? त्यांचें काय झालें? त्या शिष्यांचे ग्रंथ कोठें आहेत? रामदासाचा व्यवहारवाद पुन्हां आवर्जून बोलणारा त्यांचा शिष्य वाङ्मयांत कोठें शिल्लक आहे काय? चुकून-माकून या बाबींचा उल्लेख करणारा कोणी असला तर तो नको. खुद्द रामदासांनीं जसा व्यवहारवाद घसघसून, आवर्जून, ठासून सांगितला आहे तसा, त्याचा विधायक बुद्धीनें विचार व उच्चार करणारा कोणी शिष्य आहे काय? मला वाटतें, नाहीं. मग हे सर्व लोक कोठें गेले? ते असले पाहिजेत यांत शंकाच नाहीं. ओवीच्या प्रत्येक अणुरेणूंतून शिष्य उत्पन्न करण्याचें सामर्थ्य प्रकट झालें आहे. या ओव्यांतील व्यवहार-वादाचा मोह अनावर आहे; एकेक ओवी म्हणजे एकेक बाण आहे; मनोभूमींत गेला कीं रुतून बसलाच पाहिजे. याहि उद्गारांनीं शिष्य होईनात तर मग कशानें होणार असतात? सामान्य लेखक, कीं ज्यांना विशेष प्रकारचें चारित्र्य नाहीं, उत्कटता नाहीं, पण थोडे लेखनाचे ढंग आहेत त्यांनासुद्धां अनुयायी व शिष्य लाभतात. मग रामदासाविषयीं तर बोला-वयासच नको. रामदास परम विरक्त तापसी असून त्रिखंड

तुडविलेला चाणाक्ष योगी होता; संघटनाचातुर्याची उतारपेठ होता; स्वतंत्र तत्त्वज्ञान लिहिण्याची कुवत बाळगणारा विचारवंत होता. आणि राजवाडे म्हणतात तसा 'महाराष्ट्रवाङ्मयांतील उस्ताद' होता. अशा पुरुषाला शिष्य लाभेनात तर कोणास लाभणार? मग या सगळ्या शिष्यांचें काय झालें? व्यवहारवाद अथवा प्रपंचविज्ञान प्रतिपादणें ही काय रामदासाची केवळ करमणूक होती? आणि परमार्थप्रतिपादन हाच त्याचा जिवाचा केवळ हव्यास होता? असें मुळींच वाटत नाहीं. परमार्थाच्या आणि भक्तीच्या प्रतिपादनांत रामदास जितका रंगून जातो त्याहीपेक्षां अधिक बारकाईनें प्रपंचविज्ञानांत तो रंगलेला दिसतो. तें विज्ञान अवश्य सांगावयाचें आहे अशी त्याची भूमिका दिसते आणि ठसवावयाचें आहे असा त्याचा आग्रह दिसतो. ती त्याची रिकामपणची कामगिरी नाहीं; तें त्यानें सहजासहजी केलेलें नाहीं. चालू काळाशीं जुळतें बोलत बसावें म्हणून तें वरकरणीं केलेलें वाक्पाटव नव्हे. मनाच्या, चित्ताच्या, विवेकबुद्धीच्या मूळ कंदांतून भराभर फुटणारे ते जोरकस पंदे आहेत. ती जिवंतवाणी आहे; वेंचक विचारांचा तो संग्रह आहे. त्यांत सामान्य विधानांची सारवासारव नाहीं. त्यांत तजेलदार कणाकणांची—तपशिलाची रेखीव मांडणी आहे. त्यांत आत्मप्रत्ययाचा कस आहे. अशा वाङ्मयानें शिष्य व अनुयायी निर्माण होणारच होणार. मग ते सर्व कोठें गेले? त्यांची बिरुदावली तुटली कीं काय?

अष्टकांत दिसून येणारें त्याचें सृष्टिसौंदर्याचें प्रेमहि या शिष्यांना एरवींच्या संभाषणांत दिसून आलें असलें पाहिजे. त्यांच्या स्वाभाविक रसिकतेला हेंहि आवाहन पोहोंचलें असलें

पाहिजे. रामदासाच्या प्रपंचविज्ञानाचें स्फुरण जसें त्यांनीं पाहिलें होतें तसें हें रामदासाचें सृष्टिसौंदर्यज्ञानहि त्यांनीं पाहिलेलें असलें पाहिजे. हीहि रामदासाची शिकवण होती. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांतून हिंडणाऱ्या आणि अरण्याच्या निबिडांत एकांताचें सुख अनुभविणाऱ्या या विरक्ताच्या मनाचा व्यापार म्हणजे केवळ इंद्रियदमन एवढाच नसून त्याच्या अंगीं कवित्वाची जिवंत स्फूर्ति आहे आणि त्याच्या प्रतिभेचा विलास नाना प्रकारांनीं होत आहे हें त्यांनीं खुद्द ग्रंथावरून व संभाषणावरून ओळखिलें असेल. हीहि दासांची शिकवणच होती. त्याच्या अनेक शिष्यांपैकीं निदान कांहींच्या अंगीं तरी हें ओळखण्याची रसिकता असली पाहिजे. त्या शिष्यांनीं तो ध्वनि आपल्या वाङ्मयांत कोठें उमटविला नाहीं काय? तो कोठें तरी असलाच पाहिजे. मग त्याच्या शिष्यांचें काय झालें? ते त्याचे शिष्य कोठें गेले?

रामदासाला भक्तिशाखेंत अनेक शिष्य मिळाले; पण त्यानें जें प्रपंचविज्ञान प्रतिपादिलें, सृष्टिसौंदर्याची जी रुचि दाखवून दिली व वाङ्मयाची जी प्रचंड रचना केली त्यांतून कोणीच शिष्य त्याला मिळाले नाहींत हें अगदीं खरें आहे. रामदासाच्या आधीं व ज्ञानेश्वराच्याहि पूर्वीपासून महाराष्ट्रांत भक्तीचा डांगोरा झडत होता आणि रामदासानेंहि दैवत निराळें धरून तोच डांगोरा चालू ठेविला. पण याशिवाय त्यानें जो दिव्य संदेश महाराष्ट्र-जनतेला दिला तो प्रपंचविज्ञानाचा होय. प्रपंचांतून उठून जावयास हवें, बायकापोरें खोटीं आहेत, हे सर्व मायापाश त्याज्य आहेत, असल्या उपदेशाचा पाऊस ज्ञानेश्वर-नामदेवांपासून सर्व संतांनीं पाडिलेला होता; पण दोन तपां-

पर्यंत भारतांतील लोकांच्या जीविताचें अवलोकन केल्यावर रामदासाला निराळें स्फुरण झालें. जुन्या संतोपदेशाची राजवट त्यालाहि एकदम झुगारतां आली नाहीं; परंतु त्यानें जों जों अधिकाधिक चिंतन केलें तों तों त्याला दिसूं लागलें कीं, या परमार्थग्रस्त लोकांना प्रपंचाचीच जागृति द्यावयास हवी; यांना व्यवहारवाद शिकवावयास हवा; ऐहिक वैभव कसें साधावें याची शिकवण यांना द्यावयास हवी; यांच्या भाबडेपणाचा निचरा करून यांच्या बुद्धींत पाताळयंत्रीपणा आणावयास हवा; हे लोक देवाच्या नांवानें ओरडा करितात खरे, पण प्रपंचाचें कार्य गप्प बसूनच जास्त साधितां येतें हें या लोकांना पटविलें पाहिजे; हे लोक भीक मागतातच, पण कांहीं हेतु मनांत धरून भिक्षेचा वहाणा करावा हें यांस शिकवावयास हवें; बोलतांना सरळ बोलावें हें युक्तच आहे, पण " काटीनें काटी काढावी " हा न्याय जास्त उपयोगाचा आहे हें या लोकांच्या मनावर बिंबविलें पाहिजे; हे लोक दैवतांची उपासना करितातच, पण रामचंद्र हा बंधविमोचक होता म्हणून त्याची उपासना करावयास हवी हें यांना आवर्जून सांगितलें पाहिजे! धकाधकीचा मामला या अशक्त लोकांच्या हातून घडणार नाहीं म्हणून फक्त सशक्तालाच नाना बुद्धि शिकवाव्यात हें रामदासाच्या मनानें कायमचें घेतलें होतें.

तुकारामबोवांनीं पारमार्थिक दुःखानें टाहो फोडिला कीं, " येणें दुःखें माझा फुटों पाहे प्राण. " रामदासाला हें उंच अर्थाचें पारमार्थिक दुःख होतेंच; परंतु लोकांचें तें अनन्वित दुःख पाहून त्यानें हंबरडा फोडिला कीं, " हे लोक आतां कोठें जातील? यांचा आपंगिता आतां कोण?" या " चिंतेनें ऊर

फाटतो." ही चिंता जर घालवावयास हवी असेल तर "जैशास तैसा जेव्हां भेटे तेव्हां मजालसी थाटे" हाच न्याय प्रसृत करावयास हवा; पण आपण स्वत: मात्र "कळकटपणाची पदवी असों द्यावी" हा न्याय त्याच्या मनांत पक्का झाला. अशा प्रकारें लोकांनीं प्रपंच करावा आणि तो कसा करावा हें शिक्षण आतां लोकांना दिलेंच पाहिजे हा त्याच्या बुद्धीचा निश्चय कायम झाला. "संसार मुळींच नासका, विवेकें करावा नेटका, नेटका करितां फिका, होत जातो" म्हणून संसाराच्या अंगीं फिकें पडत जाण्याची मूळचीच जर प्रवृत्ति आहे तर तो नेटका करण्याची शिकवण आपण दिली पाहिजे म्हणून रामदासानें केवढी प्रचंड ग्रंथरचना केली ! जुन्या संतांच्याप्रमाणें जर केवळ प्रपंचाचें वैयर्थ्य त्याला शिकवावयाचें असतें व केवळ भक्तीचा महिमा गावयाचा असता तर त्याला ही ग्रंथरचना करण्याचें कांहींच कारण नव्हतें. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम यांच्या अभंगांच्या खालीं त्यानें नुसती सही केली असती तरी चाललें असतें. "आपण एकाएकी एकला, सृष्टींत भांडत चालला, बहुतांमध्यें एकल्याला, यश कैंचे !" हें संघटनेच्या कामांतील मर्म शिकविण्याची त्याला काय आवश्यकता होती ? "ब्राह्मणांस ग्रामणीनें (ग्रामण्यानें) बुडविलें........ आम्हीहि तेची ब्राह्मण, दु:खें बोलिलें हें वचन, वडील गेले ग्रामणी करून, आम्हां भोंवतें" अशी सामाजिक तक्रार करण्याची त्याला काय आवश्यकता होती ? "उदंड बाजारी मिळाले, परी ते धूर्तेची आळिले, धूर्तापाशीं कांहींही न चले, बाजाऱ्यांचें" हें लोकसंग्रहाचें यशस्वी मर्म विवरून सांगण्याचें त्याला काय प्रयोजन होतें ? ज्याला केवळ देवाचीच भक्ति

सांगावयाची होती त्याला आयती प्रस्थापित झालेली विठ्ठलाची भक्ति सोडावयाची आवश्यकता काय होती? "प्रयत्न तो देव जाणावा; कष्टेंविण फळ नाहीं, कष्टेंविण राज्य नाहीं, केल्याविण होत नाहीं, साध्य जनीं" हे राजस उद्‌गार काढण्याचा आग्रह रामदासानें कां धरावा? लेखनाक्रिया कशी करावी हें सांगण्याची आवश्यकता काय होती? पढतमूर्खांचीं लक्षणें रामदासानें कशाला सांगावयाला हवीं होतीं? – या सर्वांचें तात्पर्य असें आहे कीं, रामदासाला प्रपंचाविज्ञान शिकवावयाचें होतें व तें त्यानें मोठ्या साक्षेपानें, मेहनतीनें शिकविलें आहे. मानवी मनाचा इतका सूक्ष्म शोध मराठींत इतर कोणाहि ग्रंथकारानें केलेला नाहीं. भावना, संकल्प, विकल्प हीं सर्व रामदासानें तपासून पाहिलीं आहेत आणि त्यांचा व्यापार प्रपंचांत कसा चालतो याचें यथारूप वर्णन केलेलें आहे. ज्याला केवळ भक्तीच सांगावयाची आहे त्याला हें सांगून काय करावयाचें होतें?

पूर्वीच्या संतांनीं प्रस्थापित केलेल्या वैराग्याच्या पीठिकेंतून रामदासाला महाराष्ट्र-जनता बाहेरच काढावयाची होती. तो स्वत: विरागी म्हणजे बैरागी राहिला पण तें अशासाठीं कीं, महाराष्ट्रांतील गृहस्थाश्रम सुखी व्हावा. येथील गृहस्थ प्रापंचिक होते पण परमार्थाच्या आणि वैराग्याच्या दाट सावटीखालीं त्यांचें गार्हस्थ्य खुरटें राहत होतें. मनूनें गृहस्थाश्रमाचा महिमा मनमोकळेपणाने वर्णिला आहे आणि व्यासवाल्मीकींनीं राम, कृष्ण व पांडव यांच्या प्रपंचाच्या वर्णनांनीं वाङ्मय तोंडोतोंड भरून टाकिलें आहे. पण संतवाङ्मयाची शिकवण मात्र वैराग्याची आणि प्रपंचाच्या मिथ्यात्वाची होती

यांत कसलाहि संदेह नाहीं. मनु आणि व्यासवाल्मीकि यांची जनमनावरची छाप संतांच्या वैराग्यप्रतिपादनानें धर्मापुरती टिकली तरी प्रपंचाच्या दृष्टीनें लुलीच झालेली होती. राम, कृष्ण हे श्रेष्ठ व पराक्रमी प्रापंचिक हा रामायण-महाभारतांतून निघणारा बोध मागें पडून ते केवळ परमेश्वरस्वरूप असून आपण त्यांची भक्ति करावी व जीविताचें सार्थक करून घ्यावें एवढाच काय तो बोध शिल्लक राहिला. प्रपंचांतून उठून जाऊन त्यांची भक्ति करतां आली तर ती करावी हें संतप्रतिपादनाचें सार होतें. लोक प्रपंचांतून उठले नाहींत हें खरें; पण त्याचें कारण त्यांना तसें उठतां येत नव्हतें हें होय. त्यांचा इलाज नव्हता. प्रपंचाचे बंधच मुळीं असे आहेत कीं, ते त्यांना उठूं देईनात. पण संतांनीं आपल्या तत्त्वज्ञानानें त्यांच्या तोंडाला थोडी कडवट चव आणिली होती हें खोटें नाहीं. गार्हस्थ्य हें सर्व आश्रमांचें आश्रयस्थान आहे आणि म्हणून तेंच युक्तपणानें आचरिलें पाहिजे हें तत्त्वज्ञान रद्द होऊन तें नाइलाजानें आचरावें लागत आहे अशी खंति माणसांच्या मनाला होती. म्हणजे कोणतेंहि कृत्य करतांना लोकांना जो तत्त्वज्ञानाचा आश्रय लागतो तो खिळखिळा झाला होता. रामदासाच्या मनानें असें घेतलें होतें कीं, गार्हस्थ्याची उच्च पीठिका पुन्हां प्रस्थापित केली पाहिजे; म्हणून त्यानें आपल्या लिखाणांत त्या गार्हस्थ्याला, मग तें व्यष्टीचें असो कीं समष्टीचें असो, यश कसें मिळेल याची मीमांसा परोपरीनें केली. त्यानें लोकांना व्यवहारवाद शिकविला. त्यानें महाराष्ट्र-भाषेंत प्रपंचविज्ञान रचिलें. पूर्वीच्या संतपरंपरेंतून रामदास आपण होऊन उठला. हें अलौकिक धैर्य त्यानें दाखविलें. प्रपंचाच्या अवहेलनेचें तत्त्वज्ञान चालू असतां

एका वैराग्यानें प्रपंचावरची लोकांची श्रद्धा स्थिर करावयास सिद्ध व्हावें हा देखावा तेव्हांच्या कित्येकांना उद्वेगकारक तर इतर कित्येकांना हर्षकारक वाटला असेल. लोकांना प्रपंच करावयाचेच होते पण ते त्यांना साखसुरत करावयाचे होते; तत्त्वज्ञानी लोक आपली केवळ गय करितात व म्हणून आपण प्रपंच करितों ही भूमिका त्यांना नको होती. ते प्रपंच करीत; पण आपलें कांहीं तरी चुकत आहे, कारण संत व तत्त्वज्ञानी लोक आपल्याला या कामांत प्रतिकूल आहेत या जाणिवेची रुखरुख त्यांच्या मनाला होती. रामदासानें धैर्य धरून त्यांची ही रुखरुख साफ नाहींशी केली. संतकुळांत म्हणजे भक्ति-परंपरेंत उत्पन्न होऊनच त्यानें जुन्या संतांविरुद्ध गर्जना केली व प्रापंचिकांनीं संसार मन लावून आणि यशस्वीपणानें करावा असा नवा संदेश दिला. त्यानें प्रापंचिकांना संसाराची सनद दिली; हें रामदासाचें राजकारणच होय.

रामदासानें राजकारण केलें कीं नाहीं याचा वाद मागें एकदां झाला होता व तो अजूनहि लपून छपून चालू आहे. त्या वादाला माझें हें उत्तर आहे. रामदासानें लोकांना प्रपंचाची सनद दिली. त्यानें व्यवहार विवरून सांगितला आणि प्रपंच-विज्ञान रचिलें हेंच त्याचें राजकारण होय, राजकारण करणें म्हणजे “ शिवाजीला मदत केलेली असणें, लोकांची संघटना केलेली असणें, गुप्तपणानें कामें करण्याची शिकवण दिलेली असणें ” असा अर्थ जे धरतात त्यांचें समाधान होईसा पुरावा तर उपलब्ध आहेच; म्हणजे त्या अर्थाचें राजकारण तर रामदासानें केलेंच पण याच्याहि मागें जाऊन या राजकारणाची जननी जी ‘ प्रवृत्ति ’ तिचेंच पुनरुत्थान याच्या हस्तें झालें !

22223 9990



राजकारण प्रवृत्तिवादांतून उद्भवतें पण तो बादचे संतांनीं व तत्त्वज्ञानी लोकांनीं निवृत्तिवादाच्या ओसाड आणि निश्चल वैराणभूमीकडे पिटाळीत गेला होता. ज्या दूरच्या सीमेपर्यंत तो गेला होता त्या सीमेपासूनच पुन्हां त्याला परत आणण्याचें काम करणें रामदासाला भाग होतें. म्हणून राजकारणाची उत्थानभूमि जी प्रपंचबुद्धि तीच उच्छिन्न होण्याच्या वाटेला लागली असतां तिला पुन्हां नवजीवन देणें हें राजकारण होऊन बसलें होतें. हिंसा ही 'मनोवाक्कायकर्मभिः' म्हणजे आचारांत, उच्चारांत, फार काय, विचारांत म्हणजे मनांतसुद्धां होतां उपयोगी नाहीं असें तत्त्वज्ञान रूढ होऊन, बळ धरून वसलें म्हणजे मग, विंचवाला जोडा मारिला तरी हरकत नाहीं, नव्हे मारावाच, ही शिकवण देणें हें अवश्यच होऊन बसतें. तेंच राजकारण बनतें; कारण जेथपर्यंत पीछेहाट केलेली असेल तेथून पुन्हां सुरुवात करावी लागते! रामदासाला हेंच करावें लागलें; आणि त्याचें वैभव हें कीं, प्रवृतिवादाचें आरंभस्थान पुन्हां चाळवून, जागृत करून, त्यानें प्रपंचावर आलेला हीनत्वाचा आरोप तर उडवून लाविलाच, पण 'तामस, तामस' म्हणून हिणविलेल्या तेव्हांच्या प्रत्यक्ष राजकारणांतसुद्धां हात घातला! शिवाजीच्या राजकारणाशीं रामदास एकजीव झालेला होता. त्यानें शिवाजीला राजकारणाचा मंत्र दिला हें मात्र खरें नव्हे; किंवा शिवाजीशीं तो बरोबरीनें राजकारणांत वागला हेंहि खरें नव्हे. शिवाजीच्या प्रत्यक्ष राजकारणाला लागून मागें चिकटलेलें व त्याच्या यशाला उपयोगी पडणारें राजकारण रामदासानें केलें हें मात्र खचित. हें सर्व त्याच्या वाङ्मयावरून कळून चुकतें. शिवाजीचें राजकारण अबोल कृत्यांनीं भरलेलें

आहे; तर रामदासाच्या राजकारणाला शतसहस्र शब्दांनीं वाच्यता मिळाली आहे.

पण हें सर्व खरें असलें तरी रामदासाला पारमार्थिकांच्या हस्तें पराभव खावा लागला हें कांहीं खोटें नाहीं ! एवढा वाक्भट, पण पारमार्थिक वाचाटांनीं त्याला चूप बसविलें; एवढा वाङ्मयमल्ल, पण पारमार्थिक जडभरतांनीं त्याची चीतपट केली. त्याचे शिष्य शिष्य म्हणून होते तेसुद्धां केवळ श्रद्धाळू पारमार्थिक होते. त्यांनीं त्याचें गळूं चोखिलें असेल पण तें केवळ गुरुभक्ति म्हणून; त्यांनीं कोयनेच्या डोहांत उडी ठोकून त्याला बाहेर काढिलें असेल पण तें केवळ गुरुभक्ति म्हणून; त्यांनीं त्याची चंची आणण्यासाठीं सर्पदंश करून घेतला असेल पण तें केवळ गुरुभक्ति म्हणून ! ते सर्व शिष्य रामदासाच्या पारमार्थिक ऐश्वर्यानें भारून गेलेले होते. त्यांचा जीव रामदासावर लागला होता पण रामदासाचा जीव 'शिवबा' वर लागला होता आणि 'शिवबा' तर प्रपंच करणाऱ्यांचा अग्रेसर होता. स्वत:चा प्रपंच त्यानें केलाच पण महाराष्ट्रांतील लक्षावधि प्रपंच त्यानें नव्यानें उभे केले आणि त्यांचें ऊर्जित साधिलें. या शिष्यावर रामदासाचा जीव लागला होता. तेंच त्याचें कैवल्य झालें होतें. अवघें भरतखंड धुंडिल्यावर मनाला उत्पन्न झालेलें अस्वास्थ्य घालविणारा शिवबा नांवाचा नवजवान कर्मयोगी भेटतांच रामदासाला आनंदाचें भरतें आलें. तसेंच शिवाजी वारल्यानंतर रामदासानें केवळ हाय खाल्ली; त्याला सर्व "भकास" झालें. रामदासाचें चरित्र वाचावें म्हणजे त्याच्या मन:प्रकृतींत आणि मग शरीरप्रकृतींत पडलेला हा फरक ध्यानांत येतो. आपल्या ह्या प्रपंचशूर शिष्याच्या मरणानें

रामदासाचें अंतःकरण विद्ध होऊन गेलें; पण त्याचे जे इतर शिष्यगण होते त्यांची लगोलग सुरू झालेली वादावादी बघितली म्हणजे ते रामदासाचे केवळ पारमार्थिक शिष्य होते एवढाच बोध शिल्लक उरतो.

दासबोध आणि तदितर ग्रंथ यांत रामदासानें सांगितलेल्या प्रपंचविज्ञानाचें बीज परमार्थानें रूक्ष बनलेल्या महाराष्ट्रभूमींत दग्ध होऊन गेलें. त्याचेंच वाङ्मय लिहिणारा, त्याची वाढ करणारा किंवा तोच संदेश पुन्हां पुन्हां उत्कर्षानें सांगणारा एकहि शिष्य रामदासाला लाभला नाहीं. त्याचें सर्व प्रपंच-विज्ञान त्याच्या ग्रंथांतच स्थगित झालें. पुढें झालेले सगळे कवी परमार्थांत आणि राम–कृष्णांच्या भक्तिपर कथांत गुंतून गेलेले दिसतात. जणूं कांहीं रामदासस्वामी झालेच नव्हते आणि त्यांनीं मर्दपणानें प्रपंच करावा हा दिव्य संदेश दिलाच नव्हता. पुन्हां जिकडून तिकडून परमार्थविचाराचें आणि भक्तीचेंच पीक वाङ्मयांत आलें आणि अशा रीतीनें रामदासाचा दिव्य संदेश मागें पडला. खुद्द शिवाजीला मात्र उत्तम शिष्यशाखा लाभली आणि रामदासासारखा कोणीहि समकालीन जोरकस वाङ्मयसेवक पाठीवर नसतांनासुद्धां थोरल्या महाराजांचे आम्ही शिष्य आहोंत असें अभिमानानें म्हणणाऱ्या पेशव्यांनीं शेवटीं दिल्लीचें तख्त गांठलें. परंतु खुद्द रामदासाच्या शिष्यशाखेंत आणि इतर वाङ्मयभक्तांत खास त्याचें असें कोणीच उरलें नाहीं. फार काय सांगावें, एकनाथ–तुकारामासारखा रामदास हाहि एक भक्तिज्ञान सांगणारा संत होऊन गेला एवढेंच वर्त-मान शिल्लक राहिलें ! आणि त्याच्या मठामठांतून " सदा सर्वदा योग तूझा घडावा " एवढीच रामाची प्रार्थना चालू राहिली !

रामाचीच कथा आपल्या गुरूनें एवढी कां वानिली याचें गुरूनें प्रत्यक्ष सांगितलेलें ज्ञान या मठांतून लुप्त झालें. परंतु प्रपंचवादाची ही घसरगुंडी येथवरच थांबली नाहीं; रामदासाला त्याच्या शिष्यांनीं दिलेल्या तडाख्यांतला हाच कांहीं शेवटचा नाहीं. ‘ प्रपंचवादाचा झेंडा ’ ‘ आनंदवनभुवनां ’त फडकाविणें हें कांहीं स्वामींचें जीवितकार्य नव्हतें तर परमार्थवादाचा पुरस्कार करणें हेंच त्यांच्या जीविताचें जिव्हार होतें असें सावेश प्रतिपादणारे त्यांचे शिष्यवर आजहि शिल्लक आहेतच ! अशा रीतीनें परमार्थाचा पुन्हां विजय झाला ! आणि पारमार्थिकांनीं रामदासाचा पराभव केला ! !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रमांक 22463 वि. निबंध
ग्रंथांक ... 9990 . नों. दि. 22/7/46
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. 6943

REFBK-0007543